

म. ग्रं. सं. ठाणे

मुक्तेश्वरकृत

# हरिश्चंद्राख्यान

REFBK-0022105

संपादक

दादा गोरे ... सुनेत्रा ओक

2330

मुक्तेश्वरकृत

# हरिश्चंद्राख्यान

• गोदा प्रकाशन : चार

अनंत चतुर्दशी, शके १८९९

• प्रकाशक

प्रा. दादा गोरे
चौराहा, औरंगाबाद.

• ©

सौ. सुनंदा गोरे

• मुद्रक

श्री. पं. ब. शेळके
नाथ मुद्रणालय, औरंगाबाद.

• मुखपृष्ठ

धर्मराज भोईर

• मूल्य

रुपये आठ फक्त

## पुरस्कार

श्री. प्रा. दादा गोरे आणि प्रा. सौ. सुनेत्रा ओक यांनी संपादिलेल्या मुक्तेश्वरविरचित 'हरिश्चंद्राख्याना'ला हा पुरस्कार लिहीत असताना मला अत्यंत आनंद वाटतो.

प्रस्तुत संपादनाच्या प्रस्तावनेत संपादकद्वयांनी 'आख्यान काव्य' या काव्य प्रकाराच्या वैशिष्ठ्यांचे सविस्तर विवेचन केले आहे. हे करीत असतांना त्यांनी आजवर याविषयी जे विवेचन केले गेले आहे, जी मतमतांतरे आढळतात, त्यांचाही थोडक्यात परामर्श घेतला आहे. आणि त्या अनुषंगाने आख्यान काव्याच्या स्वरुप-वैशिष्ठ्यांविषयींची आपली कल्पना स्पष्ट केली आहे.

या काव्य प्रकाराच्या उद्‌गमाचा आणि विकासाचा आलेखही त्यांनी आपल्या प्रस्तावनेत रेखाटला आहे. यादवकालीन गंगोत्रीपासून या काव्य प्रकाराचे एका विशाल महानदीत कसे रूपान्तर झाले, याचा त्यांनी रेखाटलेला प्रवास या काव्य प्रकाराच्या स्थितिगतीचे दर्शन घडवितो. या काव्य प्रकाराच्या जडणघडणीचे चित्र रेखाटताना त्याच्या निर्मितीमागील प्रेरणांचा व प्रयोजनांचा मागोवा घेण्याचाही त्यांनी प्रयत्न केला आहे

या पार्श्वभूमीवर त्यांनी 'हरिश्चंद्राख्यान' या मुक्तेश्वरी आख्यानाची वैशिष्ठ्ये शोधण्याचा प्रयत्न केला आहे. मुक्तेश्वराचे कथा निवेदन कौशल्य, त्याने केलेला रसपरिपोष, स्वभावचित्रणाची त्याची हातोटी, त्याची वर्णनशैली इ० विशेषांच्या विवरणाबरोबरच त्याच्या काव्यातील दोषांचेही विवरण संपादकांनी केले आहे अशा प्रकारे प्राचीन मराठी आख्यान कवितेच्या संपादनाचा त्यांचा हा पहिलाच प्रयत्न असला तरी तो लक्षात घेण्याजोगा आहे, असे मला वाटते. संहितेनंतर त्यांनी आवश्यक त्या टीपा देऊन अभ्यासकांना योग्य ते साहाय्यही केले आहे

संपादकांच्या या पहिल्यावहिल्या प्रयत्नांचे स्वागत करून त्यांच्या हातून उत्तरोत्तर अशाच प्रकारची व याहीपेक्षा सरस अशी साहित्यसेवा घडावी, अशी अपेक्षा व सदिच्छा [redacted] व्यक्त करतो.


डॉ. यू. म. पठाण

मराठवाडा विभाग
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

दिनांक १६ सप्टेंबर १९७७

# दोन शब्द

गेल्या काही वर्षांपासून मुक्तेश्वरांचे हरिश्चंद्राख्यान बी. ए. च्या वर्गाला शिकवीत असताना असे जाणवले की आख्यानांचा विचार साकल्याने करणारी काही पुस्तके उपलब्ध असली तरी स्वतंत्रपणे हरिश्चन्द्राख्यानाबद्दल विचार करणारे एकही पुस्तक नाही. या अपूर्णतेच्या जाणिवेतून व अध्यापनातील अडचणींमधून या पुस्तकाने आकार घेतला. गुरूवर्य डॉ. यू. म. पठाण यांनी प्रोत्साहन देऊन व पुरस्कारही लिहून मार्गदर्शन केले. तसेच, प्रा. गजमल माळी, डॉ. ग. मो. पाटील, डॉ. गो. मा. पवार यांनी वेळोवेळी चर्चा करून आमच्या विचारात मोलाची भर घातली. त्यांचे आभार मानणे औपचारिकपणाचे ठरेल. खरे तर आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

चित्रकार मित्र प्रा. धर्मराज भोअीर यांनी प्रतिकात्मक मुखपृष्ठ तयार करून या पुस्तकाला जो साज चढविला त्यात व्यवसायापेक्षा मित्रत्वाची भावनाच अधिक होती. आभार मानणे त्यांना कसे रूचणार ?

मुद्रक श्री. ढोळेके काका आणि नाथ मुद्रणालयातील कामगार वर्ग यांनी या पुस्तकासाठी अतोनात श्रम घेतले. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

या पुस्तकाद्वारे आमचे प्राध्यापक मित्र व विद्यार्थी यांच्या अध्यापन-अध्ययनातील अडचणी काही अंशी दूर व्हाव्यात अशी अपेक्षा आहे.

दादा गोरे
सौ. सुनेत्रा ओक

दि. २६ सप्टें. १९७७

# प्रस्तावना

**आख्यान कविता म्हणजे काय ?**

'आख्यान' शब्दाची उपपत्ती– आख्यान हा शब्द 'ख्या' या मूळ धातूपासून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ वर्णन करणे, सांगणे असा आहे. आख्यान या शब्दावरून, प्राचीनकाळी कथा सांगून लोकांची करमणूक करण्यासाठी हा शब्द उपयोजिला गेला असावा असे वाटते. पूर्वी पाठांतरास सोपे जावे म्हणून सर्वप्रकारचे वाङ्मय पद्यातच असलेले दिसते. त्यामुळे आख्यान कथा ही पद्यातच असल्याचे दिसून येते. प्रा. झीग असे म्हणतात की, 'प्राचीनकाळी आख्याने गद्य-पद्यरूपच होती. परंतु पुरेशा पुराव्या अभावी हे मत अमान्य झाल्याचे दिसते.

आख्यान-काव्याच्या प्रकारातूनच कीर्तन-गोंधळाची परंपरा विकसीत झालेली असावी. कीर्तनाच्या उत्तररंगात एखादी कथा निवेदन केली जाते. या कथेलाच सामान्यत: आख्यान असेही म्हणतात. कीर्तनात कथांची आवश्यकता असल्यामुळे आख्यान काव्ये लिहिली गेली असावीत. कीर्तनाच्या पूर्वरंगात सांगितले गेलेले एखादे तत्त्व, अधिक खुलवून सांगण्यासाठी बऱ्याचदा मनोरंजनाच्या पातळी-वरूनही, उत्तररंगातील कथा सांगितली जाते. एखादा कीर्तनकार आपल्या निवेदनात सुभाषिते, तात्त्विक विचार, विनोद व व्यवहारीक दृष्टात यांच्या साह्याने भक्ती व मुक्ती लोकांच्या मनात बिंबवण्यासाठी आख्यान सांगत असे.

प्राचीन संस्कृत साहित्यात 'आख्यान' या शब्दाची व्याख्या कोणी केलेली दिसत नाही. ऋग्वेद संहितेत संवादरूप सूक्ते आलेली आहेत. प्रा. आल्डेनबग यांच्या मते या अर्धनाटकी संवादातूनच आख्यानाचा प्रथम परिचय होऊ लागलेला आहे. उदा. पुरूरवा-उर्वशी संवाद वगैरे. आख्यान हा शब्द प्रथम ऐतरेय ब्राह्मणकात आलेला दिसतो 'शुनाःशेप आख्यान' असा प्रयोग तेथे वापरलेला आहे महाभारतात कथा, पुराण आख्यान, इतिहास हे शब्द समानार्थी वापरलेले आहेत. वैदिक कवींना 'इतिहास' व 'पुराण' या शब्दातून पौराणिक कथा, कथात्मक इतिहास व सृष्टी विषयक कथांचे ज्ञान होत असे. पुराणाला आपल्याकडे पाचवा वेद मानले जाते. या वेदातूनच आख्यानाची निर्मिती झालेली दिसते

प्रा. भगवंत देशमुख असे म्हणतात की, एखादी कथा आख्यान आहे किंवा नाही हे तिच्या मूलभूत भेदावरून ठरत नसून ती ज्या रीतीने निवेदन केली, गेली आहे, तिच्यावरून ठरतें.. आख्यान किती लहान किंवा मोठे असावे हे निश्चित करणे शक्य नसले तरी कथा-निवेदनाचा ओघ खंडित होईल इतके ते विस्तृत वर्णिलेले नसावे. त्यात एखादा प्रसग महत्वाचा व केंद्रिभूत असून इतर प्रसग त्याला परिपोषक असेच वर्णिले जावेत यासर्व प्रसगातून एक सलग व स्वयंपूर्ण असे कथानक आकारास यावे आणि त्याचा एकमेव परिणाम व्हावा.'

आख्यानातील कथा सांगितली जात असताना ती कथा ज्याच्याविषयी असते त्या व्यक्ती समाजामध्ये असामान्य, आदर्श नमुने म्हणून मान्यता पावलेल्या किंवा देवकोटीतील असतात. कथानक सतत त्यांच्या भोवतीच फिरत असते. यातूनच आख्यानकार त्याला जे काही सांगायचे असेल ते तत्त्व, सिद्धांत, विचार व्यक्त करीत असतो. येथे त्या व्यक्ती महत्वाच्या नसून त्याच्याद्वारे ज्या आदर्श जीवनमूल्याची जपणूक झालेली असते त्याचे त्या केवळ माध्यम असतात आदर्श जीवनमूल्यांना प्रत्यक्ष जीवन व्यवहारात स्थान मिळावे, समाजाकडून त्याची उपासना व्हावी म्हणून आख्यानविदांनी कथा-माध्यमाचा जाणीवपूर्वक वापर केलेला दिसतो

**आख्यान काव्याची परंपरा**

आजच्या इतके पूर्वीचे जीवन घटनांनी बद्ध नव्हते परंतु प्राचीनकाळातही घटना घडत होत्याच व मानवाच्या सतत बदलत्या जीवनावरही त्याचा परिणाम होत होता. हा बदल कधी स्वच्छने तर कधी नैसर्गिक बदलत्या अपरिहार्य परिस्थितीमुळे होत होता. घडणाऱ्या घटनाविषयी आपण आज जसे बोलतो, त्यांची कारण मिमांसा करतो तशीच पूर्वी माणसे करीत होती परंतु कोणत्याही घटनेचे सूक्ष्म निरीक्षण करणे, पाहिलेल्या, अनुभवलेल्या घटनाचे स्मरण ठेवणे आणि त्यांचा कोणताही अंश नाहीसा होऊ न देता त्यास शब्दातू सजीव करणे आणि भावी पिढीसाठी जपून ठवणे म्हणजेच वाङ्मय निर्मिती करणे. या गोष्टी उत्तर काळात शक्य होऊ लागल्या. या क्रियेने व स्मरणाने श्रुती–स्मृती–पुराण सर्व घटना आपल्या अनुभवाच्या माध्यमातून पुढील पिढीच्या स्वाधान करणे आपल्याला शक्य झाले प्राथमिक अवस्थेतील माणूस आजूबाजूस घडणाऱ्या घटनांमुळे स्वतःच इतका उत्तेजित होत असे की, त्याचे अलिप्ततेने निरीक्षण, स्मरण व शब्दांकन करणे त्याला शक्य होत नसे. घडणाऱ्या घटनांची कारण परंपरा व त्याचे परस्पर संबंध यामध्य एक प्रकारचा समतोल साधणे मनातील गोंधळामुळे त्याला शक्य होत नसावे. किंवा त्यापैकी काही घटनांची जाणीवपूर्वक नोंद घेण्याची गरजही

गरजही त्यास कदाचित वाटत नसावी नोंद घेतली न घेतली तरी त्याचे अस्वित्व मात्र परिणाम रूपाने उरत असे. जीवन प्रवाहाला निरनिराळे वळण लावणाऱ्या या घटना व्यक्ती जीवनातून पुसल्या गेल्या तरी समाज जीवनातून त्या विसरल्या जाणे शक्य नव्हते लोकस्मरणात या घटना जिवंत राहिल्या. कालांतराने त्यातील काही भाग पुरता विसरला गेला. घटनांचा संबंध दाखविणारी कारण परंपरा नष्ट झाली. त्यामुळे कल्पनेने नवी कारण परपरा निर्माण करण्यात आली अनंत घटना विषयीच्या कुतूहलातून दैवत कथांची (myths निर्मिती झाली या कथांचें वरचे पापुद्रे बाजूला सारल्यास मानवी मनाच्या विकासाच्या खुणा सापडतात या दैव कथामागील वास्तव सृष्टी म्हणजे त्या काळातील मानवी जीवनच होय.

मानवी मनाला कथेची ओढ सार्वत्रिक व सार्वकालिक असल्याची दिसते. प्राचीन काळातील लोकभाषांमधून असंख्य अलिखित कहाण्या, लोककथा, दंतकथा निर्माण झाल्या. या लोककथांची निवेदने करणारी घराणी निर्माण झाली, भाल्डी गोंधळी, चाट, विट, विदुषक ही परंपरा यातूनच निर्माण झाली. 'अख्यानविद' हा वैदिक काळातील शब्द आहे सूत, मागध, चारण व वंदी या घराण्यांनी पूर्वापार चालत आलेल्या कथांचा सांभाळ केला. या अलिखित कथांचे सस्करण करण्यात येऊन त्याचा समावेश वैदिक व पौराणिक वाङ्मयातून झाला पौराणिक काळात कथा-कथनांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. राजाच्या दरबारात कथाकथक असत. ब्राह्मणके, वेद, यज्ञसंस्था यात कथांचा समावेश होता ज्याप्रमाणे सत्यनारायणाच्या पूजेच्या वेळी साधुवाणी-लीलावतीची कथा सांगितली जाते. त्याप्रमाणे यज्ञप्रसंगी लोकरंजनासाठी या कथा सांगितल्या जात यामुळे आणखी एक परिणाम असा झाला की समोरील श्रोते व त्यांची बौद्धिक आणि भावनिक पातळी लक्षात घेऊन कथांची रचना झाली. हे वेगवेगळया काळातील आख्यानांवरून निश्चितपणे जाणवते. समाजातील सर्व स्तरातील लोक कथा ऐकण्यासाठी एकत्र येत. सामान्यजनांना या पारंपारिक कथा निवेदनातून वैदिक धर्माचे स्वरूप समजावून सांगणे हा या कथा निवेदनाचा मूळ हेतू होता. या पारंपारिक कथांच्या सकलनातून पुराणाची व महाकाव्याची निर्मिती झाली. शौनकाने या कथांचे पहिले संकलन केले. सूत हा त्याचा साथीदार होता. त्याने 'ब्रह्द्देवता' या नावाने कथांचे सकलन केलेले आहे. या कथांच्या पुनर्निर्मितीतून आख्यानाची परंपरा सुरू झालेली दिसते.

ऋग्वेद संहितेतील सूत्रांमध्ये देवांची स्तुती करणाऱ्या कथांचे उल्लेख आहेत. देव म्हणजे शक्ती मानून त्याच्यावर मानवी भावनांचा आरोप केलेला आहे. विश्वाचा विकास व विनाश करणाऱ्या वेगवेगळया शक्ती मानल्यामुळे या शक्तींची पूजा केल्यास मानवी जीवन सुरक्षित राहू शकेल. या भावनेतून सूर्य, चंद्र, वायू, अग्नी इत्यादीना मानवाने दैवी देहरूप दिले.

प्रा. भगवंत देशमुख असे म्हणतात की, एखादी कथा आख्यान आहे किंवा नाही हे तिच्या मूलभूत भेदावरून ठरत नसून ती ज्या रीतीने निवेदन केली, गेली आहे, तिच्यावरून ठरतें.. आख्यान किती लहान किंवा मोठे असावे हे निश्चित करणे शक्य नसले तरी कथा-निवेदनाचा ओघ खंडित होईल इतके ते विस्तृत वर्णिलेले नसावे. त्यात एखादा प्रसग महत्वाचा व केंद्रिभूत असून इतर प्रसग त्याला परिपोषक असेच वर्णिले जावेत यासर्व प्रसगातून एक सलग व स्वयंपूर्ण असे कथानक आकारास यावे आणि त्याचा एकमेव परिणाम व्हावा.'

आख्यानातील कथा सांगितली जात असताना ती कथा ज्याच्याविषयी असते त्या व्यक्ती समाजामध्ये असामान्य, आदर्श नमुने म्हणून मान्यता पावलेल्या किंवा देवकोटीतील असतात. कथानक सतत त्यांच्या भोवतीच फिरत असते. यातूनच आख्यानकार त्याला जे काही सांगायचे असेल ते तत्त्व, सिद्धांत, विचार व्यक्त करीत असतो. येथे त्या व्यक्ती महत्वाच्या नसून त्यांच्याद्वारे ज्या आदर्श जीवनमूल्याची जपणूक झालेली असते त्याचे त्या केवळ माध्यम असतात आदर्श जीवनमूल्यांना प्रत्यक्ष जीवन व्यवहारात स्थान मिळावे, समाजाकडून त्याची जोपासना व्हावी म्हणून आख्यानविदांनी कथा-माध्यमाचा जाणीवपूर्वक वापर केलेला दिसतो

## आख्यान काव्याची परंपरा

आजच्या इतके पूर्वीचे जीवन घटनांनी बद्ध नव्हते परंतु प्राचीनकाळातही घटना घडत होत्याच व मानवाच्या सतत बदलत्या जीवनावरही त्याचा परिणाम होत होता. हा बदल कधी स्वच्छने तर कधी नैसर्गिक बदलत्या अपरिहार्य परिस्थिती-मुळे होत होता. घडणाऱ्या घटनाविषयी आपण आज जसे बोलतो, त्याची कारण मिमांसा करतो तशीच पूर्वी माणसे करीत होती. परंतु कोणत्याही घटनेचे सूक्ष्म निरीक्षण करणे, पाहिलेल्या, अनुभवलेल्या घटनांचे स्मरण ठेवणे आणि त्यांचा कोणताही अंश नाहीसा होऊ न देता त्यास शब्दातू सजीव करणे आणि भावी पिढीसाठी जपून ठवणे म्हणजेच वाङ्मय निर्मिती करणे. या गोष्टी उत्तर काळात शक्य होऊ लागल्या. या क्रियेने व स्मरणाने श्रुती–स्मृती–पुराण सर्व घटना आपल्या अनुभवाच्या माध्यमातून पुढील पिढीच्या स्वाधीन करणे आपल्याला शक्य झाले प्राथमिक अवस्थेतील माणूस आजूबाजूस घडणाऱ्या घटनांमुळे स्वतःच इतका उत्तेजित होत असे की त्याचे आलिप्ततेने निरीक्षण, स्मरण व शब्दांकन करणे त्याला शक्य होत नसे. घडणाऱ्या घटनांची कारण परंपरा व त्याचे परस्पर संबंध यामध्ये एक प्रकारचा समतोल साधणे मनातील गोंधळामुळे त्याला शक्य होत नसावे. किंवा त्यापैकी काही घटनांची जाणीवपूर्वक नोंद घेण्याची गरजही

गरजही त्यास कदाचित वाटत नसावी नोंद घेतली न घेतली तरी त्याचे अस्तित्व मात्र परिणाम रूपाने उरत असे. जीवन प्रवाहाला निरनिराळे वळण लावणाऱ्या या घटना व्यक्ती जीवनातून पुसल्या गेल्या तरी समाज जीवनातून त्या विसरल्या जाणे शक्य नव्हते लोकस्मरणात या घटना जिवंत राहिल्या. कालांतराने त्यातील काही भाग पुरता विसरला गेला. घटनांचा संबंध दाखविणारी कारण परंपरा नष्ट झाली. त्यामुळे कल्पनेने नवी कारण परपरा निर्माण करण्यात आली अनंत घटना विषयीच्या कुतूहलातून दैवत कथांची (myths निर्मिती झाली या कथांचें वरचे पापुद्रे बाजूला सारल्यास मानवी मनाच्या विकासाच्या खुणा सापडतात या दैव कथामागील वास्तव सृष्टी म्हणजे त्या काळातील मानवी जीवनच होय.

मानवी मनाला कथेची ओढ सार्वत्रिक व सार्वकालिक असल्याची दिसते. प्राचीन काळातील लोकभाषांमधून असंख्य अलिखित कहाण्या, लोककथा, दंतकथा निर्माण झाल्या. या लोककथांची निवेदने करणारी घराणी निर्माण झाली, भारूडी गोंधळी, चाट, विट, विदुषक ही परंपरा यातूनच निर्माण झाली. 'अख्यानविद' हा वैदिक काळातील शब्द आहे सूत, मागध, चारण व वंदी या घराण्यांनी पूर्वापार चालत आलेल्या कथांचा सांभाळ केला. या अलिखित कथांचे संस्करण करण्यात येऊन त्याचा समावेश वैदिक व पौराणिक वाङ्मयातून झाला पौराणिक काळात कथा-कथनांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. राजाच्या दरबारात कथाकथक असत· ब्राह्मणके, वेद, यज्ञसंस्था यात कथांचा समावेश होता ज्याप्रमाणे सत्यनारायणाच्या पूजेच्या वेळी साधुवाणी-लीलावतीची कथा सांगितली जाते. त्याप्रमाणे यज्ञप्रसंगी लोकरंजनासाठी या कथा सांगितल्या जात यामुळे आणखी एक परिणाम असा झाला की समोरील श्रोते व त्यांची बौद्धिक आणि भावनिक पातळी लक्षात घेऊन कथांची रचना झाली. हे वेगवेगळ्या काळातील आख्यानांवरून निश्चितपणे जाणवते· समाजातील सर्व स्तरातील लोक कथा ऐकण्यासाठी एकत्र येत. सामान्यजनांना या पारंपारिक कथा निवेदनातून वैदिक धर्माचे स्वरूप समजावून सांगणे हा या कथा निवेदनाचा मूळ हेतू होता. या पारंपारिक कथांच्या संकलनातून पुराणाची व महाकाव्याची निर्मिती झाली. शौनकाने या कथांचे पहिले संकलन केले. सूत हा त्याचा साथीदार होता. त्याने 'बृहद्देवता' या नावाने कथांचे संकलन केलेले आहे. या कथांच्या पुनर्निर्मितीतून आख्यानाची परंपरा सुरू झालेली दिसते.

ऋग्वेद संहितेतील सूक्तांमध्ये देवांची स्तुती करणाऱ्या कथांचे उल्लेख आहेत. देव म्हणजे शक्ती मानून त्याच्यावर मानवी भावनांचा आरोप केलेला आहे. विश्वाचा विकास व विनाश करणाऱ्या वेगवेगळ्या शक्ती मानल्यामुळे या शक्तींची पूजा केल्यास मानवी जीवन सुरक्षित राहू शकेल. या भावनेतून सूर्य, चंद्र, वायू, अग्नी इत्यादींना मानवाने दैवी देहरूप दिले.

भारतीय मनाच्या भावीक दृष्टीमुळे कथा भोवती धार्मिक वलय निर्माण झाले. ऋग्वेदात असलेली संवाद सूक्ते, ही एक प्रकारची आख्यानकेच होत. परंतु याच्या निर्मितीमागे धार्मिक, आध्यात्मिक अधिष्ठान असल्याचे दिसते. अशी संवाद सूक्ते एकूण २० आहेत. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात ९५ व्या सूक्तात एकूण अठरा ऋचा आहेत त्यात पुरूरवा–उर्वशी, यम-यमी संवाद, सत्यकामजाबालाख्यान नचिकेता व मृत्यू संवाद, सूर्य विवाहाचे संवादरूपाने वर्णन आलेले आहे. पुरूरवा–उर्वशी संवाद ही कथा पुढ बऱ्याच ग्रंथात आलेली आहे. उदा. बोधायन, श्रोतसूत्र; हरिवंश, विष्णूपुराण, विक्रमोर्वशीय इत्यादी.

या सर्व संवादरूपी आख्यानामागील प्रेरणा मानवी समाजाच्या कल्याणा-च्याच आहेत. यामागील प्रेरणा ईश्वर विषयक आस्तिक्य बुद्धी आणि मानवी जीवनाबद्दलची मंगलशुभकारी भावना हीच असल्याचे दिसून येते. म्हणून श्राद्ध प्रसंगांही आख्याने ऐकावी असे मनूने म्हटले आहे.

बौद्ध–जैन धर्मियांनीही धर्मतत्व प्रसारासाठी कथा माध्यमाचा उपयोग केलेला दिसतो. बौद्धांचे त्रिपीटक, बौद्ध जातक कथा, दीपवंस व महावंस ही बौद्ध महाकाव्ये. 'दीपवंस' म्हणजे लंकेतील बौद्ध धर्माचा आख्यानात्मक इतिहास होय तर 'महावंस' हे त्याचेच महाकाव्यरूप आहे. जैनाचें आगमसाहित्य व नंतरचे टीका वाङ्मय यातून धार्मिक आचार विचारांचे स्पष्टीकरण केलेले आढळते. पुढे कथा-सरित्सागर, पचतंत्र, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी अशी कथा संकलने झालेली आहेत.

प्रा. गजमल माळी यांच्या मते प्राचीन कथांमध्ये तीन प्रवाह असलेले स्पष्टपणे दिसून येतात. पहिल्या प्रवाहात कथाच्या कलात्मक मूल्यांची अनभिज्ञता दिसते धर्माचे एक आवश्यक अंग म्हणून त्याचा विकास झालेला आढळतो. यज्ञ वा धार्मिक विधी प्रसंगी सांगितलेल्या कथातून दिव्यत्वाची व आदर्श जीवनमूल्यांची प्रतीती आणून देणे हे उद्दिष्ट आढळते.

**मराठी आख्यान कथा**

मराठी वाङ्मयाचा इतिहास पाहता, आपल्याला जसा महानुभव गद्याचा प्रथम विचार करावा लागतो, त्याचप्रमाणे आख्यान-काव्याचा विचार करतानाही आख्यान काव्य निर्मितीचा पहिला मान महानुभावांनाच द्यावा लागतो. मराठी आख्यान कवितेची परंपरा लक्षात घेताना पहिली परंपरा महदाइसापासून मोरोपंतापर्यंत ५०० वर्षांची ठरते. दुसरी परंपरा शाहिरी वाङ्मयापासून सुरू होऊन आधुनिक खंडकाव्यापर्यंत आलेली दिसते. इ. स. १२८६ मध्ये लिहिले गेलेले

महदबेचे 'धवळे' हे मराठीतील उपलब्ध असलेले पहिले आख्यानकाव्य होय. देवभक्ती ही मराठी आख्यान कवितेची मूळ प्रेरणा असून महदंबा एकदा धवळे गायला सुरूवात केल्यानंतर ते सहजतेने आणि सरसतेने शेवटपर्यंत म्हणत जाते. त्यामुळे महदंबेने नकळत आख्यान काव्याचे वैशिष्टच प्रकट केले आहे. ज्याप्रमाणे पुढील काळात लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृति-चित्रांत' चरित्र वाङ्मयाची कलामूल्ये नकळत प्रगट झालेली आढळतात. नेमका तोच प्रकार इथेही झालेला दिसतो. धवळ्याप्रमाणेच महदंबेनें मातृकी रुक्मिणी स्वयंवरही लिहिले. या दोन्हीच्या पाठीमागे आध्यात्मिक प्रेरणा असूनही भक्तिभावनेतून व्यक्त होताना दिसते. येथें अध्यात्म व कथा एकरुप झालेल्या दिसतात हे महदंबेला मिळालेले यश होय.

काही समीक्षक नरेंद्राचे व सामराजाचे रुक्मिणी स्वयंवर, संस्कृत महाकाव्याचें आदर्श समोर ठेवून लिहिल्या गेलेल्या काव्यांना आख्यान काव्याचे सुसंस्कृत सालंकृत घाटाचे रूप मानतात. परंतु ही काव्ये आख्यानके नसून त्या कवीकडून त्यास महाकाव्याचा साज देण्याच्या प्रयत्नात अयशस्वी झालेली विदग्ध महाकाव्ये होत. ही काव्ये महाकाव्याच्या पातळीवर जाऊ शकली नाहीत म्हणून त्यांना आख्यानकाव्य म्हणणे योग्य वाटत नाही. कारण आख्यान काव्याची सहजसुंदरता व ओघ त्यात आढळत नाही. उलट हा काव्यप्रकार महाकाव्याचे एक बिघडलेले रूप दाखवितो. कारण प्रतिभेचे सामर्थ्य जीवनाची भव्यजाण, अनुभवाची पार्श्वभूमी न लाभल्यामुळे व बाह्य अनुकरण शैलीमुळे तंत्र महाकाव्याचे येऊनही झेप मात्र तोकडी पडली. त्यामुळे महादंबेने नकळत निर्माण केलेल्या आख्यानकाव्याच्या मानदडांनाही (norms) न्याय मिळाला नाही.

इ स. १३१३ मध्ये दामोदर पंडिताने लिहिलेल्या 'वछाहरणा'त कृष्णाच्या लीलांपैकी काही प्रसंग वर्णिले आहेत. त्यांना आख्यानाचे रूप आलेले दिसते. त्यात अद्भूतता व चमत्काराला महत्व आलेले असून त्यामुळे भक्तीरसात रम्याद्भूततेचे रंग मिसळलेले दिसतात. दामोदर पंडिताची विद्वता व कल्पकता यात जरी दिसत नसली तरी उत्तम आख्यानास आवश्यक अशा सुसंगत, सलग व स्वयंपूर्ण कथानकाच्या रचनेवर भर दिलेला नाही.

महानुभावांची नाव घेण्याजोगी आख्यानकाव्ये अशीही येवढीच आहेत याविषयी डॉ. ग्रामोपाध्ये असे म्हणतात की, "भक्ती मुक्तीच्या प्रयोजनार्थ निर्माण झालेली कथा भक्तीरसपूर्ण होणे व अध्यात्मिकता आणि कथात्मकता यांचा समतोल साधून घाटदार व्हावयास हवी होती. परंतु काही प्रमाणात 'धवळे' सोडले तर अन्य महानुभाव आख्यानात हे दिसत नाही."

दामोदर पंडितानंतर मराठी आख्यान कवितेत पुन्हा एका कवयित्रीच्या आख्यान काव्याचा विचार करावा लागतो. ती म्हणजे संत जनाबाई. जनाबाई ही वारकरी पंथातील एक श्रेष्ठ कवयित्री आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी जाणीवपूर्वक मराठी भाषेचा उपयोग वाङ्मय निर्मितीसाठी केलेला आहे. जनाबाईची सर्व आख्याने अभंग या छंद प्रकारात जमा होतात. जनाबाईने प्रल्हादचरित्र, कृष्णजन्म, हरिश्चंद्राख्यान, थालीपाक, द्रौपदीवस्त्र हरण वगैरे आख्याने लिहिलेली आहेत जनाबाईने आख्यानासाठी अभंग हा रचना प्रकार वापरल्यामुळे व स्त्री सुलभ शब्द रचनेमुळे वर्णनशैली आकर्षक व अकृत्रिम झाली असून उत्कट भक्ती भावनेमुळे तिची आख्याने रसाळ झाली आहेत.

डॉ. नांदापूरकर जनाबाईच्या आख्यानाबद्दल असे म्हणतात की, " तिच्या आख्यानातील सौंदर्यगुणाची मोहिनी केवळ सामान्यजनावरच नव्हे तर मुक्तेश्वरासारख्या प्रतिभासंपन्न कवीवर देखील एवढी पडली की हरिश्चंद्राख्यान, थालिपाकाख्यान, द्रौपदीवस्त्रहरण या मुक्तेश्वराच्या रचना त्या त्या ( जनाबाईच्या ) आख्यानाच्या अनुकरणातूनच निर्माण झाल्या.

इ स. १३७८ ते १४७८ या काळात बरीच आख्यान कविता लिहिली गेली असून ती पूर्वीच्या आख्यान कवितेपेक्षा बरीचशी वेगळी आहे. महानुभाव कवींच्या समोर असलेले संस्कृत काव्याचे आदर्श जाऊन त्याऐवजी भागवतादी पुराणाचे आदर्श आख्यान कवींसमोर असल्याचे दिसतात. या काळात चोंभाकृत 'उखाहरण' विष्णुदास नाम्याचे हरिश्चंद्राख्यान, शुकाख्यान व द्रौपदीस्वयंवर, तसेच नामा पाठकाचे चंद्रहास कथा इ. आख्यान काव्यें लिहिलेली दिसतात.

या कालखंडानंतर मात्र इ. स. १५७१ मध्ये लिहिलेले एकनाथाचे रुक्मिणी-स्वयंवर हे काव्य प्रमुख मानावे लागेल, एकनाथ हा मुळात प्रवचनकार असल्यामुळे प्रवचनकारात असलेला उपदेशक त्यांच्या आख्यानकवितेत प्रभावी ठरलेला दिसतो. महानुभाव किंवा विठ्ठल, सामराज या कवींच्या कवितेहून एकनाथांची आख्यान कविता सर्वस्वी वेगळी वाटते. कारण तिचे उद्दिष्ट व स्वरुप वेगवेळे आहेत.

एकनाथाच्या आख्याना संबंधी विचार करताना असे म्हटले गेले आहे की, 'सुबोध भाषा, सुस्पष्ट मांडणी, कथांतर्गत व्यक्तींच्या सुक्ष्म मनोभावनांचे आलेखन, कथा वर्णनाच्या ओघात आपल्या काळातील जीवनाचे घडविलेले दर्शन, संधी सापडेल तेथे केलेला नीतीबोध व आध्यात्मिक रूपकांच्याद्वारे कथेतून अनेक ठिकाणी काढलेला तात्विक अर्थ हे नाथांच्या रचनेचे विशेष म्हणता येतील.

यापूर्वीच्या कवींच्या काळात तात्कालीन राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब कुठेही जाणवत नाही परंतु एकनाथ याला अपवाद वाटतात

एकनाथांचा नातु मुक्तेश्वर यांनी विपूल प्रमाणात आख्यान रचना केली असून त्यांच्या काव्यात मराठी आख्यानाला एक वाङ्मय प्रकार म्हणून अधिक आकर्षक रूप प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यांच्यापासून मराठीतील पंडित काव्याच्या परंपरेला प्रारंभ झालेला दिसतो.

यानतर प्रथम सीता स्वयंवराची कथा आख्यान काव्यात आणणाऱ्या वेणाबाईने मुक्तेश्वराने साधलेले कलात्मक घाटाचे सौंदर्य नाहीसे करून आख्यान कविता पुन्हा भक्ती मार्गाकडे वळविली.

वेणाबाईनंतर आपल्या विपूल रचनेने आख्यान काव्यात मोलाची भर टाकणाऱ्या वामन पडित व त्याची शिष्य मडळी यांची नावें आपणास घ्यावी लागतात. वामन पंडित हा मुळात पंडित असल्यामळें त्याने अनेक पांडित्यपूर्ण आख्याने लिहिली आहेत. त्यातील अहिल्योद्धार, सीता स्वयंवर, भीष्मयुद्ध, पार्थभाग्य, थालिपाक, वेणुसुधा, नामसुधा, राधाविलास, राधाभुजंग इत्यादी आख्याने प्रसिद्ध आहेत. वरील आख्यानाची नावे लक्षात घेतली तर आपणास असे दिसते की, वामन पडिताने रामायण, महाभारत, भागवत, कृष्णचरित्र या सर्व कथानकामधून आख्यानाची रचना केलेली दिसते वामनासमोर संस्कृत काव्याचा आदर्श जरी नव्हता तरी परंतु रचनेच्या सबधी मात्र ती रचना वृत्तबद्ध असून संस्कृतमधील विविध वृत्तांची तिच्यात योजना केलेली दिसते असे म्हणता येईल. वामन पंडिताच्या आख्यानाचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे वामनाला असलेला पांडित्य प्रदर्शनाचा हव्यास व शब्दचमत्कृतींचा सोस. यामळे त्याच्या काव्यात क्लिष्टता व रुक्षताही आलेली दिसते वामनाने भक्तीमार्गाचे साधन म्हणून जरी आपली कविता लिहिलेली असली तरी भक्तीभावना प्रकट करताना शृंगाराच्या माध्यमाचा आधार घणे त्याला अपरिहाय झालेले दिसते एवढेच नाही तर हा शृंगार उत्तानतेच्या पातळीवर गेल्यामुळे बऱ्याचदा त्यातून भक्ती भावना व्यक्त झालेली दिसत नाही.

वामनानतर मात्र सामराज, नागेश, रघुनाथ पंडित, विठ्ठल, अवचितसुत काशी, आनंदातनय इ आख्यान कवीनी आख्यानके लिहून आख्यान कवींमध्यें आपले स्थान स्थिर केले आहे. सामराजाचे रुक्मिणी स्वयंवर हे संस्कृत विदग्ध महाकाव्याच्या धर्तीवर रचलेले असल्यामुळे त्यास आख्यान काव्य म्हणता येणार नाही. सामराजाचें मुद्गलाख्यान मात्र आख्यान कवितेत मोडते. विठ्ठलाने पांचालीस्तवन,

रसमंजिरी, विव्दज्जीवन, सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंर इत्यादी आख्याने लिहून व त्यासाठी चित्रबंधनाचा उपयोग करून निर्जीव व चमत्कृतीपूर्ण रचनेची भर आख्यान काव्यात टाकली. नागेशाचे चंद्रावळी वर्णन व सीतास्वयंवर पाहिल्यानंतर आपणास असे दिसते, की त्याच्यासमोर असलेले संस्कृत काव्यादर्श व त्यानुसार त्याने केलेली श्लोकबद्ध रचना यामुळे विठ्ठलाने निर्जीव केलेली आख्यान कविता काव्यहीन व हिडीस झालेली दिसते. नागेशावरही ताण करणारा अवभ्रितसुत काशी याच्या सीतास्वयंवर या आख्यानात त्याने सर्गबद्ध रचना, पद्मबंध, चक्रबंध, इत्यादी बंधाची योजना करून रचनेच्या दृष्टीने नाविन्य साधले असले तरी आख्यान कवितेच्या घाटात कृत्रिमतेची अधिक भर घातलेली दिसते. आनंदतनयानें मात्र आख्यान कवितेत प्रथमच चूर्णिकेचा उपयोग आपल्या मार्कंडेयाख्यानात केलेला दिसतो. सीतास्वयंवरासारख्या आख्यानात त्याने अधून मधून "कोण तुझ्या मनासि येतो, मांग हो सीते" अशा प्रकारच्या पदाची योजना केलेली दिसते.

रघुनाथ पडिताच्या नावावर उपलब्ध असलेल्या नलदमयंती स्वयंवर व हरिश्चद्राख्यान यात आध्यामिक प्रेरणा आणि भक्ती व मुक्तीचे प्रयोजन त्याने सोडलेले दिसते. मानवी मनाच्या भावना नलदमयंती स्वयंवराख्यानात व्यक्त करून रघुनाथ पडिताने आख्यान कविता देवाकडून मानवाकडे आणलेली दिसते. प्रेम, विरह या मानवी भावना त्यांच्या नायक-नायिकांमध्ये दिसत असून त्यातून रघुनाथ पंडिताचा शृंगारकथा हेतू स्पष्ट दिसतो.

मराठी कथात्मक कविता अशी कृत्रिम झाल्यानंतर श्रीधराने मात्र तिला रसाळ व भावनोत्कट रूप देऊन सावरून धरलेले दिसते. शिवलीलामृत, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप यात अनेक आख्याने आहेत. सहजता, नादमधुर भाषा लोकांना आवडतील अशा कथांची निवड, साधी, सरळ, सोपी, अभिव्यक्तीची पद्धती, भावनांचे परिणामकारण चित्रण व सामान्य जनांच्या भावलेला आवाहन करण्याचे त्याचे सामर्थ्य व आख्यानाच्या शेवटी जोडलेली त्याची फलश्रुती यामुळे श्रीधर हा अतिशय लोकप्रिय आख्यान कवी समजला जातो. श्रीधरानंतर सुदाम-चरित्र, गजेंद्रमोक्ष ही आख्याने लिहिणारा कचेश्वर व मध्वमुनी सारखा मधुरपदे लिहिणारा कवी, हेच काय ते उल्लेखनीय आख्यान कवी होय.

'वाटे चरित्र त्यांचे आपण काही तरावया गावे' या भावनेतून प्रचंड कला निर्मिती करणारे रामभक्त मोरोपंत हे आपल्या आगळ्या वैशिष्ट्यांनी पडित कवीच्या प्रभावळीत वेगळे वाटतात आपल्या व्यासंगी, विद्वत्तापूर्ण आत्मोद्धाराची तळमळ असणारा बहुश्रुत रसिक, शब्दप्रभू, रचनाचातुर्य इत्यादी गुणांनी त्यांनी आख्यान कवीत वेगळे स्थान निर्माण केले आहे. मोरोपंतानी

अंबरिष, किरातार्जुन-युद्ध. हंसकाक कथा, दुष्यंत-शकुंतलाख्यान, रुक्मिणी विवाह-कथा हरिश्चद्राख्यान, प्रल्हादविजय, सुदाम चरित्र इत्यादी आख्याने लिहून आपल्या वेगळ्या शैलीने आख्यान काव्यात भर घातली. त्यांच्या आख्यान काव्यात संस्कृत-प्रचुरभाषा, लांबलांब समास, अनेक प्रत्यय, आणि चमत्कृतीपूर्ण अलंकार, यामुळे क्लिष्टता व दुर्बोधता आली असून त्यामुळे जनसामान्यापासून त्यांचे काव्य थोडेसे दूरच राहिलेले दिसते. असे जरी असले तरी त्यांची कविता अध्यात्म आणि कथाकथन या दोन पायावर उभ्या असलेल्या आख्यान कवितेत सहज सामावून जाते मोरोपंतांनी क्लिष्ट व दुर्बोध केलेली आख्यान कविता त्यांच्याच समकालीन असलेल्या निरंजन माधवाने त्यातून सोडविली. त्याने जागरूकतेने 'सुभद्राचंपू काव्यात चूर्णिकेचा उपयोग करून त्यातील दुर्बोधता व क्लिष्टता दूर केली.

याच काळात मराठी कवितेला शाहिरांनी लावणी व पोवाड्याद्वारे वेगळाच साज चाढविलेला दिसतो पोवाड्यात प्रामुख्याने वीररसप्रधान ऐतिहासिक घटनांचे वर्णन केलेले दिसतें. तर लावणीमध्यें सामान्यत: शृंगाराला प्राधान्य देऊन त्यास बऱ्याचदा अध्यात्माची जोड दिलेली दिसते. पोवाडे एका अर्थाने आख्यानेच होत. मनोरंजन व स्फूर्तीदायकता हे दोन्ही त्यामुळे साधलेले दिसते. असे असूनही लावणी पोवाड्यातील आख्यानाचे स्वरुप त्यातील गेयतेमुळे व लौकिक जीवन-दर्शनामुळे पूर्वीच्या आख्यानापेक्षा निराळे दिसते. त्या काळातील प्रमुख म्हणजे शाहीर रामाजोशी, सगनभाऊ, होनाजीबाळा, प्रभाकर इ. होत.

इंग्रजी अमलात इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनाने व त्यातील नाविन्यानें प्रभावीत होऊन मराठी कवितेच्या आशय व अभिव्यक्ती या दोहोंच्या स्वरूपात अमुलाग्र बदल झालेला दिसतो. इंग्रजीतील कथात्मककाव्याच्या धर्तीवर मराठीतही खंडकाव्यात्मक रचना झालेली दिसते. यशवंतांची जयमंगला, गिरीशांची कमळा व अंबराई, कुंटे यांचे राजा शिवाजी इत्यादी खंडकाव्ये या काळात दिसतात. परंतु ही रचना विपूल प्रमाणात दिसत नाही. आधुनिक काव्यात प्रचलीत असलेल्या दीर्घ कथात्मक कवितांनाही आख्यान कवितेचेच एक वेगळे रूप म्हणावे लागेल अर्थात त्यांच्या निर्मिती मागील प्रयोजन भिन्न आहे. चंद्रशेखरांची 'काय हो चमत्कार !', गडकऱ्यांची 'प्रेम व मरण' आणि 'राजहंस', 'बींची कमळा' पु शि. रेग यांची 'रंग पांचालिका', पाडगावकरांची 'शर्मिष्ठा' इत्यादी कवितांनाही आधुनिक आख्यान काव्याचेच स्वरूप आलेले आहे असे म्हणावे काय, असा प्रश्न पडतो.

**मुक्तेश्वर**

मुक्तेश्वरांच्या जन्मकालासंबंधी वाद आहे. त्यांचा जन्म पैठण येथे झाला. संत एकनाथांच्या मुलीचा तो मुलगा होय. मुक्तेश्वराचे चरित्र इतिहाला

बरेचसे अज्ञात आहे. उपलब्ध असलेल्या माहितीवरून मुक्तेश्वर पैठणला राहात असत. त्यांच्या आईचे नाव गोदावरीबाई किंवा गंगाबाई होते. एकनाथांनी आवडीने ठेवलेले नाव लीला असे होते पैठणास असलेल्या मुद्गलांच्या घराण्यातील चिंतामणशास्त्री यांच्याशी लीलाचा विवाह झालेला होता चिंतामणशास्त्रींना नाथ विश्वंभर असे म्हणत. याच लीला-विश्वभराचा पुत्र म्हणजे मुक्तेश्वर होय. मुक्तेश्वरांची गुरू परंपरा दत्त–जनार्दन–एकनाथ-चिंतामणी उर्फ लीलाविश्वंभर–मुक्तेश्वर अशी आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी व सुवर्णपुरीचा भैरवनाथ हे त्यांचे कुलदैवत होय.

मक्तेश्वराचे वंशज कुरूंदवाडजवळ तेरवाड येथील इनामदार आहेत. तेथे मुक्तेश्वराचे वृंदावन असून दत्त मूर्तीची स्थापना केलेली आहे इ स. १७५० मध्ये दिलेल्या सनदेत पुढील वाक्ये आहेत– 'राजश्री मुक्तेश्वर गोसावी विप्र आकाण्ण गोसावी गोत्र अत्री, वास्तव्य मौजे कुरुंदवाड- आपले पणजे राजश्री थोरले मुक्तेश्वर गोसावी हे श्री एकनाथ स्वामींची कन्या गंगाबाईचे पुत्र यांचे वृंदावन मौजे तेरवाड येथे आहे.

**मुक्तेश्वराची लेखन–संपदा :**

१. संक्षेप रामायण.

२. मुक्तेश्वरी महाभारत :

अ. आदिपर्व, ब. सभापर्व, क. वनपर्व

ड. विराटपर्व, इ. सौप्तिकपर्व.

३. स्फूट लेखन : हरिश्चंद्राख्यान, शतमुखरा-वणवधाख्यान. मुर्खांची लक्षणे, भगवद्गीता, शुक-रंभ संवाद, श्री एकनाथ चरित्र, पदे व आरत्या इ.

**मुक्तेश्वराचे हरिश्चंद्राख्यान :**

मुक्तेश्वराप्रमाणे त्याच्या आधीच्या व नंतरच्या काही कवींना हरिश्चंद्राच्या कथेने मोह घातलेला दिसतो. जनाबाई, विष्णुदासनामा, मोरोपंत व श्रीधर यांनीनी हरिश्चद्राख्यान लिहिले आहे. हरिश्चद्राख्यान संस्कृत महाभारताच्या मूळ कोणत्याही प्रतीत नाही. मुक्तेश्वराने हे प्रथम स्वतंत्र रचून नंतर त्याची वेळ येताच ते त्याने रचलेल्या महाभारतात योग्यस्थळी चपखल बसविलेले आहे. असे डॉ. नांदापूरकर याचे मत आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या मते मुक्तेश्वरानें जनाबाईच्या हरिश्चद्राख्यानाचा आधार घेऊन आपली रचना केली असावी

मक्तेश्वरकृत हरिचंद्राख्यानाच्या बऱ्याच प्रती उपलब्ध आहे. त्या प्रतीवर शकही वेगवेगळे दिलेले आहेत. काहीवर १७०४, १६८२ तर आम्ही अभ्यासलेल्या

प्रतीचा लेखनकाल १६७० असा आहे. त्याच प्रमाणे ओवीं संख्याही भिन्न आहे. यावरून या प्रती मुळ मुक्तेश्वराच्या हातच्या नसून कोणीतरी मुक्तेश्वराच्या प्रतीवरून पुनर्लेखन करून स्वतःचा शक त्यावर घातला असावा असे वाटते. काहींच्या मते अध्यायांच्या आरंभीच्या व शेवटच्या ओव्या प्रक्षिप्त असाव्यात.

**मुक्तेश्वरी रचनेची वैशिष्ठ्यें –**

मुक्तेश्वरांच्या एकंदर लेखनाचा विचार करता काही वैशिष्ठ्ये हरिश्चद्रा-ख्यानात दिसून येतात. काही अध्यायाचा शेवट करतांना पुढाल कथेची प्रस्तावना-थोडक्यात कथानक मुक्तेश्वर करतात. पहिल्या अध्यायाच्या शेवटी –

आता पुढे रसाळ कथा । निद्रा लागतां नृपनाथा ।
स्वप्नामाजी तत्त्वता । दान मागेल कौसिका ॥

दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी –

आता येथूनी कथा वाहीनि । भरोनी चालेल सत्वजीवनि ।
नाना विघ्ने–गिरिभंगोनि । कैवल्येंसागरी मीळेंल ॥

तिसऱ्या अध्यायाच्या शेवटी –

पुढील कथेची सुचना । पहीले वीकीले नीजांगणा ।
तयापाठी नृपवंदना । सेवटी आपणा विकीले ॥

वरीलप्रमाणे अध्यायांच्या शेवटी, पुढील कथाभागाची सूचना देण्याचे कारण असे असावे की, मुक्तेश्वरा समोर असणारा श्रोतृवर्ग होय. श्रोतृवर्गाची उत्सुकता जागृत करून, पुन्हा दुसऱ्या दिवशीही ही रसाळ कथा ऐकण्यासाठी त्यानी परत यावे. असा या प्रस्तावनेमागे मुक्तेश्वराच्या मनात कुठेतरी हेतू असावा असे लक्षात येते.

त्या काळातील सर्वच कवी हे आधी निरुपणकार होते नंतर कवी होते. त्यांना वाचकवर्गाची अपेक्षा असण्यापेक्षा श्रोत्यांची अपेक्षा होती. कारण लेखनाची साधने फारशी सोपी नसल्यामुळे साहित्याचा लेखनाद्वारे प्रसार होण्यापेक्षा निरुपणा-द्वारेच अधिक होत होता. त्यामुळेच त्याकाळात कीर्तनकार व पुराणीक यांचा एक वर्गच तयार झालेला दिसतो. पुराण–कथन पद्धतीचाच एक आविष्कार म्हणून मुक्तेश्वर असेही सांगताना दिसतात की, ही कथा ऐकल्यावर सर्व दोष नष्ट होतात. हे त्याचे फलीत होय असे ते सांगून जातात.

श्रवण करिता दृष्टकर्मा । पासाव सुटती प्राणिया ॥ ५ ॥ अ. १ ला
श्रवणे नाशती दोष सर्व । मुक्तेश्वर कवि म्हणे ॥ ११८ ॥ अ. २ रा

आपण सांगत असलेली कथा अत्यंत सुबोध व रसाळ आहे. याची सार्थ जाणीव मुक्तेश्वरांना असल्याचेही आपणास दिसते. शिवाय या गोष्टीचा अभिमानही बाळगताना ते दिसतात. असे असूनही त्यांनी आपली नम्रता कुठेही ढळू दिलेली नाही. या दृष्टीने खालील ओव्या लक्षात घेता येतील-

आता पुढे रसाळ कथा, कथा नर्मदा रसवाहींनि,
मुक्तेश्वर कवीची वाणी । पुष्प लतीका वचनसुमनि,
मुक्तेश्वराचे बोलणे परिसता नीवति संतश्रवणे

मुक्तेश्वरांनी आपल्या आख्यान काव्यात आध्यात्मिकता व कथात्मकता यांचा संगम साधन्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. परंतु हा प्रयत्न करताना त्यांची कविता भक्ती-मुक्तीच्या प्रयोजनातून सुटून अचानकपणे मानवी पातळीवर आलेली दिसते. या आख्यानातील हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास या व्यक्ती तर मानवी आहेतच परंतु विश्वामित्र, वसिष्ठ वगैरे त्याहून वरच्या कोटी-तील व्यक्तीरेखासुद्धा मानवी असल्या तरी सामान्य मानवापेक्षा त्याच्या कृतींमुळे, सत्वशीलतेमुळे त्यांना व्यक्तीमत्वाची एक विशिष्ट उंची प्राप्त झालेली असावी, अशी अपेक्षा श्रोत्यांकडून केली जाते. परंतु या पातळीवरून खाली येऊन त्यांना मनोरंजनाच्या पातळीवर मुक्तेश्वर कधी उतरवितो हे त्यांनाच समजत नाही. त्यामुळे ही कथा केवळ कथा कथनासाठी अवतरली असावी काय, अशी शंका निर्माण होते

मुक्तेश्वर आपल्या निवेदनाच्या ओघात कित्येकवेळा कालविपर्यास करताना दिसतात. त्याचप्रमाणे आपण कोणत्या स्वभावाच्या, कोणत्या स्तरातील व वयाच्या व्यक्तिरेखा रंगवीत आहोत याचेही भान अनेकवेळा सुटलेले दिसते.

रोहिदासाला लहान म्हणावे तर तो विश्वामित्राला म्हणतो –

रोहिदास म्हणे जी रुषी । मि गहान राहीन तुम्हापासी ।
पीतृवचनांच्या रूणासी । उत्तीर्ण होईन स्वामिया ॥
रुणहत्या आणि वैर । मेलीया न चुके निर्धार ।
यालागी धरूनि शरीर । जन्मोजन्मी फेडीति ॥

असे तत्वज्ञान तो मोठ्या व्यक्तीप्रमाणे विश्वामित्रला सांगतो. रोहिदास मोठा म्हणावा तर वारंवार तारामती अत्यत वात्सल्याने व्याकुळ होऊन शोकमग्न अवस्थेत –

कवण मागेल मजभोजन । कवणा पाजूं स्तनपान ।
कडेये घेवूनीया वचन । बोला आता कवणासांसी ॥

ही ओवी व –

उभी राहोनि वेल्हाळा । पोटेंसी कवळन सुकुमार बाळा ।
स्तन घालुनि मुखकमळा । कुरवाळुनि बुझावी ।।

वरील ओव्यात तारामती रोहिदासाबरोबर तो अतिशय लहान समजून जसे वागते (स्तन घालुनि मुखकमळा) यामुळें रोहिदासाची व्यक्तीरेखा विस्कळीत झालेली दिसते.

मुक्तेश्वर कथा, कथनाच्या ओघात हरिश्चंद्राच्या काळाचे भान विसरून अचानकपणे स्वतःच्या काळात शिरतो. त्याच्या काळातील सामाजिक स्थिती, चालीरीती या सर्वांचे उल्लेख अभावितपणे त्याच्या लेखनात येतात.

शेवटी सत्वपरीक्षेला उतरल्यानंतर हरिश्चंद्र आणि तारामती यांना निरोप देताना लक्ष्मी, पार्वती, सावित्री वगैरे देवस्त्रिया व ऋषीपत्नी तारामतीला आपापली पुण्ये देऊन म्हणजे जणूकाही तिची ओटी भरून तिची बोळवण करतात. बोळवण करण्याची ही प्रथा मुक्तेश्वराच्या काळातील होय. त्याचप्रमाणे स्वतःच्या पुण्याची बढाई इंद्रसभेत सांगताना विश्वामित्र म्हणतात की, यवनमुखाने पवित्र वेद वाचावे त्याप्रमाणे हे घडत आहे. यातील यवनांचा उल्लेख हरिश्चद्र काळात असूच शकत नाही.

या काव्याचे आणखी वैशिष्टच असे की, मुक्तेश्वरी लेखनाच्या प्रथमावस्था यात स्पष्टपणे दिसून येतात. पात्रांचे स्वभाव विशेष, रसपरिपोष घडविताना मुक्तेश्वर कमालिचे गडद व भडक रंग वापरतात विश्वामित्रासारखो खलपात्रे एकतर टोकाचे खलत्व दाखवितात, नाही तर दुसऱ्या टोकाला जाऊन सुजनत्व दाखवितात त्याचप्रमाणे हरिश्चद्र–तारामती हे दोघेही आदर्शाचे नमूने दाखवायाचे असले तरीही त्याच्यात 'माणूस' म्हणून असलेले काही विकार शिल्लक राहाणारच; हे गृहीत न धरता मुक्तेश्वरानी त्यांना अतिशय सत्त्वशाल रंगविले आहे. इतकेच नव्हेतर रोहिदासासारखे पाच–सहा वर्षाचे पोरही जेव्हा त्यांच्याच पंक्तीला जाऊन बसण्याइतकी सुजानता दाखविते, त्याप्रमाणे बोलते, चालते, वर्तन करते, तेव्हा या सर्वच व्यक्तीरेखा बेगडी व सपाट वाटू लागतात. काळे आणि पांढरे रग मुक्तेश्वरांनी सारख्याच ताकदीने वापरल्यामुळे पात्रांच्या स्वभावातील फिक्या–गडद रंग छटाचा मनोरम खेळ त्यांच्या या काव्यात कुठेही आढळत नाही. रसपरिपोषातही करूण रसापेक्षा अद्‌भुत आणि बीभत्स या रसांकडे मुक्तेश्वरांचा ओढा अधिक दिसतो वास्तविक हरिचंद्राख्यानात शृंगार, करुण, वत्सलता, वीर आणि भक्ती या रस परिपोषालाही भरपूर वाव होता. परंतु रोहिदासाच्या मृत्यूनतरचा

तारामतीचा शोक सोडला तर कुठेही करुणरसाचा परिपोष एकंदर कथानकाच्या मानाने जेवढा व्हावयास पाहिजे तेवढा झाल्यासारखा वाटत नाही. सुरवातीचा नृत्यांगनाचा शृंगारही बळेच ओढून ताणून आणल्यासारखा वाटतो.

अर्थात हे सर्व दोष मुक्तेश्वरी आख्यानात निर्माण होण्याचे कारण केवळ मुक्तेश्वराची लेखनातील प्रथमावस्था हे नसून त्यामानाने अप्रगल्भ असलेला श्रोतृवर्ग हाही असू शकेल. त्यामुळे श्रोतृवर्गाच्या आवडीचा व कुवतीचा विचार करून आख्यान तयार करणे मुक्तश्वराला भाग पडले असावे. असेही समर्थन त्याच्या बाजूने करता येण्याजोगें आहे.

मुक्तेश्वरांच्या हरिचद्राख्यानातील एकंदरीने जाणवणाऱ्या अभावांचा विचार केल्यानतर त्यांची प्रकर्षाने जाणवणारी गुणवैशिष्ठचेही नमूद करणे आवश्यक आहे. त्यांनी जी रूपके आपल्या काव्यात उत्तम प्रकारे पूर्णावस्थेला नेलेली आढळतात. त्यापैकी पहिल्या अध्ययातील हरिश्चद्राच्या कुळाच्या वर्णनाचे रूपक अतिशय सुंदर साधलेले आहे. ओवी ६२ ते ६४ त्याचप्रमाणे दुसऱ्या अध्यायातील ८१ व्या ओवीतील संसारसागरातील जहाजाचे रुपकही असेच आहे.

आपली कथा रसाळ आहे, असे मुक्तेश्वर म्हणत असले तरी रसाच्या दृष्टीने मुक्तेश्वराला फारसे यश आलेले दिसत नाही. परंतु विवेचनाच्या ओघात मुक्तेश्वर कधी कधी "पंचप्राणाचे बीरडे" अशा शब्दासारखे बोली शब्द अतिशय चतुरतेने उपयोगात आणतो. त्यामुळे अर्थदृष्टा बऱ्याचवेळा अशी रचना उपयुक्त झालेली दिसते बोली भाषेतील चांगले शब्द जसे मुक्तेश्वर वापरतात तसेच "मढा" सारखा ग्राम्यशब्दही मुक्तेश्वर वापरता.

पहिल्या अध्यायात विश्वामित्राच्या सिद्धाश्रमाचे वर्णन करतांना मुक्तेश्वराने वनशोभेचे परतु पारपारिक वर्णन केलेले आढळते. वनशोभा वर्णन हा सस्कृत महाकाव्याचा एक आवश्यक भाग मानला गेला थोडयाफार फरकाने त्याचे अनुकरण करणाऱ्या मराठी कवींनीही तो उचललेला दिसतो. परंतु महाकाव्याचे अनुकरण करणाऱ्या बहुतेक सर्व कवींनी वनशोभेचे कृत्रिम आणि अतिशयोक्त वर्णन केलेले आढळते तसे मात्र मुक्तेश्वराचे झालेलें आढळत नाही. सर्वप्रकारची फुलें एकाच ऋतून फुललेली दाखविली असली तरीही ज्या सिद्धाश्रमात "नकुळसर्प क्रिडती सुखें ' किंवा उलका निरउनी पिलियासी । वायसे जाती चारमासी" अशी स्थिती आहे. त्या ठिकाणी हेही अशक्य वाटत नाही.

दुसऱ्या अध्यायामध्यें हरिश्चंद्र–तारामती वनवासास निघाल्यानंतर नागरिकामध्य झालेला शोक त्याचप्रमाणे पशु–पक्षी आणि निर्जीव चित्रे यांची

झालेली स्थिती मुक्तेश्वराने उत्कटतेने वर्णन केलेली आहे. पुढे काशी क्षेत्री जात असताना राजा, राणी आणि राजपुत्र यांना प्रवासात जी स्थिती भोगावी लागली, तिचे वर्णन आणि वाटेतील विश्वामित्राने मायाजालाने निर्माण केलेल्या पानपोईचे वर्णन, मुक्तेश्वरानी चित्रमय पद्धतीने रेखाटले आहे काशी क्षेत्रातील बाजारात पत्नी–पुत्राला व स्वत.ला विकण्यासाठी उभा राहिलेल्या, हरिश्चंद्राच्या निमित्ताने केलेले बाजाराचे व तेथील नागरिकांचे वर्णन, तसेच दास म्हणून विकले जात असताना डोक्यावर तृण बांधून नेण्याची पद्धत या सर्व गोष्टी मुक्तेश्वराच्या काळाचे प्रतिनिधित्व करतात असे वाटते असे जरी असले तरी बाजाराचे मुक्तेश्वरानें काढलेले चित्र जिवंत वाटले.

व्यक्तिरेखांचा विचार करता हरिश्चंद्र आणि तारामती या काव्याच्या नायक, नायिकापेक्षा छोट्या रोहिदासाची व्यक्तिरेखा अधिक आकर्षून घेते. आपण एका उच्च कुलातील आदर्श अशा सत्वशील राजाच्या पोटी जन्म घतलेला राजपुत्र आहोत हे स्थान रोहिदास केव्हाही सोडता दिसत नाही काही वेळी त्याचे बोलणे, वागणे अतीप्रौढ वाटले तरी त्याच्या व्यक्तिरेखाशी सुसंगत असेच वाटते. त्याचप्रमाणे विश्वामित्र प्रतिज्ञा करताना मानवी पातळीवर येऊन बोलत असला तरी कथानक धावते ठेवण्याच्या दृष्टीनें त्याची खलनायकी व्यक्तिरेखा कथानकाचा एक आवश्यक भाग वाटते. वीरबाहू डोंब व त्याची पत्नी यांच्या छोट्या व्यक्ति–रेखा मनात कुठेतरी ठसा उमटऊन जातात.

एकंदरीत हरिश्चन्द्राख्यानाचा विचार करता चांगल्या आख्यान काव्यास आवश्यक असणारा महत्त्वाचा निकष म्हणजे कथानकाचा ओघ खडीत होऊ न देता सतत धावता ठेवणे व श्रोत्याला पुढील कथानकाची उत्सुकता निर्माण करणे, मुक्तेश्वराला चांगल्या प्रकारे साधलेले दिसते.

हरिश्चन्द्राच्या सत्व परीक्षेचे फलीत म्हणून शेवटी सर्वत्र आनंदी आनंद होत असला, तरी मुळात हे आख्यान शोकात्मक असल्यामुळे, ते सुखान्त झाले तरीही मनावर एकंदर परिणाम होतो तो मात्र भीषण शोकात्मिकेच्या पातळीवरचाच.

●

॥ श्री ॥

# मुक्तेश्वरकृत हरिश्चंद्राख्यान

## अध्याय पहिला

प्रारंभी श्रीगजाननाला व शारदेला नमन करून कवीने आख्यानाला सुरुवात केली आहे. हरिश्चंद्रराजाच्या भेटीसाठी नारदमुनींचे आगमन होते. राजा त्यांचे यथोचित स्वागत करतात. नारद प्रसन्न होऊन, आशीर्वाद देऊन इंद्रदरबारी येतात. इंद्राने त्यांचे स्वागत केल्यावर नारद हरिश्चंद्राचे गुणगान गातात. ते ऐकून वशिष्ठमुनींना अतिशय आनंद होतो, परंतु विश्वामित्राचा क्रोधाग्नी भडकतो. ते राजाचे सत्वहरण करण्याची प्रतिज्ञा करतात.

वसिष्ठमुनी राजाला सावधतेचा इशारा देऊन निघून गेल्यानंतर विश्वामित्र आपल्या मायाजालाने अरण्यात हिंस्रस्वापदे निर्माण करतात. लोकांच्या विनंतीला मान देऊन राजा त्यांची शिकार करण्यासाठी अरण्यात सैन्यासह जातो. तेथे श्वापदांना ठार करून राजा शिवाच्या देवालयात विश्रांती घेत पहुडला असता विश्वामित्राने निर्माण केलेल्या दोन गुण लावण्यवती तरुण नर्तकी तेथे येतात. त्या आपल्या नृत्यगान कुशलतेने राजाला रिझवतात. तेव्हा राजा त्यांचा गौरव करण्यासाठी आपल्या हातातील रत्नखचीत ककण त्यांना देऊ करतो. परंतु ते न स्विकारता त्या राजाच्या सहवासाची इच्छा प्रकट करतात त्यामुळे राजा त्यांना प्रधानाकरवी हाकलून देतो. तेव्हा अपमानीत झालेल्या त्या युवती आकांडतांडव करीत विश्वामित्राकडे परत येतात व त्यांना सर्व हकीगत अतिशयोक्तीने सांगतात.

विश्वामित्रांना अनावार क्रोध येतो व ते रागारागाने राजाकडे येऊन त्याला वाक्ताडन करतात परंतु राजा त्यांच्या चरणावर मस्तक ठेऊन त्यांची क्षमा मागतो राजा देवालयात परत येऊन तारामतीच्या मांडीवर मस्तक ठेवून झोपतो. पुढील अध्यायात पुढील कथाभाग सुरू होतो.

॥ श्री गणेशाय नमः ॥

ॐ नमो जी गजानना । नागानन पन्नगभुषणा ।
येकदंता द्विनयना । मुशकवाहना तुज नमु ॥ १ ॥

नमू शारदा ब्रह्मनंदिनी । शुक्लांबरि शुक्लभुषणि ।
अर्चुनि नमिली सुरमुनि । हंसवाहनि ते नमुं । २ ।

नमु संसारमोहतमांतका । मुमुक्षसाधकस्वपद दायका ।
दुर्धरभवार्णवि तारक नौका । देहधारि द्विभुजु । ३ ।

आतां नभूं श्रोते जन । ज्ञानवैराग्यभक्तिसाधन ।
मज कृपेने देउनि वरदान । कथानुसधान परिसावे । ४ ।

बृहदस्वा ह्मणे धर्मा । ऐक हरीश्चंद्राचि महिमा
श्रवण करिता दृष्टकर्मा । पासाव सुटती प्राणिया । ५ ।

मोक्षस्त्रियाचि आधीष्टाश्री । सातामाजि प्रथम पुरि ।
धर्मस्वरूप जीमाझारी । राज्य करी हरीश्चंद्र । ६ ।

कामकरिलागि जो हरी । साधु सज्जन सुधाकरी ।
त्रासी पाळी या लागी हरी । श्चंद्रनाम तयातें । ७ ।

सुर्यवंश-क्षीराब्धी-सोम । किर्ति प्रकाशे उजळीत व्योम ।
प्रज्जावल्लितें सुख परम । यालागि हरीश्चंद्र । ८ ।

वीर सत्वांचा कनकमेरू । दानि मेघ तसा उदारू ।
प्रजापाळणि कमळावरू । शक्रातुल्य प्रतापि । ९ ।

आपुलि अज्ञासींधुवनी । परीध करुनि धराकामिनि ।
प्रताप वीर्य भोगुनि जनि । वरासनि विराजे । १० ।

ऐसा राजा चक्रवर्ति । सभामंडळि विशाळकिर्ति ।
सींहासनी निर्जरपति । शोभे तैसा शोभला । ११ ।

बैसला वेष्टित वीर प्रधानि । उभय भागि वेत्र (पा)णि ।
मंगळ तुरांचीया ध्वनि । गगनि न समाये । १२ ।

सभे साधु ऋषेश्वर । कथा चर्चा रागोधार ।
तेणें श्रवणें राजेश्वर । सुखें निर्भर मानसीं । १३ ।

तंव अकस्मात गगनपंथे । नारद मुनि पातला तेथे ।
वीणा वाजवी (मधुर हा)तें । वदनि गात वीष्णु कथा । १४ ।

जो ज्ञानारविंदिचाच मकरंदु । वैराग्य (व)ल्लिचा मुळ कंदु ।
वीवेकसागरीचा पुर्णेंदु । तो नारदु पातला । १५ ।

रायें देखतांची नयनिं । धावोनि मस्तक ठेविला चरणिं ।
जयजयकारें महामुनि । सिंहासनिं बैसवीला । १६ ।

कनकपात्रिं शुद्ध जळें । रायें चरण क्षाळण केलें ।
आंगि चदन चर्चीलें । भाळी रेखिलें केशर । १७ ।

नाना पुष्पयाति माळा । गणित नांहि सुगंध परिमळा ।
नैवेद्य तांबुलादि सोहळा । करुनिं पुजीला नारदु । १८ ।

देखोणि रायाचि वीनयभक्ति । नारद सुखावला चीत्तिं ।
ह्मणे राया येश कीर्ति । वृधी पावो चिरकाळ । १९ ।

पुण्ये प्रतापि तोचि शृष्टि । जो सत्व राखे संकटी ।
भविष्यमान वदोनि गोष्टि । आज्ञा घेऊनिं निघाला । २० ।

आला शुक्राचीया भुवना । सवेग पातला मंडपस्थाना ।
इंद्रे नमुनियां चरणा । केलें पुजना विध्युक्त । २१ ।

सभा दाटली घनदाट । बैसले विश्वामित्र वशिष्ट ।
आणिकहि श्रेष्ठ श्रेष्ठ । तपोनिष्ठ बैसले । २२ ।

लाहोनि शक्राचा बहुमान । नारदें आरंभीले कीर्तन ।
बदता जाला महिमाना । अयोध्यापुरपतीचें । २३ ।

भुमंडळी शरयुतटीं । अयुध्यापुरी अति गोमटि ।
मज पाहतां सकळ श्रुष्टी । न दिसे दृष्टी आणिक । २४ ।

यक आज्ञा यक छत्रि । नवखंडे सर्व धरत्रि ।
वरी वीराजे वीर क्षेत्री । हरीश्चंद्र नृपनाथु । २५ ।

तो सत्यसत्वाचा शिरोमणि । परोपकारि परम ज्ञानि ।
दु.खदारीद्रवार्ता कर्णि । ऐकों नेंदि जगाच्या । २६ ।

परीसोनिं नारदाच्या गोष्टी । वशिष्ट सुखावला पोटिं ।
सभे गर्जोनें ह्मणे गोष्टि । उपमा त्यासी तो येक । २७ ।

नारदाचीया वचनवातें । गाधीजकुंडी क्रोधाग्नि चेतें ।
वरी वशीष्टवाक्याच्या घृतें । शिखा गगनातें कळविति । २८ ।

खदिराग्निकुंडातल्या नयन । करुनि वदनच्यापिहुन ।
सोडिता जाला अति तिक्षण । शब्दज्ञान सतेज । २९ ।

वशिष्टपादपाआडुन । विधो इछी भुपहरण ।
तयासी वारील कवण । कृपापूर्ण गुरुचि । ३० ।

तया सत्वाची पाखर । जडोनि ठेली सबाह्यांतर ।
तेथें रुषीचे वाग्शर । केंवी शरिर स्पर्शती । ३१ ।

असो विश्वामित्र वचनें । बोलिला तें परिसा श्रवणें ।
कठोर परि मवाळ सुमनें । पुण्ये परागें मघमघति । ३२ ।

निर्जरसभेसी भुपाळकिर्ती । वानितांची तेज लाजति ।
सुर्यापुढें दीपज्योति । तेज कैसें मीनलें । ३३ ।

समर्थापुढें रंकमहिमा । मेरूसी योजिली वाल्मीकउपमा ।
कनेरअर्कि कल्पदृमा । समान कैसें ह्मणावे । ३४ ।

वसिष्ट ह्मणे जी रुषिराया । व्रथा कोप कायसा वायां ।
धर्म सत्व शांति दया । असे जया तो श्रेष्ठ । ३५ ।

तो धीर सत्वाचा महामेरू । अढळपदी जेवि का धुरू ।
सुर्यवंशाचा शृंघारू । नृपवरु हरीश्चंद्र । ३६ ।

परीसोनियां वसीष्टाचीया गोष्टी । विश्वामित्र सक्रोध दृष्टी ।
ह्मणें मि छळीतां येइल श्रुष्टी । रक्षी पाठी कवण असे । ३७ ।

मज विश्वामित्र रुषिपुढें । भुपाळसत्व कायसें बापुडें ।
क्षणांमाजी करीन वेडें । वचन धडपुडें बोलीला । ३८ ।

येरु ह्मणें तैच घडे । यवनमुखी जै वेद पढे ।
माझे पुर्वज रौरौ कुडें । भोगीजेत सप्तही । ३९ ।

नातरि मि या शिखासुत्रा । वेगळें होनें कुरुक्षेत्रा ।
माजी दानया करपात्रा । स्पर्श करीन अधमाचें । ४० ।

आणिक ऐका प्रतिज्ञावचनें । नरकपाळि सुरसान ।
करीती गोत्रजाचे हनन । हे दोष गहन मज घडो । ४१ ।

ऐसीया दोषाचे पर्वत । सत्व टाकितांच नृपनाथ ।
मस्तकिं घेउनि निरकांते । पुर्वजासहित बुडेन ४२

परीसोनियां वसिष्टाचिया वचना । विश्वमित्र करि प्रतिज्ञा ।
नृपसत्व ढाळीन नाना । यत्नें करुनि सर्वथा । ४३ ।

जरी उतरेल माझीया कसी । तरी देइत जोडलीया सुकृतासी ।
तथास्तुशद्बें पल्लवासी । येरें ग्रंथी बांधलि । ४४ ।

माझीया तपाच्या असंख्य कोटीं । ज्या न समाति ब्रह्मांड उवटीं
कोणति ह्मणाल तरी कर्णपुटि । श्रवण केलें पाहिजे। ४५ ।

ज्या तपे म्यां अपर श्रुष्टी । नीर्मिली आणिक चर्मदृष्टी ।
रविबींब अवलोकितां द्रुष्टी । गळोनी पडलीं बुबुळे । ४६ ।

माजी नीघाले ज्ञाननयनें । घेतलें सुर्याचे दर्शण ।
वातांबु आणि पर्णाशन । केलें वरुषें कोटी दाहा । ४७ ।

लोहे चूर्ण भक्षुनि वनि । तपलों पंचाग्निसाधनि ।
रेतकुंडी पद्मासनी । जपलों अब्दे कोटी दाहा । ४८ ।

ऐसीया तपाच्या बळें । मृत्यु जींकिला तये वेळे ।
नृपा वोपीन तत्काळें । (जरी माझिया कसी उतरेल । ४९ ।

ऐसा दोघांचा संवाद । होताचि उठला नारद ।
इंद्र म्हणे कायसा वाद । शब्दे शब्द वाढला । ५० ।

हटा पेटोनिया दोघे । प्रतिज्ञा करोनिया वेगे ।
विश्वामित्र परम रागें । सित्धाश्रमासि पैं गेला । ५१ ।

सूर्यवंशीचा अभिमानी । अयोध्ये गेला वशिष्ट मुनि ।
विश्वामित्रे शिष्य दोन्ही । गुप्त पाटसी पाटविले । ५२ ।

तुह्मी जाउनिया गुप्त । पाहोनिया सकळ वृतांत ।
येरी जाउनिया तेथे । मुनी नेमस्त न सांगे । ५३ ।

इंद्रसभेमाजि वाद । दोघा जाला प्रज्ञाशब्द ।
यालागि राजा सावध । करावयालागि तो गेला ।५४।

वशिष्ट आला ऐसे कर्णि । शब्द ऐकता धावला चरणि ।
मुनीते नमस्कारोनि सिबिकायानी । बैसउनि आणला ।५५।

गुढिया उभविल्या नगरी । तोरणे मखरे घरोघरी ।
जयजयकार मंगळ तुरी । वसिष्ट नगरी प्रवेशे ।५६।

राये आणोनि महिंद्रालया । कनकपाठी बैसविले तया ।
सहकुमार नरेंद्रजाया । येती जाली नरेंद्रा ।५७।

ऋषीचरणी ठेउनि माथे । येरे स्पर्शिले अमृतहस्ते ।
हृदई आळिंगोनि तयाते । मंगळ शब्दे गौरवी ।५८।

षोडश उपचारी पूजा पत्रि । कनक कुंभि जल पवित्री ।
पूजा करोनि साग मत्री । धरीली छत्रा आवडी ।५९।

अर्घ्यपाद्यादि व्यवसाने । सुगंध गंधे सुवास सुमने ।
नैवेद्य तांबुल निरांजने । कनक तबकि ठेविली ।६०।

ऐसिया उपचारे पूजोनि मुनि । राजा उभा जोडोनि पाणी ।
विश्वामित्रवचन मनि । स्मरोनि बोले वसिष्ट ।६१।

सविताचळापासोनि निर्मळ । तुजपर्यंत कुळी कीर्तिजळ ।
भरोनि प्रवाहपूर तुंबळ । अरिअचळ भंगावया ।६२।

ऐसी वंशगंगा पवित्र । तयासि जन्हु विश्वामित्र ।
शोषावया पसरोनि वगत्र । करु बैसें यज्ञासि ।६३।

मुं)ळीच पवित्र स्वर्ग भुवनि । वरी विराजे रुषिवदनि ।
पुढें मीरवे अभिधानि । ज्याण्हवि ऐसें विख्यात ।६४।

नृपसर्वें ते शूध हाटक । रुषिकोपाग्निसंगे चोख ।
मोला चढे आधिकाधिक हें जानिजे सुजानि ।६५।

रुषि ह्मणे गा राजया । भले सत्व रक्षणि सांडनें काया ।
करुनि मांडीति ते स्वर्गाल्या । अक्षइ भोग भोगिति ।६६।

सीबीं राजा चक्रवर्ती । सुर्यवंशी प्रख्यातकिर्ति ।
सत्वरक्षनिं मांस तुकिती । देहे कापोनि ताजवां । ६७ ।

ऐंमिया वंशीचीया राया । आणिक परिसें गुणालया ।
वना न जावें मुनिचिया । सदना गमन न कीजे । ६८ ।

संकेत दाउनि रायासी । वसिष्ट गेला तपासी ।
राजा सावध अर्हर्णिसी । आयोधेसी सर्वदा । ६९ ।

येरीकडे सीद्धाश्रमि । विश्वामित्र अभीचार कर्मि ।
मातांग यांग सकामि । करीता जाला साक्षपे । ७० ।

शुद्ध पाहुनिं भुमिका । निमंत्रोनिं याज्ञिका ।
अकरो कुंडे षकोनिका । नीर्मोली मृतिका शोधोनि । ७१ ।

अथर्वनवेदीचे पाठक । अभिचारकर्मि शक्तिक ।
नानां द्रव्यें अनेक । पुष्पयाति आरक्त । ७२ ।

सींदुर कुंकुम रक्तचंदनें । अर्क कनेर जासुंद सुमनें ।
रक्तकुंभ प्रेतासनें । मांसपत्रें चरूंची ७३

श्रवदनें पूर्णाहुति । होतां प्रगटली आदिशक्ति ।
ह्मणे कोण काम तुझा चीत्तिं । सांग निरूति मुनिवर्या । ७४ ।

तिर्थे पूर्ण भरलें घट । शुद्धी कवल्नें भरलें ताट ।
स्छापुनि शक्तिचें पीठ । होमारंभी रुषीनें । ७५ ।

स्नान करूनियां श्रोनिर्ति । नग्नांगि बैसोनि हर्ति ।
यज्ञ-कंकन बांधोनि सोडिती । पिंगट जटा मोकळचा । ७६ ।

मध्यें बैसोनिं आपण । कुंडि स्छापिला हुताशन ।
शवापात्रें अवदान , मंत्रोचारें टाकिति । ७७ ।

अहुति टाकितां मद्यमांसि । धुम्र दाटला आकाशिं ।
कर्पट घाणि बैसली शिशिं । वदानि घ्राणी दाटोनि । ७८ ।

सप्तरंगी ज्वाळा उठति । अकरा कुंडी सासष्टी आहुति :
हविता देवि पावली तृप्ती । मातांगशक्ति भवानि । ७९ ।

सहस्रावदानें पूर्णाहुति । होतां प्रगटलि आदिशक्ति ।
ह्मणे कोन काम तुझें चीतीं । सांग निरुति मुनिवर्या । ८० ।

रुषि ह्मणे हेचि मागणें । क्रुर स्वापदी भरी कानन ।
निकें ह्मणोनि उदारवचन । देति जालि वरदान । ८१ ।

विश्वामित्र तये वेळे । देवि वरदाचिया बळें ।
करिता जाला श्वापदकुळें । जीव हींसके बनवासी । ८२ ।

पक्षें मासें अयनें अब्दें । प्रसवला वनि अनेक श्वापदें ।
विस्तारें वदिजे तरी शब्दें । ग्रंथ जाइल षाल्हाळि । ८३ ।

दंति शृंगी नखि क्रुर । निर्मिले श्वापद गणाचे भार ।
पादहीन पक्षधर । खेचर, भुचर, भुगर्भी । ८४ ।

कानन व्यापिलें श्वापदें । मातलि भाक्षुनि मांस मदें ।
गर्जति भयानक शब्दें । त्रास देति जगातें । ८५ ।

कृषी नव जाति कृषीक । तीर्थयात्रेसी पांथीक ।
वेव्हार सांडीला व्यवसायकें । धेनु वनातें नव जाती । ८६ ।

भयें वनि न रिघे कोन्ही । कल्पांत भावीति सकळ प्राणि ।
ह्मणति घाला राजकर्णि । जाउनि सदनि रायाचे । ८७ ।

प्रजा जाउनि राजसभें । जाहार करुनि राहीले उभे ।
ह्मणती तुझीया सौर्यसुयंप्रभे ऽ माजि पशुतम दाटलें । ८८ ।

सांगावया योग्ये नव्हे मातु । न संगतां आमुचा प्राणांतु ।
श्वापदें मातलि वनांआंतु । करीति घातु जगाचा । ८९ ।

ऐकोनि पौरजांचि वाणि । राजा विचारी अंतःकरणि ।
गुरुवचन मानुनि मनि । राहता जनि अपकिर्ति । ९० ।

वनि निवटुनि श्वापदगणा । सुखी करावे सनळा जना ।
वसीष्ट कोपला तरी चरणा । वरी मस्तक ठेवीन । ९१ ।

ऐसें वीचारुनि चीतिं । पाचारीला वाहिनिपति ।
म्हणे जाने वनांप्रति । सेनांसिद्ध करावी । ९२ ।

तेणें आहटील्या भेरी । वाजती रणतुरे मोहरी ।
वीरश्री वसनें महावीरीं । परिधान केली तात्काळ ।९३।

अस्वगजरथादि वहनि । वळघल्या वीरांचीया श्रेनि ।
अयोध्यानगरीच्या वदनि । हुनि बाहेरी निघाले ।९४।

पुढें पायांचे मोगर । पांठी अश्वरोहीं वीर ।
मत कुंजराचे भार । उर्ध्वसुंडें धांवति ।९५।

तया पुष्टि दीव्य पताका । भासे सेना सागरीं नौका ।
कर्ण आवळे मस्तका । वरी अंकुश सुकानु ।९६।

नाना वाद्यांचीया ध्वनी । राजा आरुढला वहनि ।
तारामति शिबिका यानि । सेनागर्भी चालतां ।९७।

छत्रछायतळीं नृपवर । वीरस्त्रियेंसि विराजे विर ।
नगरिं ठेउनि राजकुमर । पुरिबाहेर निघाला ।९८।

राजा प्रवेशला महावनि । श्वापदें कळप देखिले नयनि ।
ते शस्त्रि प्राशबंधनि । वधोनि धरोनि पाडिति ।९९।

ऐसे रायें मारीले कळप । उरलि स्वापदें लपीती द्विप ।
येका आंगि भरला कप । मृत्य धाकें पळताती ।१००।

येरीकडे गांधिज मुनि । परम अल्हाद भानिला मनि ।
पुरीत्यागे महावनि । राजा आला ह्मणोनियां ।१०१।

आश्रमा आनावया राव । रुषीनें केलें लाघव ।
कुरंग निर्मिला अपूर्व । कनककांति साजीरा ।१०२।

तुझ्या स्वरूपरज्जुने गळा । बांधोनि आनावें नृपाळा ।
निके ह्मणोनि चरणकमळा । नमुनि गेला वनासी ।१०३।

मृगरावो आला राया समिपु । राजा पाहे तो कनक वपु ।
नरनाथ हृदइं कामनासर्पु । फुफाट करीतु उठीला ।१०४।

गुणि लाउनियां बाण । घेउं पाहे कुरंगप्राण ।
येरें फोडीलें किरान । भुमि चरण न थारे ।१०५।

राजा लागला तयापाठीं । धांवता जाला अति कष्टि ।
पळत आला आश्रमानिकटि । विश्वामित्र रुषीच्या । १०६ ।

अंतरें राहोनियां उभा । पाहत ठेला वनश्रीशोभा ।
वनसरोजी नेत्ररोरंभा । सुखअमोद लाधला । १०७ ।

ते वर्णश्री वर्णीवि कवणें । उपमे आनंदवन उनें ।
नानावृक्षी फळें सुमनें । सुवासें दाटलीं । १०८ ।

यक ते सरळ शाखाहिन । यक शाखामंडीत पूर्ण ।
तया आंगि लतिका वेष्टन । करुनि जाति सुरवाडे । १०९ ।

कर्पूरकर्दळि नारकेळीं । च्युतवृक्ष लविनले फळि ।
कंटक फळांची नव्हाळि । लागले मुळि असंख्य । ११० ।

द्रांक्षि मंडपातळि दाट । धांवति अमृतसाचे लोट ।
फणस फळें त्यागुनि बेटं । दाविति वाट सिंधुची । १११ ।

जाइ जुइ चंपक मालति । बकुळें मोगरें कंचन सेंवति ।
केतकीवनें मघमघिति । पराग क्षिति सुगंध । ११२ ।

आगर चंदन देवदार । हरिश्चंदन मैलागर ।
वृक्षीं वेष्टीत वेषधर । भुतें जैसी निधान । ११३ ।

निग्रोध पालास्य पिंपल तरु । जे कां देवत्रयांचें अवतारु ।
बील्व तुळसी हरीहरु । ज्या पत्रीं तोषति । ११४ ।

अनेक वृक्षाचीया जाती । माजीं पशु पक्षि क्रीडति ।
कनककल्हारें शोभति । पूर्ण जीवनें तडाग । ११५ ।

ऐसी सिद्धाश्रमिंची वाटिका । देखोणि रायें वारिलें कटका ।
आपणं प्रधानपदनायका । वांचोनि आनिका येवो नेंदि । ११६ ।

प्रवेश करीतां तये वनिं । राजा आश्चीर्य देखे नयनि ।
घेनुं व्याघ्र येके स्छानि येकमेकातें चाटीती । ११७ ।

नकुळ सर्प क्रीडति सुखें । मार्जरस्तना लागली मुशके ।
सींह करी हे कौतुके । वनामाजी विचरती । ११८ ।

उलका निरउनि पिलीयांसी । वायसें जाति चारयासीं ।
विश्वामित्रामाया ऐसी । सहसा न कळे मानवा । ११९ ।

निर्वैर श्वापदांचे गण । देखोणि विस्मित रायाचे मन ।
पुढें जातां सुगंध जीवन । तडाग पूर्ण देखिले । १२० ।

तया कासार जीवन स्नानें । करीतां विश्रांति लाहीजें मनें ।
परीधान करुनि दिव्य वसनें । देवालयें निघालि । १२१ ।

कर्दळीद्रौणि हेमकमळें । नानां पुष्पें सुगंध परीमळें ।
कनककुंभी भरोनिं जळें । शीवागारीं प्रवेशे । १२२ ।

सोमकांत श्वेत शीखर । माजी वीराजे कर्पुरगौर ।
द्वारीं ढवळ नदीकेश्वर । मनोहर शोभला । १२३ ।

भावे पुजुनिं गीरीजावर । नमन केलें जोडुनिं कर ।
भार्येसहीत राजेश्वर । स्वस्छानिं बैसले । १२४ ।

विश्वामित्रें मातांगि कामिनि । गुणि रुपसा नाचनि ।
राया समिप दोघीजनी । देउळांगणा प्रेरील्या । १२५ ।

रुषीअज्ञेने कामसरिता । लावण्येलतिका गुणैकभरीता ।
साळंकारें सुशोभीता नृपनाथा सन्मुख । १२६ ।

येउनि गीत नृत्य करीती । हावभाव ताल पडती ।
नयनबाणें विंधीति । चीत्तकुरंग रायाचा । १२७ ।

त्याच्या गायनांची विचित्र कळा । निर्जळ पाझरती शिळा ।
पवन पांगुळें गंगाकुळा । पुर तुंबोनि वाढांत । १२८ ।

सभेश्रवण बैसली सादरें । नाना याति श्वापदें अपारे ।
वैरत्यागें परस्परें । मधुर स्वरें मोहीलिं । १२९ ।

ऐसे देखोणि धरारमण । ह्मणे धन्य धन्य तो चतुरानन ।
जेणे संगिसनिकेतन । कामिनिस्वरूपें निर्मिले । १३० ।

त्रीशंखरायाचा नंदन । संगीतशास्त्री प्रवीन ।
श्रवणे झाला सुप्रसन्न । करोचे कंकन काढीले । १३१ ।

माणिक रत्नें धरामौळी । हाटकंकन जडियेली ।
नाचनि पाचारुनि जवळी । देता आला तयेतें । १३२ ।

येरि नेघोनि बोले वचन । आह्मां रुषीधर्में काय न्यून्य ।
तुझीया स्वरुपा वेधलें मन । इच्छूं संग कामांचा । १३३ ।

तुझीया ऐसा रुपस गुणि । दुजा न देखों त्रिभुवनि ।
आह्मां ऐसें कुरंगनयनि । अपर कामिनि असेना । १३४ ।

ऐसें बोलतां मुनिवर्यदासी । राजा कोपला मानसी ।
अज्ञा करुनि प्रधानासी । मारुनि बाहेर घातल्या । १३५ ।

आज्ञा करितां प्रधानासी । बाहीर घातल्या तापसदासीं ।
रुदीत वदनें आश्रमासीं । दोघी रुषीच्या पातल्या । १३६ ।

आपुल्या करिं फेडून वसनें । कबरी छादीलें वदन ।
आंगी धुळी चर्चुन नयन । उष्ण जीवण ढाळीती । १३७ ।

शरीरचळचळां कांपत । हाहाशब्दें हृदये पीटीत ।
आटटाहासें रुदना करोत । विभछरूपें कुपात्रा । १३८ ।

रुषीअंगनी उभय कामिनि । आंग टाकुन लोळती धरणि ।
हें देखोणि गांधीज मुनि । शांतउनि पुसत । १३९ ।

तुह्मांस कोणे दीधला त्रास । त्याचा समूळ करीन ग्रास ।
खेद सांडूनी आह्मांस श्रुत केलें पाहिजे । १४० ।

दासी ह्मणती जी स्वामीया । तुमच्या वचने देवालया ।
जाउनी नृत्यगीतें राया तोषविले समर्थ । १४१ ।

उचीत देतां नरभुवणें । आह्मीं नेघोनि बोलीलों वचनें ।
तवांगभोगालागी मनें । आनिलें येथें महींद्रा । १४२ ।

एसें आंम्ही बोलतां वचनें । राजा कोपला दारूण ।
प्रधानहस्तें मारून । बाहीरी घातले आम्हांसी । १४३ ।

वसन कंचुकी फाडुनि स्वामि । मुष्टीप्रहरें मर्दीतां भुंमी ।
वरी पडलों जी आह्मीं प्रेतदशा पाउनि । १४४ ।

दैवे स्मृति पावोनि उठतां । बाहीर घांतले वोपोनिं लाता ।
एसें वर्तले कृपवंता । बोलोनि गहीवरें दाठल्या । १४५ ।

त्यांची परीसोनियां वाणी । रुषी वमींत धांवे क्रोधाग्नी ।
भासे जाणों समुद्रमथनी । सर्प गरळा टाकीत । १४६ ।

कीं मदनदहनांलागी शंकर त्रीतिये नेत्रीचा वैश्वान्नर ।
पसरी तैसा रुषेश्वर । रायापांसी पातला । १४७ ।

ह्मणे रायामाजी अधमां । नेणसी माझा प्रतापमहिमा ।
अतांची बोळवीन धामां । वैवस्वताच्या अविलबे । १४८ ।

वसीष्ठगुरुच्या पडीभरें । मातलासी राज्याधीकारें ।
यालागी मदाचें कावीरें । नयनीं आले तुझीया । १४९ ।

अरे तुझीया गुरुसी । प्रचीत आहे मानसी ।
म्या यक शत पुत्रासी । येमलोका बोळविले । १५० ।

ऐसे रुषीचे वाग्शर । वरुषे जैसा दामिनिवर ।
नृपाआंगी क्षमांपंबर । शांतिभूषणें शोभला । १५१ ।

राजा ह्मणे प्रतिश्रृष्टीजनका । वीनां अपराधें कोपता का ।
मह्मावरी रुषीनायका । हें मज कळले पाहिजे । १५२ ।

ऋषी ह्मणे राया कृतघ्ना । माझीया बाळा श्वापदगणा ।
वधुनीं कां आलासी सदनां । तापसाच्या नीर्लजा । १५३ ।

नीर्वैर श्वापदाच्या कोटी । वनी वीचरती पाहे दृष्टीं ।
ऐसीयाते वधुनि श्रृष्टी । का दासीसी मारीले । । १५४ ।

रायें मस्तक ठेविला चरणि । बोलता जाला मधुर वचनीं ।
ममापराध न मनुनी मनी । क्षमा केली पाहिजे । १५५ ।

येका देहाची कारणे । तेथे रसनां खंडीली रदनें ।
तर्जनीनखें फुटता नयनें । द्वेष न धरी मानस । १५६ ।

ह्मणा श्वापदे हे आपुली बाळें । तरी सांगो आह्मी कोणाची सकळें ।
क्रोध सांडून स्नेहाळें । क्षमा केली पाहिजे । १५७ ।

तापस कोप सिखीसीखा । नृपे केल्या मृगांकमरीका ।
रुषीआश्रमा घालुनि पादुका । नमुनी आला स्वस्थाना । १५८ ।

श्रमें श्रांतला कुभिनींवर । शुशुप्तीने व्यापीले अंतर ।
तारामतीअंक सुकुमार । उसी करुनी पहुडला । १५९ ।

आतां पुढें रसाळ कथा । निद्रा लागता नृपनाथा ।
स्वप्नामाजी तत्वता । दान मागेल कौसिक । १६० ।

लीळावीश्वंभर इश्वरु । कवी गुरूचा आदिगुरु ।
ह्याचेनी प्रसादे मुक्तेश्वरू । नीरोपीत श्रोतीयां । १६१ ।

इतिश्री भारत वनपर्वानि । हरिश्चंद्रोपाख्यानकथा श्रवणि ।
दोश दवडुनी नीरोपणि सादर श्रोतिं बैसावे । १६२ ।

इतिप्रथम प्रसंगः । १ । छ ।। छ ।।

□ □ □

## अर्थ : अध्याय पहिला

१. ज्याला हत्तीचे मख आहे, ज्याने नागाचा अलंकार धारण केला आहे. जो एकदंत असून द्विनेत्र आहे, आणि उंदार हे ज्याचे वाहन आहे अशा त्या गजाननाला माझे नमन असो.

२ जी ब्रह्मदेवाची कन्या असून, जिने शुभ्र वसन व शुभ्र अलंकार मोत्यांचे धारण केले आहेत व हंस हे जिचे वाहन आहे आणि देवर्षींनी देखील जिला आदरणीय मानले आहे अशा शारदेला मी नमन करितो.

३. संसार मोहरुपी अंधःकाराचा नाश करणाऱ्या व मोक्ष मिळवू इच्छिणाऱ्या साधकास सामुज्यमुक्ती देणाऱ्या व संसार सागरातून तारून नेणाऱ्या नौकेप्रमाणे ज्याचे स्थान आहे, अशा मानवी गुरुला माझे वंदन असो.

४. यानतर ज्ञान वैराग्य व भक्ती यांचे साधन असणाऱ्या श्रोत्यानी मजकडे पूर्ण अवधान देऊन कथाभाग ऐकण्याची कृपा केल्याचे वरदान मला द्यावे.

५. बृहदस्वा ऋषी धर्मराजाला म्हणतात की, आता मी तुला राजा हरिश्चंद्राचा महिमा कथन करतो तो तू ऐक. असा महिमा की जो ऐकल्यामुळे मनुष्य-प्राण्याची पापापासून सुटका होते.

६. सातमोक्षदायक नगरीत पहिली असलेल्या अयोध्यानगरीत प्रत्यक्ष धर्मरूप असलेला हरिश्चद्रराजा राज्य करीत होता.

७. कामक्रोधादी षड्रिपुंना जो नाश करणाऱ्या सिंहाप्रमाणे भासतो साधुसंतांना चंद्राप्रमाणे सुखवितो म्हणून त्याला हरिश्चंद्र म्हणत.

८. सुर्यवंशाच्या क्षीरसागरात चंद्राप्रमाणे भासणारा, प्रजावल्लीस चंद्राप्रमाणे वाढविणारा म्हणून हरिश्चंद्र हे नाव.

९. शूर सत्वशिलामध्ये श्रेष्ठ, मेघाप्रमाणे दान करताना उदार असणारा, विष्णु प्रमाणे प्रजापालन करणारा व इंद्राप्रमाणे पराक्रमी (असा तो हरिश्चंद्र)

१०. आपल्या आज्ञारुपी सागराचे वस्त्र धरणीला लेववून आपल्या पराक्रमामुळे लोकांच्या हृदयात उच्चस्थान मिळवणारा –

११. सर्वराजांमध्ये ज्याची कीर्ती उदंड आहे असा चक्रवर्ती हरिश्चंद्र, सर्वदेवामध्ये इंद्र ज्याप्रमाणे सिंहासनावर शोभून दिसतो त्याप्रमाणे शोभून दिसला.

१२. ज्याच्या भोवती शूर प्रधानांनी मंडल केले आहे, ज्याच्या दोन्ही बाजूस दंडधारी सेवक उभ आहे (असा तो राजा सिंहासनावर बसलेला असतांना) मंगल वाद्यांचा ध्वनी गगनात भरून राहिला आहे.

१३. अशा त्या राजाच्या दरबारामध्य ऋषीमुनी, कथाकार, विद्वान, संगीतकार, वगैरे असत त्यामुळे राजाचा चित्तवृत्ती प्रसन्न राहात असे.

१४. इतक्यात अचानकपणे आकाशमार्गाने नारदमुनी मधुर वीणा वाजवीत आणि मुखाने नारायणाचें चिंतन करीत तेथे आले.

१५. ज्ञानरुपी कमळाचा गाभा, वैराग्यरुपी वेलीचा मूळकंद आणि विवेकरुपी सागराला भरता आणणारा पूर्णचंद्र असे ते नारदमुनी तथं आले.

१६. राजाने त्यांना पाहाताच तात्काळ त्यांच्या चरणावर मस्तक ठवले व त्यांना जयजयकार करीत त्यांना सिंहासनावर नेऊन बसविले.

१७. सोन्याच्या पात्रात स्वच्छ पाण्याने राजाने त्यांचे पाय धूतले, अंगाला चंदनाची उटी लावून मस्तकावर केशराचा टिळा लावला.

१८ निरनिराळ्या प्रकारच्या सुगंधीत फुलांच्या माळा घालून स्वादिष्ट, भोजन देऊन, विडा खावयास देऊन राजाने नारदांना संतुष्ट केले.

१९. त्या विनयशील राजाची भक्ती पाहून नारदाचे अंतःकरण सुखावले व त्याने तुझे यश सतत वृद्धिंगत होवो असा आशीर्वाद त्याला दिला

२०. जो संकटकाळी देखील आपले सत्व सोडीत नाही तो आपल्या पुण्यप्रतापाने सृष्टीचे पालन करीत असतो असे राजाला सांगून व भविष्यकालासंबंधी काही विचारविनिमय करून नारद तेथून निघाले.

२१. तेथून ते इंद्रदरबारात आले, इंद्रानेही नारदांना वंदन करुन त्यांची विधीयुक्त पूजा केली.

२२. इंद्रसभेत, विश्वामित्र, वसिष्ठ व त्यांच्या सारखेच आणखी थोर तपस्वी यांची दाटी झालेली होती.

२३. इंद्राकडून यथोचित सन्मान झाल्यानंतर नारदांनी अयोध्येचे कीर्तीगान करण्यास सुरवात केली.

२४. पृथ्वीतलावर शरयू नदीच्या तीरी असलेल्या अतीव सुंदर अशा अयोध्या नगरीच्या बरोबरीची एकही नगरी मला दिसलेली नाही.

२५. नवखंड पृथ्वीवर एकछत्री राज्य करीत असलेल्या शूरवीर हरिश्चंद्र राजाची आज्ञा तेथे सर्वत्र पाळली जाते.

२६. तो हरिश्चंद्र म्हणजे सत्वशीलांचा मुकुटमणी असून परमज्ञानी व परोपकारी आहे, दुःख आणि दारिद्र हे शब्द त्यांच्या राज्यात कोठेच येकू येत नाही.

२७. याप्रमाणे नारदाने केलेले गुणगान ऐकून वसिष्ठ ऋषींना मनोमन आनंद झाला. व ते म्हणाले हरिश्चंद्र राजाला खरोखर त्याची स्वतःचीच उपमा देणे योग्य ठरेल.

२८. नारदांच्या बोलण्याने विश्वामित्राला संताप आला. त्यातच वसिष्ठांच्या बोलण्याची भर पडून त्याला अधिकच राग आला. (नारदाचे बोलणे हाच विश्वामित्राचा क्रोधाग्नि चेतविणारा वारा. वसिष्ठाच्या त्या क्रोधाग्नीत तूप ओतल्या सारखं झाले व क्रोधाच्या ज्वाला आकाशापर्यंत पोहोचू लागल्या क्रोध मनात मावेनासा झाला. हा भावार्थ. रुपक)

२९. विश्वामित्राचे नेत्र खदिर वृक्षाच्या लाकडाच्या निखाऱ्याप्रमाणे लाल झाले आणि आपल्या मुखरूपी धनुष्यामधून तो तीक्ष्ण शब्दांचे बाण सोडू लागला.

३०. वसिष्ठ गुरुची पूर्ण कृपा असतानाही भूपरूपी हरणाला कोण मारू शकेल.

३१. हरिश्चंद्राच्या सर्वांगावर सत्वशिलेतेचे संरक्षक कवच असताना विश्वामित्राचे शब्द= बाण त्याच्या शरीरापर्यंत कसे बरे पोहचतील?

३२. पण हे राहू दे. विश्वामित्र काय बोलला ते आता प्रत्यक्षच ऐका—

३३. देवसभेत पृथ्वीवरील मर्त्य राजाची कीर्ती गाताना नारदांना कमीपणा वाटला नाही. पण देवाच्या सभेत मानवी राजाची कीर्ती गायली तरी सूर्यापुढे ज्याप्रमाणे दीपज्योतीचा प्रभाव पडत नाही तसेच होणार—

३४. श्रीमंतापुढे गरिबाचे गुणगान केले किंवा मेरूला वारूळाची उपमा दिली अथवा कन्हेर, धोत्रा या झाडांना कल्पवृक्षाची उपमा दिली तर जशी ती सारखी होणार नाही तसेच हे आहे.

३५. यावर वसिष्ठमुनी म्हणाले, हे ऋषीराज, तुम्ही उगीचच रागावत आहात. धर्म, सत्त्व, शांती व दया यांचे जो पालन करतो तोच श्रेष्ठ असतो.

३६. हरिश्चंद्र राजा हा खरोखरच शूर, सत्त्वशिलांचा महामेरू असून ज्याप्रमाणे ध्रुवाची अढळपदी स्थापना केलेली शोभते त्याप्रमाणे तो सूर्यवंशाला श्रेष्ठ भूषण आहे.

३७. वसिष्ठाचे बोलणे ऐकूण विश्वामित्र अधिकच रागाने पाहून म्हणाला मी त्याचा छळ करण्याचे ठरविले तर त्याचे संरक्षण करण्यास या सृष्टीमध्ये कोण धजावतो ते पाहूच.

३८. मी एवढा (श्रेष्ठ) विश्वामित्र त्यापुढे राजाची सत्त्वशीलता ती काय. क्षणार्धात त्याचे बोलणे मी खोटे करून दाखवील.

३९. यावर वसिष्ठमुनी म्हणाले यवनानें आपल्या मुखाने वेदपठण केले म्हणजे जसे होते तसेच हे झाले. (मी अशी प्रतिज्ञा करतो की जर विश्वामित्र म्हणतो तसे झाले तर) माझे सात पिढयांचे पूर्वज रौरव नरक भोगतील.

४०. किंवा मी या कुरुक्षेत्रात शेंडी, जाणवे टाकून अधमाचे भीक्षापात्र हाती घेईन.

४१. आणखी माझी प्रतिज्ञा ऐका की मद्यपानाने जसा नरक पात्र होतो किंवा स्वजनांचा नाश केल्यामुळे जो दोष लागतो तो मला लागेल.

४२. अशा सर्व दोषांचे पर्वत मस्तकावर घेऊन मी माझ्या पूर्वजासह नरकात बुडेन. जर हरिश्चंद्र राजा आपले सत्त्व विसरला तर—

४३. हें वसिष्ठांचे बोलणे ऐकून विश्वामित्रानेही अशी प्रतिज्ञा केली की मी हरप्रयत्नांनी हरिश्चंद्राचे सत्त्व हरण करण्याचा प्रयत्न करीन.

४४. तो जर माझ्या कसोटीला उतरला तर मात्र आजवर मी मिळविलेले सर्व पुण्य त्यास अर्पण करीन.

१९. त्या विनयशील राजाची भक्ती पाहून नारदाचे अंतःकरण सुखावले व त्याने तुझे यश सतत वृद्धिगत होवो असा आशीर्वाद त्याला दिला

२०. जो संकटकाळी देखील आपले सत्व सोडीत नाही तो आपल्या पुण्यप्रतापाने सृष्टीचे पालन करीत असतो असे राजाला सांगून व भविष्यकालासंबंधी काही विचारविनिमय करून नारद तेथून निघाले.

२१. तेथून ते इंद्रदरबारात आले, इंद्रानेही नारदांना वंदन करुन त्यांची विधीयुक्त पूजा केली.

२२. इंद्रसभेत, विश्वामित्र, वसिष्ठ व त्यांच्या सारखेच आणखी थोर तपस्वी यांची दाटी झालेली होती.

२३. इंद्राकडून यथोचित सन्मान झाल्यानंतर नारदांनी अयोध्येचे कीर्तीगान करण्यास सुरवात केली.

२४. पृथ्वीतलावर शरयू नदीच्या तीरी असलेल्या अतीव सुंदर अशा अयोध्या नगरीच्या बरोबरीची एकही नगरी मला दिसलेली नाही.

२५. नवखंड पृथ्वीवर एकछत्री राज्य करीत असलेल्या शूरवीर हरिश्चंद्र राजाची आज्ञा तेथे सर्वत्र पाळली जाते.

२६. तो हरिश्चंद्र म्हणजे सत्वशीलांचा मुकुटमणी असून परमज्ञानी व परोपकारी आहे, दुःख आणि दारिद्र हे शब्द त्यांच्या राज्यात कोठेच येकू येत नाही.

२७. याप्रमाणे नारदाने केलेले गुणगान ऐकून वसिष्ठ ऋषींना मनोमन आनंद झाला. व ते म्हणाले हरिश्चंद्र राजाला खरोखर त्याची स्वतःचीच उपमा देणे योग्य ठरेल.

२८. नारदांच्या बोलण्याने विश्वामित्राला संताप आला. त्यातच वसिष्ठांच्या बोलण्याची भर पडून त्याला अधिकच राग आला. (नारदाचे बोलणे हाच विश्वामित्राचा क्रोधाग्नि चेतविणारा वारा. वसिष्ठाच्या त्या क्रोधाग्नीत तूप ओतल्या सारखे झाले व क्रोधाच्या ज्वाला आकाशापर्यंत पोहोचू लागल्या क्रोध मनात मावेनासा झाला. हा भावार्थ. रुपक)

२९. विश्वामित्राचे नेत्र खदिर वृक्षाच्या लाकडाच्या निखाऱ्याप्रमाणे लाल झाले आणि आपल्या मुखरूपी धनुष्यामधून तो तीक्ष्ण शब्दांचे बाण सोडू लागला.

३०. वसिष्ठ गुरुची पूर्ण कृपा असतानाही भूपरूपी हरणाला कोण मारू शकेल.

३१. हरिश्चंद्राच्या सर्वांगावर सत्वशिलेतेचे संरक्षक कवच असताना विश्वामित्राचे शब्द= बाण त्याच्या शरीरापर्यंत कसे बरे पोहचतील?

३२. पण हें राहू दे. विश्वामित्र काय बोलला ते आता प्रत्यक्षच ऐका –

३३. देवसभेत पृथ्वीवरील मर्त्य राजाची कीर्ती गाताना नारदांना कमीपणा वाटला नाही. पण देवाच्या सभेत मानवी राजाची कीर्ती गायली तरी सूर्यापुढे ज्याप्रमाणे दीपज्योतीचा प्रभाव पडत नाही तसेच होणार–

३४. श्रीमंतापुढे गरिबाचे गुणगान केले किंवा मेरूला वारूळाची उपमा दिली अथवा कन्हेर, धोत्रा या झाडांना कल्पवृक्षाची उपमा दिली तर जशी ती सारखी होणार नाही तसेच हे आहे.

३५. यावर वसिष्ठमुनी म्हणाले, हे ऋषीराज, तुम्ही उगीचच रागावत आहात. धर्म, सत्त्व, शांती व दया यांचे जो पालन करतो तोच श्रेष्ठ असतो.

३६. हरिश्चंद्र राजा हा खरोखरच शूर, सत्त्वशिलांचा महामेरू असून ज्याप्रमाणें ध्रुवाची अढळपदी स्थापना केलेली शोभते त्याप्रमाणे तो सूर्यवंशाला श्रेष्ठ भूषण आहे.

३७. वसिष्ठाचे बोलणे ऐकूण विश्वामित्र अधिकच रागाने पाहून म्हणाला मी त्याचा छळ करण्याचे ठरविले तर त्याचे संरक्षण करण्यास या सृष्टीमध्ये कोण धजावतो ते पाहूच.

३८. मी एवढा (श्रेष्ठ) विश्वामित्र त्यापुढे राजाची सत्त्वशीलता ती काय. क्षणार्धात त्याचे बोलणे मी खोटे करून दाखवील.

३९. यावर वसिष्ठमुनी म्हणालें यवनानें आपल्या मुखाने वेदपठण केले म्हणजे जसे होते तसेच हे झाले. (मी अशी प्रतिज्ञा करतो की जर विश्वामित्र म्हणतो तसे झाले तर) माझे सात पिढयांचे पूर्वज रौरव नरक भोगतील.

४०. किंवा मी या कुरुक्षेत्रात शेंडी, जाणवे टाकून अधमाचे भीक्षापात्र हाती घेईन.

४१. आणखी माझी प्रतिज्ञा ऐका की मद्यपानाने जसा नरक पात्र होतो किंवा स्वजनांचा नाश केल्यामुळे जो दोष लागतो तो मला लागेल.

४२. अशा सर्व दोषांचे पर्वत मस्तकावर घेऊन मी माझ्या पूर्वजासह नरकात बुडेन. जर हरिश्चंद्र राजा आपले सत्त्व विसरला तर–

४३. हे वसिष्ठांचे बोलणे ऐकून विश्वामित्रानेही अशी प्रतिज्ञा केली की मी हरप्रयत्नांनी हरिश्चंद्राचे सत्त्व हरण करण्याचा प्रयत्न करीन.

४४. तो जर माझ्या कसोटीला उतरला तर मात्र आजवर मी मिळविलेले सर्व पुण्य त्यास अर्पण करीन.

४५. 'ठीक आहे तसे होवो' असें म्हणून वसिष्ठांनीही प्रतिज्ञाबद्धता स्विकारली.

४६. विश्वामित्र सांगू लागले— मी कित्येक कोटी तप केले की जे ब्रह्मांडात मावले नाही. असे कोणते पुण्य म्हणाल तर ऐका.

४७ मी तपश्चर्येने प्रतिसृष्टी निर्माण केली माझ्या लौकिकदृष्टीन मी सूर्याकडे पाहात असता बुबळे गळून पडली तेव्हा मी ज्ञानरुपी नेत्रांनी सूर्याचे दर्शन घेतले.

४८. मी दहा कोटी वर्ष वारा, पाणी व पाने खाऊन राहिलो. मी लोखंडाचे चूर्ण भक्षून पाच प्रकारच्या अग्नीत साधना केली. व तापलेल्या वाळूत पद्मासन घालून दहा कोटी अब्ज जप केला.

४९. असे महातप करुन मी मृत्यूलाही जिंकण्याचे जे पुण्य गाठी बांधले आहे ते सर्व मी त्याला देइन (जर तो माझ्या परीक्षेत उतरला तर.)

५०. याप्रमाणे दोघाचा वाद ऐकून नारद तेथून उठले आणि इंद्राला म्हणाले की उगीचच शब्दानें शब्द वाढून वाद झाला.

५१ पण वसिष्ठ आणि विश्वामित्र दोघेही हट्टास पेटले आणि वरीलप्रमाणे प्रतिज्ञाकरून विश्वामित्र रागारागाने आपल्या सिद्धाश्रमास चालते झाले.

५२. सूर्यवंशाचा अभिमान गाळगणारे वसिष्ठमुनी अयोध्येला गेले. त्यांच्यामागे विश्वामित्राने दोन शिष्य गुप्तरुपाने नगरीस पाठविले.

५३. तुम्ही गप्तपणे नगरास जाऊन वसिष्ठ व हरिश्चद्र काय बोलतात ते ऐकून मला सांगा अशी त्याने शिष्याना आज्ञा केला.

५४. इंद्रसभेमधील वादामधून ज्या प्रतिज्ञा दोघांनी उच्चारल्या त्या सांगून हरिश्चद्राला पुढील अथर्नागासून सावध करावे म्हणून वसिष्ठमुनी राजाला भेटण्यास गले.

५५ वसिष्ठ येत आहे हे वृत्त ऐकताच राजाने स्वत: चालत जाऊन ऋषींना पालखीत बसवून अत्यंत सन्मानाने नमस्कार करून नगरीत आणले.

५६. नगरामध्ये गुढया, तोरणे व कमानी उभारून मंगल वाद्यांच्या गजरात वसिष्ठांचे स्वागत केले.

५७. हरिश्चद्राने त्यांना आपल्या राजवाड्यात नेवून सुवर्णासनावर बसविले व पुत्रासह त्यांची पत्नीही सेवेसाठी हजर झाली.

५८. त्यांनी मुनी चरणी मस्तक ठेवून त्यांना वंदन केले व ऋषींनीही त्यांना शुभाशीर्वाद देऊन क्षमालिंगन दिले.

५९. सुवर्ण कुंभातील पाण्याने वसिष्ठांना स्नान घालून षोडशोपचारे पूजा करून राजाने त्यांचे यथोचित स्वागत केले. त्यांच्यावर छत्र धरले.

६०. अर्घ्य. पाद्यपूजा, सुगंधी पुष्पे. नैवेद्य व विडा हे सर्व त्यांना अर्पण करून हरिश्चंद्राने सुवर्ण तबकात औक्षणासाठी निरंजन ठेवले.

६१ याप्रमाणे वसिष्ठांची पूजा करून राजा हात जोडून त्यांच्या जवळ उभा राहिला तेव्हा विश्वामित्राचे बोलणे आठवून वसिष्ठ त्याला म्हणाले.

६२. ते ६४ या ओव्यात मुक्तेश्वरी रुपकाचा एक सुंदर नमुना आहे गंगा स्वर्गाहून निघाली. अनेक पर्वतांचा भेद करून तिचा प्रवाह चालला जन्हू राजाच्या यज्ञ भूमीवरून प्रवाह जाताना त्याने तो प्रवाह प्राशन करून गिळन टाकला. पुन्हा भगीरथाने प्रार्थना केल्यावर जन्हूने तो कानावाटे सोडला. या रुपकात कीर्तीजळ = गंगाप्रवाह, पर्वत शिखरे = शत्रु, जन्हू = विश्वामित्र. अशी कल्पना केली आहे

६५. राजाचे सत्त्व हे शुद्ध सोन्यासारखे आहे. विश्वामित्राच्या कोपाग्नि तापून ते अधिक चोख होईल व त्याचे मूल्य जास्त वाढेल, हे तू लक्षात घे.

६६. हे राजा, सत्वरक्षणार्थ प्राणही देण्याची वेळ येईल, परंतु असे जे प्राण देतात ते स्वर्गात अक्षय सुख भोगतात.

६७ सूर्यवंशामध्येच असलेल्या शिबीराची गोष्ट आहे, त्याने सत्वरक्षणार्थ कपोताच्या वजनाइतके स्वतःचे मांस दिले.

६८. अशा वंशातील तू राजा आहेस तेव्हा हे गुणांचे केवळ आगरच अशा हरिश्चंद्रा, तू विश्वामित्राच्या घरी कधीही जाऊ नकोस-विश्वामित्रापासून सावध रहा.

६९ अशी सूचना राजाला देऊन वसिष्ठ मुनी तपश्चर्येला निघून गेले. राजाही अयोध्येत सावधतेने नित्यकर्मे करीत राहिला.

७०. इकडे सिद्धाश्रमामध्ये गेलेल्या विश्वामित्राने मातंग यागाची सिद्धता आरंभिली.

७१. याज्ञिकांना आमंत्रण देवून त्याने शुद्ध भूमीवर अकरा षट्कोनी मृत्तिकाकुंडे स्थापन केली.

७२. अथर्ववेद पठण करणारे व अभिचार कर्मामध्ये निष्णात असलेले असे शाक्त लोक बोलावून त्याने नाना प्रकारची द्रव्यें व लाल फुले गोळा करविली.

७३. शेंदूर, केशर, रक्तचंदन धोत्रा, कन्हेर, जास्वंद, रक्ताने भरलेले कुंभ, शवासने, आहूतीच्या भातासाठी लागणारी मांसपात्रे यांची सिद्धता त्याने केली.

७४. यज्ञाची पूर्णाहुती घालताच आदीशक्ती प्रकट झाली. तिने विश्वामित्राला त्याची इच्छा विचारली.

७५. तीर्थोदकाने घट पूर्ण भरून व रक्ताच्या आहुतीने नैवेद्य दाखवून यज्ञारंभी विश्वामित्राने शक्ती पीठाची स्थापना केली होती.

७६. स्नान करून यज्ञीकांनी नग्न अवस्थेत बसून यज्ञ कंकण बांधले व आपल्या पिंगट जटा मोकळ्या सोडल्या.

७७. त्या सर्वांमध्ये स्वतः बसून त्याने अग्नी प्रज्वलीत केला. व मंत्रोच्चार करून पळीने आहुती देण्यास सुरूवात केली.

७७. मद्यमांसाच्या आहुती अग्नीत टाकताच आकाशात धूरच धूर दाटला आणि मांस जळाल्याची करपट घाण मस्तकापर्यंत गेली.

७८. सप्तरंगाच्या ज्वाला उसळत होत्या. अकरा यज्ञकुंडात ६६ आहूती दिल्या. नंतर मातंग यज्ञाची देवता भवानी ही प्रसन्न झाली.

७९. ७४ वी ओवी परत आली ती या ठिकाणी योग्य.

८० विश्वामित्राने आदीशक्तीकडे क्रूर प्राण्यांनी अरण्य भरून टाकावे अशी मागणी केली व तिने ती मान्य केली.

८१. वरदायी देवीच्या सामर्थ्यामुळे विश्वामित्रांनी क्रूर हिंसक प्राण्यांचे कळपच्या कळप निर्माण केले.

८२. महिना–पंधरा दिवसात त्याने वनात जी श्वापदे निर्माण केली त्याचे विस्ताराने वर्णन केले तर उगीच पाल्हाळ केल्यासारखे होईल.

८३. धारदार दात, नखे, शिंगे असलेल्या श्वापदांचे कळप त्याने निर्माण केले. त्याचप्रमाणे सरपटणारे प्राणी, पक्षी, आकाशात उड्डाण करणारे, जमीनीवर फिरणारे, बिळात रहाणारे असे अनेक प्रकारचे प्राणी त्याने निर्माण केले.

८४. याप्रमाणे सर्व अरण्यात मांस भक्षून उन्मत्त झालेल्या श्वापदांचा सुळसुळाट झाला व ती गर्जना करून सर्वांना उपद्रव देवू लागली.

८५. शेती करण्यासाठी जाणारे शेतकरी, तीर्थयात्रेस जाणारे प्रवासी व व्यापारी तसेच गाई–गुरे अरण्यातून जाईनाशी झाली.

८६. प्राणभयामुळे कोणीही वनात शिरण्यास धजेना. जणू काही कल्पांत आला असे सर्वांस वाटू लागले. राजवाड्यात जाऊन हे वृत्त राजाच्या कानावर घालण्यास हवे असे सर्वजण म्हणू लागले.

८७. काही प्रजाजन राजाच्या दरबारात जाऊन त्याला वंदन करून म्हणाले की, हे राजा. तुझ्या शौर्य-सूर्याच्या तेजावर जणकाही या श्वापदांच्या संकटाचे सावट आल्यासारखे वाटतें.

८८. हे राजा, तुला हें वृत्त फार क्षुल्लक वाटेल पण न सांगितले तर आमचे प्राणच जातील. अरण्यामध्यें श्वापदांचा सुळसुळाट झाला असून ती सर्वांचा नाश करीत आहेत.

८९. याप्रमाणे प्रजाजनांची तक्रार ऐकल्यावर राजाने मनात विचार केला की, आज जर वसिष्ठांची आज्ञा मानून आपण स्वस्थ राहिलो तर लोकात आपली दुष्कीर्ती होईल.

९०. वनात जाऊन श्वापदांचा नाश करून सर्व लोकांना निश्चित करणें हेच आपले कर्तव्य आहे, मग वसिष्ठ रागावले तर त्यांच्या चरणी मस्तक नम्र करून त्यांचा राग घालविता येईल.

९१. याप्रमाणे मनात विचार करून राजाने आपल्या सेनापतीला बोलावणें पाठविले व वनात जाण्यासाठी सेना सिद्ध करण्याची आज्ञा दिली.

९२. त्याने रणभेरी व रणवाद्ये वाजविल्याने सैन्याने तात्काळ वीरवेष परिधान केला.

९३. घोडे, हत्ती, रथ वगैरे आपापल्या वाहनावर सैन्यातील वीरांनी आरुढ होऊन ते अयोध्या नगरीच्या वेशीतून बाहेर पडले.

९४. प्रथम पायदळ मग घोडदळ व त्यामागे हत्तीदळ सोंडा उभारुन धावत होते.

९५. त्यामागे ध्वज धारण केलेला हत्ती होता. तो जणूकाहीं सेनासागरातील नौकेप्रमाणे भासत होता. मस्तकावरील दोरी डोलकाठीप्रमाणे व अंकुशधारी माहूत सुकाणूप्रमाणे भासत होते.

९६. नानाप्रकारच्या वाद्यांच्या गजरात राजा आपल्या वाहनावर आरुढ झाला व तारामती सैन्याच्या मध्यभागी बंद पालखीत बसून चालली.

९७. छत्राच्या छायेत चालणारा राजा वीरवृत्तीने शोभून दिसला होता त्याने राजपुत्राला मात्र नगरीतच ठेवले व स्वत. अरण्याकडे चालला.

९८. राजाने अरण्यात प्रवेश करताच त्याला अरण्यात क्रूर श्वापदे दिसली· त्याने शस्त्रांनी, बाणांनी, फास टाकून त्याचा वध केला.

९९. याप्रमाणे राजाने कळपच्याकळप मारलेले पाहून राहिलेली श्वापदे तो अरण्यप्रदेश सोडून मृत्यूच्या भीतीने थरकाप होऊन पळून गेली.

१००. इकडे हरिश्चंद्र आपले नगर सोडून वनात आला; म्हणून विश्वामित्राला अतिशय आनंद झाला.

१०१. आता राजाला आश्रमाकडे घेऊन येण्यासाठी त्यानें एक कांचनमृग निर्माण केला.

१०२. तुझ्या रुपाच्या आकर्षणाने भारुन जाऊन राजा आश्रमाकडे आला पाहिजे. अशी त्यास आज्ञा केल्यावर तो कांचनमृग आपली कामगिरी करण्यासाठी ऋषींना वंदन करून वनात गेला.

१०३. तो मृगराज या मानवी राजासमीप आला. त्याचे सुवर्ण अंग पाहून राजाच्या मनात त्याच्याबद्दल इच्छा जागी झाली. (त्याचा कामनासर्प जणू फुत्कार टाकीत उठला.)

१०४. धनुष्याला बाण लावून राजाने हरिणाचा वध करण्याचा प्रयत्न करताच तो हरिण एक किंकाळी फोडून जमिनीला पायही न लावता अत्यंत चपलतेने पळत सुटला.

१०५. त्याबरोबर राजाने त्याचा पाठलाग सुरू केला. थकला, भागलेला राजा विश्वामित्राच्या आश्रमाजवळ यऊन पोहोचला.

१०६. जरा दूरच राहून तो वनशोभा पाहू लागला. वनरुपी कमळातील मधुचा तो आपल्या नेत्रांनी आस्वाद घेवू लागला.

१०७. त्या वनश्रीचे काय वर्णन करावे ! तिच्या सौंदर्याच्या उपमेला आनंदवनही कमीच पडले असते. हरतऱ्हेच्या वृक्षांवर फल-पुष्पे सुवासाने दाटली होती.

१०८. काही वृक्ष शाखाहीन असून सरळसोट वाढले होते, तर काहींना फांद्यामुळे मंडलाकार प्राप्त झाला होता. आणि त्यांना वेटाळून वेली सुखेनैव राहिल्या होत्या.

१०९. कापूर, केळी, नारळ व आंबा यांना नुकत्याच धरलेल्या फळांचे घोसच्या घोस झाडांना लटकले होते.

११०. द्राक्षवेलींच्या मंडपाखाली पक्व फळांतून अमृतासमान मधुर द्राक्षरस ठिबकत होता. फणसाची पक्व फळे गडगडत जात होती.

१११. जाईजुई, चाफा, मालती, बकुळ, मोगरा, कांचन, शेवंती, केवडा वगैरेंच्या सुगंधाचा घमघमाट सुटला होता.

११२. आगरूचंदन, हरिचंदन, देवदार वगैरे सुगंधी वृक्षांना सर्प अशा तऱ्हेनें वेटाळून बसले होते की जणू काही संपत्तीच्या ठेव्यावर त्याचा रक्षणार्थ बसलेले समंधच !

११३. वड, पळस, पिंपळ वृक्ष म्हणजे जणू दत्तात्रयाचे अवताराच तसेच शिव आणि विष्णू यांना प्रसन्न करणारे बेल व तुळशीचेही वृक्ष पुष्कळ होते.

११४. अशा नाना प्रकारच्या वृक्षराजीमध्ये पशु-पक्षी नित्यक्रीडा करीत होते. पाण्याने भरलेले स्वच्छ तलाव सुवर्ण कमळांनी शोभत होते.

११५. याप्रमाणे विश्वामित्राच्या सिद्धाश्रमाभोवतीचे खास राखीव वन पाहताच राजाने आपले सैन्य तेथून दूर पाठविले आणि एकामुख्य सेनापतीवाचून सर्वांना तेथे येण्याची मनाई केली.

११६. त्या वनात प्रवेश करताच राजाच्या नजरेस एक आश्चर्य पडले गाय व वाघ हे गुण्यागोविंदाने एकमेकास चाटीत होते.

११७. साप मुंगूस खेळत होते व उंदीर मांजराचे दूध पीत होते. सिंह आणि हत्ती वनात एकत्र फिरत होते.

११८. आपली पिल्ले घुबडांजवळ सांभाळण्यासाठी ठेवून कावळे खुशाल चारा आणण्यासाठी जात होते. हे विश्वमित्राने निर्मिलेले मायाजाल आहे. हे कुणाच्या लक्षात आले नाही.

११९. याप्रमाणे आपले पिढीजात वैर विसरून वागणारे प्राणी पाहून राजा हरीश्चद्र आश्चर्यचकित झाला. पुढे गेल्यावर सुगंधी पाण्याने भरलेले तलाव त्याला दिसले.

१२०. त्या पाण्यात स्नान केल्यावर राजाला परम आल्हाद वाटला. त्याचे सर्व कष्ट नाहीसे झाले. सुंदर वस्त्र धारण करून तो देवालयाकडे निघाला.

१२१. कर्दळीच्या पानाच्या द्रोणात सुवर्ण कमळें व नाना प्रकारची सुगंधीत पुष्पे घेऊन, सुवर्ण कुंभात पाणी घेवून राजाने शिवालयात प्रवेश केला.

१२२. सोमकांत पाषाणांनी बांधलेल्या शुभ्र शिखराच्या देवालयामध्ये कर्पुरगौर शिवमूर्ती शोभून दिसत होती. मंदिराच्या दारातच शुभ्ररंगी नंदाची मनोहर मूर्ती होती.

१२३. राजाने शंकराची भक्तिभावाने पूजा केली व त्याला वंदन करून राजा आपल्या पत्नीसह तेथच थोडा वेळ बसला.

१२४. विश्वामित्राने सुंदर, चतुर व नृत्यकुशल अशा दोन मातंग युवतींना देवालयात पाठविले.

१२५. ऋषींच्या आज्ञेवरून त्या रुपयौवनयुक्त अशा चतुर कामिनी पूर्वशृंगार करून राजा समोर गेल्या.

१२६. तेथे त्यांनी नृत्य, गायन व अभिनयास सुरवात केली. आपल्या नेत्र बाणांनी राजाचा हृदयमृग विद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला.

१२७. त्यांच्या गायनाची पद्धती इतकी वेगळी होती की दगडालाही पाझर फुटावे ! वारा देखील वाहण्याचा थांबला, नद्या एकाच जागी थांबल्या.

१२८. ते गाणे ऐकण्यासाठी नानाप्रकारचे प्राणी येऊन, आपापसातील शत्रुत्व विसरून जणू मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणे तेथे बसली.

१२९. याप्रमाणे पाहिल्यावर राजा मनाशी म्हणाला खरोखर ज्या ब्रह्मदेवाने या कामिनींच्या रुपाने संगीतविधान निर्माण केले तो धन्य होय.

१३०. सगीत कलेचा जाणकार असलेल्या त्या हरिश्चंद्राने प्रसन्न होऊन आपल्या हातातील कंकण त्या कलावतींना देण्यासाठी काढले

१३१. त्या सुवर्ण कंकणावर पृथ्वीमोलाची रत्ने व माणके जडविलेली होती त्या नर्तकींना जवळ बोलावून राजा ते त्यास देवू लागला.

१३२. त्यावर त्या युवती ते कंकण घेण्याचे नाकारून म्हणाल्या, ऋषींकृपेने येथे आम्हाला काहीही कमी नाही परंतु तुझ्या स्वरुपाने आकर्षित होऊन व तुझ्या सहवासाची इच्छा मनात बाळगून आम्ही येथे आलो.

१३३. तुझ्यासारखा रूपगुणांनी युक्त असा कोणी या त्रिभुवनात नाही. तशाच आमच्या सारख्या मृगनयना कामिनीही नाहीत.

१३४. विश्वामित्राच्या त्या दासींचे हे बोलणे ऐकून राजाला राग आला व त्याने प्रधान करवी त्यांना देवालयाबाहेर हाकलले.

१३५. याप्रमाणे प्रधानाने घालवून दिलेल्या त्या दासी रडत रडत विश्वामित्राच्या आश्रमात परतल्या.

१३६. स्वहस्ते वस्त्रे फाडून त्यांनी मस्तकावरील केसांनी आपले मुख झाकून घेतले व अंगाला माती लाऊन घेऊन त्या दुःखाश्रू ढाळू लागल्या.

१३७. थरथर कापणाऱ्या त्या स्त्रियांनी आपल्या छाती पिटून घेत जोरजोराने रडण्यास सुरूवात केली.

१३८. आश्रमाच्या अंगणात त्यांनी अंग टाकून दिले. विश्वामित्राने त्यांना शांत करून विचारले.

१३९. तुम्हाला ज्याने त्रास दिला असेल त्याचे नाव सांगा, त्याचा मी समूळ नाश करतो.

१४०. त्यावर त्या दासी म्हणाल्या हे मुनीराज, तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही देवालयात जावून आमच्या नृत्य गायनाने राजाला संतुष्ट केले.

१४१. त्याने संतुष्ट होऊन अंगावरील अलंकार आम्हाला देऊ केले. ते न घेता आम्ही त्याच्या संगतीची इच्छा व्यक्त केली

१४२. त्यामुळे राजाला खूप संताप आला. त्याने प्रधानाकरवी मारहान करून आम्हाला बाहेर काढले.

१४३. आमची वस्त्रे फाडून व आम्हाला मारून जमिनीवर टाकले, त्यामुळेच आमची अशी निर्जीव अवस्था झाली.

१४४. सुदैवाने आम्ही शुद्धीवर येतो, तो त्यांनी लाथ मारून आम्हाला घालवून दिले. असे विश्वामित्राला सांगत असता त्यांना पुन्हा गहिवर आला.

१४५. हा वृत्तांत ऐकून विश्वामित्राचा क्रोध अनावर झाला. जणू समुद्रमंथनात आणखी सर्पांनी गरळ टाकावी तसे झाले.

१४६. मदनदहनासाठी शंकराने क्रोधपूर्वक तिसऱ्या नेत्रातील अग्नी प्रज्वलीत करावा, तसा कोपिष्ट होऊन तो ऋषीवर्य राजाकडे आला.

४१७. राजाला म्हणाला– तुला अद्याप माझे सामर्थ्य माहीत नाहीसे दिसते. मनात आणले तर आताच मी तुला यमसदनी पाठवू शकतो.

१४८. वसिष्ठांच्या कृपेने व राज्याधिकाराने तू माजला आहेस. त्यामुळे तुझ्या डोळ्यावर धुंदी चढलेली दिसते.

१४९. असे तुझ्या गुरूला जाऊन विचार की त्याच्या शंभर पुत्रांना यमसदनी कसे पाठविले.

१५०. याप्रमाणे मेघवर्षावासारखे आलेले विश्वामित्राचे शब्दबाण झेलूनही राजा हरिश्चंद्र शांतीचे अभेद्य चिलखत ल्याल्याप्रमाणे शांतच राहिला.

१५१. राजा म्हणाला, 'हे विश्वामित्रा, प्रतिसृष्टी निर्मात्या' आम्ही तुझा कोणताही अपराध केलेला नसताना आमच्यावर का कोपलात ते सांगा.

१५२. मला पुत्रासमान असणाऱ्या प्राणीमात्राचा वध करून पुन्हा कृतघ्ना– सारखा तू माझ्या घरी आलास. यावरुनच तुझा निर्लज्जपणा दिसतो.

१५३. शत्रुत्व विसरलेल्या श्वापदाचे कळप तू ठार केलेसच, पण माझ्या दासीनाही तू का मारलेस ?

१५४. यावर विश्वामित्राच्या चरणी राजाने लीनतेने मस्तक ठेवलें व अत्यंत मधुर स्वरात तो मुनीला म्हणाला की, माझा अपराध मनात न ठेवता आपण मला क्षमा केली पाहिजे.

१५५. कारण– ज्याप्रमाणें आपल्याच दाताने आपली जीभ चावली गेली किंवा आपलेच बोट आपल्या डोळ्याला लागले तर आपण रागवत नाही.

१५६. ती श्वापदे जर आपली बाळे आहेत तर मग आम्ही देखील आपलेच नाही का ? म्हणून आपण आपला राग सोडून आमच्यावर प्रेमदृष्टी ठेवली पाहिजे.

१५७. याप्रमाणे विश्वामित्राच्या क्रोधाग्नीचे आपल्या नम्र व मधुर वचनांनी शितल चंद्रकिरण बनवून टाकून त्यांच्या चरणाना वंदन करून हरिश्चंद्र स्वस्थानी परतला.

१५८. झालेल्या श्रमांनी राजाला निद्रेची भावना होऊन तो तारामतीच्या मांडीचे उसे करून तेथच झोपी गेला.

१५९. आता यापुढील भागात राजाला झोप लागल्यावर विश्वामित्राने स्वप्नात येऊन त्याच्याकडे दान कसे मागितले ते सांगितले आहे.

१६०. लीलाविश्वंभर हे ज्याच्या गुरूचे परात्पर गुरू आहेत असा मुक्तेश्वर गुरू कृपेने पुढील कथा श्रोत्यांना सांगेल.

१६१. याप्रमाणे महाभारताच्या वनपर्वात असलेल्या हरिश्चंद्र कथेच्या उपाख्यानाचा प्रथम प्रसंग मी सांगितला त्यातील दोष नजरेआड करून श्रोत्यांनी तो ऐकावा अशी आदरपूर्वक नम्र विनंती करतो.

□ □ □

**टीपा : अध्याय पहिला**

अर्थासाठी आवश्यक त्या ठिकाणी अन्य प्रतींतील पाठ ( ) कंसात उधृत केला आहे. मूळ हस्तलिखितांत 'ऋ' कारान्त आणि 'रु' कारान्त शब्दांत भेद केला नाही. ऱ्हस्व 'न'च्या जागी 'ण'चा किंवा या विरुद्ध वापर. या गोष्टी वाचकांच्या लक्षात येतीलच.

१. नागानना – (नाग+आनन) गजवंदना.
पन्नगभूषणा – सर्पांनी अलंकारलेला.
द्विनयना – दोन नेत्रांचा. या विशेषणात वैशिष्ट्य नाही. 'त्रिनयना' असा अन्य पाठही आहे. ते शंकराचे विशेषण आहे. पण क्वचित ते गजाननास लावतात.

२. ब्रह्मनंदिनी – शारदा ही ब्रम्हदेवाची मुलगी आहे.

३. ससारमोहतमांतक – प्रपंचविषयकअज्ञानरूपी अंधकाराचा नाश करणारे.

४. मुमुक्ष...दायका – मोक्ष मिळवू इच्छिणाऱ्या साधकास सायुज्य मुक्ति देणारे. या ओवीत गुरुस वंदन आहे.

५. दुष्ट ( दुष्ट ) कर्मा पासाव – पापकृत्यापासून.

६. मोक्षस्त्रि (श्रि) याचि अधीष्ठात्री – मोक्षसंपदेचे अधिष्ठान.
साता पुरी – आयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका आणि द्वारावती या मोक्ष देणाऱ्या सप्तपुरी. यात पहिली आयोध्या.

७. काम...हरी – काम क्रोधादि षड्रिपूंना जो सिंहा प्रमाणे भासतो.

८. साधु...सुधागरी – साधुसंतांना चंद्राप्रमाणें सुखवितो. अशा प्रकारे त्रास देतो आणि पाळतो म्हणून त्याचे नाव हरिश्चंद्र.

हरिश्चंद्र राजाचा जन्म सूर्यवंशात झाला. चंद्रामुळे सागराला भरती येते आणि वेलीऔषधींना भर येतो. ही कल्पना येथे अभिप्रेत आहे सूर्यवंशाच्या क्षीरसागरास चंद्राप्रमाणे असणारा, प्रजावल्लीला चंद्राप्रमाणे वाढविणारा, म्हणून हरिश्चद्र हे नाव.

९. कमलावरू – विष्णु.

१०. आज्ञासिंधुवनीं (वसनीं) – अज्ञारुपी सागराच्या वस्त्रांनी.
परीध करुनी – नेसवून. पृथ्वी समुद्रवसना आहे सर्व पृथ्वीला आज्ञारुपी सागराचे वस्त्र लेववून. सर्वत्र आज्ञा पालन करण्यास लावून, हा भावार्थ.

११. निर्जर पति – देवाचा राजा इंद्र.

१२. वेत्रपाणी – दंडधारी. मंगळ ध्वनि – मंगलवाद्यांचा ध्वनि

१३. रागोधार – संगीत गायन.

१४. पुष्पयाति – फुलांच्या जाति.

२०. शृष्टि (सृष्टि) – सृष्टीत.

भविष्यमान . निघाला –पुढे होणाऱ्या गोष्टी सांगून निघाला. ही ओवी अन्यत्र नाही. केवळ भविष्यमनांचे सूचन करणारी म्हणून विशेष.

२१. विध्युक्त – (विधि+उक्त) यथाविधी.

२४. श्रु (सृ) ष्टि.

२५. क्षेत्री – क्षत्रिय

२९. वदनच्यापिहून – वदन धनुष्यातुन. शब्दज्ञान (बाण) – शब्द बाण.

३०. विधो (विंधो) – मारुं.
वा (मा) रील – गुरुंची पूर्ण कृपा असतांना कोण मारील ?

३१–४ पाखर – चिलखत.

३३. विश्वामित्राचे भाषण.

३४. वाल्मीक उपमा – वारुळाचे साम्य.
कनेर–अर्क – कण्हेर आणि रुचकी

३६. धुरू – ध्रुव. त्याने तपाने अढळपद मिळविले.

३७. श्रु (सृ ष्टि.

३९. येरु – वसिष्ट. रौ रौ (र व) कु (कुं) डे – रौरव नरक कुंडात.

४०. नाही तर या कुरुक्षेत्रांत शेंडी जानवें टाकून अधमाचे भिक्षा पात्र घेईन.

४१. सुरसान सुरापान) – मद्यप्राशान.

४२. निरका (या) ते – नरकांत.

४५. ब्रह्मांड उघटी – उघडया ब्रह्मांडात. 'ब्रह्मांड घटी' हा अन्य पाठही समानार्थकच.

४७. माजी – त्यामध्ये वाताम्बु – पाणी व वायु.

५२. पाट (ठी) सी – मागोमाग.

५३. 'गुप्तपणे जाऊन सर्व वृत्तान्त पाहोनि या' असे विश्वामित्रांनी शिष्यांस सांगितले ते तेथे गेले पण मुनि (वशिष्ट) यांनी निश्चित काही सांगितले नाही.

५५. सिबिकायानी – पालखीत.

५७. कनकपाठी – सोन्याच्या पाठीवर.

६०. **अर्घ्यपाद्यादि व्यवसाने** – ( अर्घ्य, पाद्य, दिव्यवसाने )

६२–६४ या ओव्यात एक रुपक आहे. गंगा स्वर्गाहून निघाली. अनेक पर्वतांचा भेंद करून तिचा प्रवाह चालला. जन्हू राजाच्या यज्ञ भूमीवरून प्रवाह जातांना त्याने प्राशन करून तो प्रवाह गिळून टाकिला पुनः भगीरथाने प्रार्थना केल्यावर तो प्रवाह जन्हू राजाने कानावाटे सोडला या रुपकात कीर्तिजळ = गंगा प्रवाह. पर्वत शिखरे = शत्रु जन्हू = विश्वामित्र अशी कल्पना केली आहे.

६५. **हाटक** – सोने

६७. **सीबी राजा** – हा सोम वंशाचा राजा. त्याचे सत्व पाहण्यासाठी अग्नि आणि इंद्र अनुक्रमे श्येन आणि कपोताच्या रुपाने आले. कपोतानें शिबीचा आश्रय घेतला श्येनाने कपोत किंवा त्याचें भारभार मांस मागितले. शिबीने शरण आलेल्या कपोतास अभय देऊन श्येनास भारंभार मांस दिले.

या ओवीत शिबी राजास सूर्यवंशीय म्हटले आहे.

७०. **अभिचार कर्मि** – जारणमरणादि कर्म करणारा

**मातां त) ग याग** – देवीस संतुष्ट करणारा एक अघोर यज्ञ

७१. **अकरो रा) ष (षट्) कोनिका शोधोनि** – शुद्ध करून.

७३. **चरू** – आहुतीचा भात.

७४. ही ओवी ७९ ओवी म्हणून पुढे आली आहे प्रस्तुत स्थली ती अनावश्यक वाटते.

७५. (अ) **शुधी कवळे** – रक्ताच्या आहुतीनी. **स्छा स्था** पुनी.

७७. **शृ स्त्रु वापात्रे अवदान** – पळीने आहुत्या. **शिशि** – मस्तकी.

८५. **नव** – न.

८७. **जाहार** – प्रणाम.

सौर्य (शौर्य) सूर्य प्रभे – पराक्रमाच्या सूर्याच्या प्रकाशापुढे.

८८. **मातु** – गोष्ट

९१ **वाहिनीपति** – सेनापति

९२. **त्राहटील्या** – पिटल्या.

**मोहरी** – समोर **वैवस्वताच्या धामा** - यमसदनाला.

९४. **मोगर** – पायदळ. **पडिभरे** – पाठिंब्याने

९५. **पुष्टी** - पाठीवर. **कावीरे** – श्रम.

९९. मृत्य /त्यु ) धाके – मरण भयाने.

१००. गां (गा) धिज – विश्व मित्र.

१०४. किरान फोडिले – उडी मारली.

१०६. नेत्र रोरंभा – नेत्ररोलंब, नयनभ्रमरांना.

१०७. वर्ण (न) श्री – वनशोभा.

१०८. सुरवाडे – आनंदाने.

१०९. च्यूतवृक्ष – आम्रवृक्ष.

११२. वे (वि) षधर – सर्प.

११३. निग्रोध – वड.

११४. कनककल्हारे – सुवर्ण कमळे

११५. कटका – सैन्याला.

११८. उल लु का – घुबडास. वायने – कावळे.

१२९. धरारमण – भूपति.

१३०. त्रिशंख रायाचा नंदन – हरिश्चंद्र हा त्रिशंकूचा मुलगा.

१३३. अपर – दूसरी.

१३६. कबरी आ) छदिले – वेणीच्या केसांनी झाकले

१३७. बिभछ (त्स) – ओंगळ.

१४५. वमीत – ओकत.

१४६. वैश्वानर – अग्नि.
दामिनीवर – मेघ.
क्षमापं। ज र – क्षमेचे चिलखत.
सिखी सीखा – अग्नि ज्वाला.
मृगांकमरी (चि) का – चंद्र किरणे.
कुंभिनीवर – भूपती.
शु (सु) शुप्तीने – झोपेने.

## अध्याय दुसरा

तारामतीच्या मांडीवर मस्तक ठेवून राजा अर्धनिद्रावस्थेत पहुडला असता त्याला स्वप्न पडते. स्वप्नात ब्राह्मण वेशात आलेल्या विश्वामित्रांना राजा राज्यदान करतो राज्यदान केल्यावर स्वप्नात आलेल्या काळपुरुषाने लोहदंड मस्तकावर मारताच राजा झोपेत बरळू लागतो. तारामती राजाला जागे करते. विश्वामित्र तेथे प्रकटतात. राजा त्यांना स्वप्न सांगतो व विश्वामित्रांच्या अिच्छेमुळे त्यांना २।। तुके सुवर्ण दान देण्याचा संकल्प सोडतो. संकल्प सोडल्यावर त्यांच्यासह राजा आयोध्या नगरीत परत येतो. राजाने राजवाड्यात प्रवेश करताच विश्वामित्र द्वारातच वाट अडवून बसतो व तारामतीला आत शिरू न देता संकल्पित सुवर्णासाठी तिचा अपमान करतो राजा येऊन तिला कारण विचारतो. राजाने अंकुश, कड्याळ, लेखणी म्हणजे राज्यदान केल्यानंतर विश्वामित्र २।। तुके सोन्यासाठी राजाला खांबाला बांधून मारू लागतो. रोहिदास तेथे येऊ विश्वामित्राचे पाय धरून राजाकडून कोणता अपराध घडला त्याची चौकशी करतो. अयोध्या नगरीतील धनाढ्य व्यापारी, मुनींना सुवर्ण देऊ करतात परंतु विश्वामित्र ते मानत नाही यावर रोहिदास म्हणतो की, मी तुमच्यापाशी गहाण राहून पितृऋण फेडण्याचा प्रयत्न करतो

विश्वामित्र राजाला राज्यत्याग करण्याची आज्ञा देतात राजा, तारामती व रोहिदास अरण्यातून जात असता विश्वामित्र सूर्याला पूर्ण तेजाने तापण्याची आज्ञा करतात त्याचप्रमाणे ज्या मार्गाने राजा जात असेल त्या मार्गावरील सर्व पाणी आटवून टाकण्याची वरुणाला आज्ञा करतात. रोहिदासाला खूप खूप तहान लागते. विश्वामित्र प्रकट होऊन तिघांचेही पादत्राणे मागतो. राजा देऊन टाकतो विश्वामित्र मायाजालाने रमणीय पाणपोयी निर्माण करतो राजा पाणपोई पाहून माघारा येतो.

।। श्री गणेशाय नमः ।।

अंगनाअंकी वाम कर्ण । ठेउनि पहुड नरभुशण ।
देउळद्वारीं प्रधान । सावधान बैसला ।।१।।

अपर देहीची श्रुष्टि जननि । मानस विलासे राजधानि ।
नसोनि साचोकार नयनि । दावी जैसें मृगांबु । २ ।

की श्रमसागरींचा वडवानळीं । मानसवृक्षीं कामनावल्ली ।
सुरवाडोनि स्वप्नफळी । सुखदुःखरसेंसी । ३ ।

ऐसी नीद्रा लागतां राया । वीचीत्र रुषीची अलोट माया ।
आपण स्वप्नी प्रगटोनियां । विश्वामीत्रे द्विजरूपे । ४ ।

स्वप्नी देखोणि द्विजातें । रायें नमिला जोडिल्या हस्ते ।
येरू गौरवी तयातें । मनोरथावाप्तस्तु । ५ ।

राजा बोले उदार वचनि । कवन कामना इच्छुनि मनि ।
येथे आलेंत तें श्रवणि । स्तुत केलें पाहिजे । ६ ।

ब्राह्मण म्हणे राया समर्था । संसारविपिनामाजी वसता ।
दरीद्रव्याघ्र उठे अवचीता । तो कंठी बैसला । ७ ।

तु दयासिळ धर्ममुर्ति । बहुंता वगत्रें ऐकीली कीर्ति ।
यालागी शरण नृपतीं । तुज आलो समर्था । ८ ।

ऐश्वर्य सौर्य धरुनि शरीरीं । सेना पंजर घालुनि वरीं ।
राजवहनि वळघोनि करीं । कोशशस्त्रे सतेज । ९ ।

ऐसीयापरी दारीद्रव्याघ्रा । वधावे हा हेत गा नृपवरा ।
धरोनी आलों मि पवीत्रा । तुजपासीं याचक । १० ।

राजा ह्मणे याहुनि परता । लाभ कोण तो असे आता ।
रायें संकल्प घालितां । जाला बोलता द्विजवरु । ११ ।

अंकुश कडयाळें लेखणि । इतुके वोपि माझा पणि ।
रायें दीधले ह्मणोनि । उदक हस्तीं घातलें । १२ ।

सवेची आणोक देखे दृष्टी । काळपुरुष उभा पृष्टी ।
लोहार्गळा धरोनी मुष्टी । हाणें मस्तकी नीघातें । १३ ।

तेणें प्रहरें भयभीत । स्वप्नामाजी असे बरळत ।
तारामतीनें जागृत । राजा केला हस्तकें । १४ ।

निजरूप विसरूनि । अज्ञानभ्रमें भ्रमतां योनि ।
सुखदु:खाची आटनि । भोगीजेती सर्वथा । १५ ।

हें जाणिजें भूत स्वप्न । मीं माझें माजि बरळणें ।
अज्ञाननीद्रेचे लक्षण । जीव ऐसें बोलीजे । १६ ।

तया संसारविपीनामाजि । अज्ञान नीद्रेच्यिये सेजि ।
वाहें जन्ममृत्युंची वोझी । रंकपणें समर्थ । १७ ।

ऐशा अज्ञानतमाचा हर्ता । श्रीगुरु नीजात्मपददाता ।
क्लेशातीत करी तेवी कांता । सावध करी रायातें । १८ ।

उठोनि बैसला सावधान । करीता जाला हरीस्मरण ।
तारामति ह्मणे कोण । अवस्था जाली तुम्ह्मांसी । १९ ।

राजा ह्मणे म्या सुकृतकोटी । राज्यादानें जोडील्या सेवटीं ।
यक काळापुरुष दृष्टी । लोहदंडेसी देखीला । २० ।

तेणें दंडें हाणतां सीरीं । भयें बरळलों स्वप्नांतरीं ।
तुवां उठवीता वो सुंदरी । क्लेशातीत मी जालो । २१ ।

येरी ह्मणे जी प्राणजीवना । इया तीर्थे करुनि स्नानां ।
अग्नीवदनिं घालुंनि अवदाना । स्वप्नदोष नाशणें । २२ ।

प्रधान ह्मणे महाराजा । कांहीं दान वोपीजे द्वीजा ।
तंव अकस्मात तपोतेजा । वीश्वामीत्रा देखीलें । २३ ।

राजा नमुनि बोलें वचन । स्वामि आजी शयनिं स्वप्न ।
आह्मी देखीलें त्याचे ज्ञान । प्रगट केले पाहिजे । २४ ।

तुमच्या प्रतिमेचे रूपडें । ऐसा ब्राह्मण देखीला पुढे ।
आसीर्वचन बोलोनी तोंडें । इच्छा करी दानांचि । २५ ।

सींहासन हें मेदिनि । राया दे गा मजलागुनि ।
ऐसें बोलतां ततःक्षणिं । दान वोपि द्विजातें । २६ ।

सीधुवासाधेधु धरणिं । नवखंडा रत्नभूषणि ।
धनु सुदोहा राजभाजनी । आज्ञायुक्त सवछा । २७ ।

ऐसीया दाने सुकृतरासी लाहतां उदेली वीवसी ।
काळपुरुष लोहदंडेसीं । देखें हाणें मज सीरीं । । २८ ।

रुषी ह्मणे राया समर्था । असो स्वप्नीची या माइक वार्ता ।
दर्पणि बींब जेंवी हातां । नये सर्वथा तेवि स्वप्न । २९ ।

प्रस्तुत मागावया तुते । इच्छा धरुनि आलो येथें
औट तुक कनकातें । मज दीधलें पाहीजें । ३० ।

उदारपणें देसील जरी । उदक घाली माझीये करीं ।
राजा ह्मणे आपुले नगरीं । आलें पाहीजे दयाळा । ३१ ।

रुषी ह्मणें संकल्पेवींणें । किन्निमित्य नगरा येणें ।
येरें घेउनीयां जींवन । रुषीहस्तीं घातलें । ३२ ।

रायें स्नान कांसारजीवनी । सारूनि गीरीजावर पूजुनि ।
विश्वामीत्रा ह्यासनी । बैसउनि चालीला । ३३ ।

प्रधान आपण तारामति । सरसी चरणिं चालती ।
सीद्धाश्रम सांडुनि पुढती । जातां सेनां टाकिली । ३४ ।

वाहीणिवेष्टीत वीर रावो । चालतां वाद्यां लागला घावो ।
विजयश्रीयेंसी घरानाहो । अयोध्यापुरा पातला । ३५ ।

राजा आला ह्मणोनि नगरी । शृंघारीली नाना परी ।
अनेक वहनि वळघोनि पुरीं । बाहीर थोवे दाटले । ३६ ।

वाद्यें गजरीं मंगळ तुरीं । राजा प्रवेशला नगरी ।
कामिनिवृंदे माडीया गोपुरी । भूपचंद्रातें लक्षीतीं । ३७ ।

कनकताटीं हेंमसुमने । राजमुगुटा लक्षुनि नयनें ।
अंजुळी भरुनि टाकितां तेणें । सुमनघनें वरुषिजे । ३८ ।

राजा प्रवेशतां मंदीरीं वीश्वामीत्र बैसला द्वारीं ।
दंड पडताळुनीयां करी । तारामति लक्षीली । ३९ ।

दंडे हानोनि मोडीली शीबीका । वेनीय कवळुनी नृपनायका ।
देइं ह्मणे माझीया कनका । ह्मणोणिया तीतें मारीत । ४० ।

येरी थरथरा कांपत । अटहाशें रोदन करीत ।
रायाते जाणवली मात । आला धांवत रुषिपाशी ।४१।

राजा ह्मणे दयासागरा । कवण्या अपराधें स्त्रीयेसी मारा ।
तो दोष स्छापुनि शरीरा । खंडन कीजे तीळतुल्यें ।४२।

संकल्प करुणि आनीलें येथें । सेवटी हारी टाकुनी मातें ।
दान नेदीतां सदनातें । प्रवेश केला हा दोषु ।४३।

रायें पाचारूनि भांडारीं । ह्मणे कनक आनां झडकरी ।
धानादीधीशें सत्वरी । कनक मार्दुरुसा आणील्या ।४४।

तुळें उभदीली धडधडां । कनकखोटी भरी पालडां ।
रुषी ह्मणें राया मुढा । कनक देशी कवणाचे ।४५।

माझें मज देसी धन । या धर्माचें कोण लक्षण ।
मज दीधले राज्यदान । तें काय हीरोंनी घेतलें ।४६।

वोपिले दान हीरोनी घेती । ते पुर्वजेसी नरकीं पचती ।
सवीतासुनुच्या दुतीं । त्रासीजेति सर्वथा ।४७।

राजा ह्मणे जी दयार्णवा । बरें सुचलें देवाधिदेवा ।
राज्यदानें भवार्णवा । माजी बुडतां तारीलें ।४८।

संत भवार्णवि तारक । जे मोहमताचे चीदार्क ।
सारुनि जीवित्वकळंक । सीवस्वरुपी मेळवीती ।४९।

ह्मणोनि अमात्यप्रधान । छत्र मुद्रा सोहासन ।
रुषीकरी वोपोनि नमन । करुनि बोले सेवकां ।५०।

नवखंड धरेची आज्ञा । सुमनें पुजीले म्यां प्राज्ञा ।
तुह्मी न करुनि अवज्ञा । रुषीमत्तें वर्तावे ।५१।

अंकुश कडचाळे लेखणि । रायें वोपिलि ऋषीचरणिं ।
हें पावलें ह्मणे मुनि । दान देइं कनकाचें ।५२।

स्तंभी बांधोनियां राया । कठोर दंडे मारो तया ।
दुःखे समस्त नगरजाया । शोक करिति अक्रोशें ।५३

ऐसीया दाने सुकृतरासी लाहतां उदेली वीवसी ।
काळपुरुष लोहदंडेसीं । देखें ह्राणें मज सीरीं । । २८ ।

रुषी ह्मणे राया समर्था । असो स्वप्नीची या माइक वार्ता ।
दर्पणि बींब जेंवी ह्रातां । नये सर्वथा तेवि स्वप्न । २९ ।

प्रस्तुत मागावया तुते । इच्छा धरुनि आलो येथें
औट तुक कनकातें । मज दीधलें पाहीजे । ३० ।

उदारपणें देसील जरी । उदक घाली माझीये करीं ।
राजा ह्मणे आपुले नगरीं । आलें पाहीजे दयाळा । ३१ ।

रुषी ह्मणें संकल्पेवींणें । किन्निमित्य नगरा येणें ।
येरें घेउनीयां जीवन । रुषीहस्तीं घातलें । ३२ ।

रायें स्नान कांसारजीवनी । सारूनि गीरीजावर पूजुनि ।
विश्वामींत्रा हयासनी । बैसउनि चालीला । ३३ ।

प्रधान आपण तारामति । सरसी चरणिं चालती ।
सीद्धाश्रम सांडुनि पुढती । जातां सेनां टाकिली । ३४ ।

वाहींणिवेष्टीत वीर रावो । चालतां वाद्यां लागला घावो ।
विजयश्रीयेंसी धरानाहो । अयोध्यापुरा पातला । ३५ ।

राजा आला ह्मणोनि नगरी । शृंघारीली नाना परी ।
अनेक वहनि वळघोनि पुरीं । बाहीर थोवे दाटले । ३६ ।

वाद्यें गजरीं मंगळ तुरीं । राजा प्रवेशला नगरी ।
कामिनिवृंदे माडीया गोपुरी । भूपचंद्रातें लक्षीतां । ३७ ।

कनकताटीं हेंमसुमने । राजमुगुटा लक्षुनि नयनें ।
अंजुळी भरुनि टाकितां तेणें । सुमनघनें वरुषिजे । ३८ ।

राजा प्रवेशतां मंदीरीं वीश्वामीत्र बैसला द्वारीं ।
दंड पडताळुनीयां करी । तारामति लक्षीली । ३९ ।

दंडे ह्रानोनि मोडीली शीबीका । वेनीय कवळुनी नृपनायका ।
देइं ह्मणे माझीया कनका । ह्मणोणिया तीतें मारीत । ४० ।

येरी थरथरा कांपत । अटहाशें रोदन करीत ।
रायाते जाणवली मात । आला धांवत रुषिपाशी ।४१।

राजा ह्मणे दयासागरा । कवण्या अपराधें स्त्रीयेसी मारा ।
तो दोष स्थापुनि शरीरा । खंडन कीजे तीळतुल्यें ।४२।

संकल्प करुणि आनीलें येथें । सेवटी हारी टाकुनी मातें ।
दान नेदीतां सदनातें । प्रवेश केला हा दोषु ।४३।

रायें पाचारूनि भांडारीं । ह्मणे कनक आनां झडकरी ।
धानादीधीशें सत्वरी । कनक मार्दुरुसा आणील्या ।४४।

तुळें उभवीली धडधडां । कनकखोटी भरी पालडां ।
रुषी ह्मणें राया मुढा । कनक देशी कवणाचे ।४५।

माझें मज देसी धन । या धर्माचें कोण लक्षण ।
मज दीधले राज्यदान । तें काय हीरोंनी घेतलें ।४६।

वोपिले दान हीरोनी घेती । ते पुर्वजेसी नरकीं पचती ।
सवीतासुनुच्या दुतीं । त्रासीजेति सर्वथा ।४७।

राजा ह्मणे जी दयार्णवा । बरें सुचलें देवाधिदेवा ।
राज्यदानें भवार्णवा । माजी बुडतां तारीलें ।४८।

संत भवार्णवि तारक । जे मोहमताचे चीदार्क ।
सारुनि जीवित्वकळंक । सीवस्वरुपी मेळवीती ।४९।

ह्मणोनि अमात्यप्रधान । छत्र मुद्रा सीहासन ।
रुषीकरी वोपोनि नमन । करुनि बोले सेवकां ।५०।

नवखंड धरेची आज्ञा । सुमनें पुजीले म्यां प्राज्ञा ।
तुह्मी न करुनि अवज्ञा । रुषीमत्तें वर्तावे ।५१।

अंकुश कडचाळे लेखणि । रायें वोपिलि ऋषीचरणिं ।
हें पावलें ह्मणे मुनि । दान देइं कनकाचें ।५२।

स्तंभी बांधोनियां राया । कठोर दंडे मारो तया ।
दुःखे समस्त नगरजाया । शोक करिति अक्रोशें ।५३

तंव पातला रोहिदास । रुषीचें चरणी मस्तकास ।
ठेउनिं ह्मणे कोण दोष । घडला स्वामि रायासीं । ५४

येरें पावकातुल्य नयेन । करुंणि ह्मणे हा कवणाचा कवण ।
राजा ह्मणे कुळभुषण । होये नंदन पै माझा । ५५ ।

तया देखतां पीता जनन्नी । आधीक मारि गांधीज मुनीं ।
हे देखोणिं नगरजन्नी । हाहाकारे वर्तीजे । ५६ ।

धनाढचे पुरीचे सौदागर । करुणां करीति रुषीसमोर ।
आह्मी धनें देऊं राजेश्वर । सोडीलें पाहीजे दयाळा । ५७ ।

विश्वामीत्र ह्मणे तयाप्रति । मातें वोपीली सर्व जगती ।
राज्य आणि संपत्ति । यावेगळी दक्षणा । ५८ ।

क्षीतीवऱ्हील जीतुके धन । तीतुके हे माझेंची जाण ।
या वेगळे कोठुन कोन । देइल धन मजलागी । ५९ ।

रोहीदास म्हणे जी ऋषी । मि गाह्मन राहीन तुम्हांपासी ।
पीतृवचनांच्या ऋणांसी । उत्तीर्ण होइन स्वामिया । ६० ।

रुण हत्या आणि वैर । मेलीयां न चुके नींर्धार ।
यालागी धरुनि शरीर । जन्मोजन्मी फेडीति । ६१ ।

परीसोनिं बाळकाचे वचनें । ऋषीं चमत्कारला मनें ।
हे येक तीघे जनें । जालीया न चले श्रेष्टाचे । ६२ ।

किं ज्ञान वैराग्य भक्तिमेळे । असतां भवाचे भय पळे ।
तेवीं भार्या सुत भूपाळे । येकचीत केलीयां । ६३ ।

आमुच्या तपाचीया रासी । वेचील्या ऐसें नीज मानसी ।
भावोंणि म्हणे नृपासी । आमुच्या देशि न राहे । ६४ ।

राजा म्हणे क्षमामुर्ति । कासि नवखंडापरौति ।
तेथें जाउनिं भलत्या रिति । रुण फेडीन स्वामिचे । ६५ ।

येका मासाची आवधि । दीधलि पाहीजे दयानिधि ।
रुषी म्हणे नेमसंधी । टळता शापुनिं जाळोन । ६६ ।

निके म्हणोनि नमुनि चरणा । सव्य घालुनि प्रदक्षणां ।
सहकुमार स्त्रियेंसि वना । निघतां जाला आकांत । ६७ ।

वाटला पौरजांचा पाळा । नेत्रीं उदकें वाहति ढळढळा ।
येक करें पीटुनि कपाळा । सद्‌गदीत बोलती । ६८ ।

म्हणति कैंचा ब्राह्मणग्रहो । भुपचंद्रासी लागला पाहा हो ।
राजा दवडुनि पुरी नाहो । हो पाहे दुरात्मा । ६९ ।

वनिता सद्‌गदीत कंठीं । रुषीवदना पाहोनि दृष्टी ।
वीकटा करुनियां भृकुटी । रोषें मोडी आंगोळीया । ७० ।

रायें अवलोकोनि जना । ह्मने स्नेहे असों द्या आह्मी वना ।
जातो परी त्या तपोधना । मत्तें वर्तीजे सकळीकिं । ७१ ।

राजा अवलोकी सदनांकडे । तव पशु पक्षी तीतुका रडे ।
आहार वीसरूनीया तोंडें । शब्द करू लागलीं । ७२ ।

वाजी वारण खचर उष्ट्रें । पयोधर पशुचीं खिल्लारें ।
सीकारी श्वापदें महाक्रुरें । तें गहीवरें दाटली । ७३ ।

कनक पांजीरां सारीका रावे । संस तीतर मयूर लांवे ।
तयां सोडुनि ह्मणे जावे । नीजस्थानां आपुलीया । ७४ ।

तया सोडीतां गगनोदरीं । पक्षी बोलती मंजुळ स्वरीं ।
आह्मां नीरउनि कवणा करीं । कोठें जासी स्नेहाळा । ७५ ।

चीत्रशाळेचीं निर्जिव लेपें । गहीवरें बोलति विलापें ।
आह्मां सांडुनि कवणापे । स्वीकारीसी प्रवास । ७६ ।

नरनाथ सांडुनी ममता । तया संबोखोनि आता ।
तुह्मांसी रक्षो अपरधाता । प्रतिशृष्टिचा कौशिक । ७७ ।

ऐसें बोलोनिया वेगें । बाहेर निघालीं त्रीवर्गे ।
साळंकार देखोणि संगे । विश्वामीत्र धांविनला । ७८ ।

तारामति धरुनि हातिं । म्हणे माझ्या राज्यांतिल संपति ।
भूषणेंक काढुं माझ्या हातिं । देउनि जाणें वनवासा । ७९ ।

राजा रोहीदास तारामति । नगर सांडुनि वनांप्रति ।
गेलीं पुढें कैसी गती । वर्तली ते अवधारा ।८०।

संसारसागरीचीं जाहाजे । सत्वकेनें भरीत वोझें ।
धैर्यध्वज शीड विराजे । सत्कीर्तीवासें मस्तकिं ।८१।

गांधीजबंदरी शुद्ध केनें । भरलें देउनि राज्यनानें ।
गुरुकृपेच्या प्रभंजने । कैवल्यपेठें जातसे ।८२।

येरीकडे पौरजवासी । दुःखशोक अधोवदनेंसी ।
वियोगतापें सायासी । नीजधामांसि पातलें ।८३।

घोर वनांतरी कुंभीनींपति । सकुमार संवें तारामति ।
राजकुमरु धरुनि हाति । जातां कैसे वर्तलें ।८४।

वीश्वामीत्रें काय केले । कृतांतजनका अज्ञापिले ।
म्हणे आजि द्वादशकळे । तपलें पाहिजे ममज्ञा ।८५।

कौसिकदर्पे सहस्त्ररस्मि । तपों लागला कूर व्योमि ।
तेणें तेजें पर्वतभुमि । तपोनियां उलो पाहे ।८६।

सवेची वरुणांलागी कोपें । म्हणे जया पंथे चालींजे नृपें ।
सरीतासरोवरीचीं आपें । नेउनि शुष्क करावीं ।८७।

केवढे रुषीचें सामर्थ्य । वरुणें केला निर्वारीं पंथ ।
कुप तडागें सरीता समस्त । आरद्रताही लोपलि ।८८।

सपुत्रकांता चालतां पंथी । उष्णें करपली सकुमारकांती ।
कडीये कुमर तारामति । घेउन चाले हळु हळु ।८९।

अंतरी तृशाशोकानें । तनु तापली उष्ण कीर्णे ।
तेणें कोमायलीं वदनें । देहधर्म लवथवित ।९०।

रोहीदास ह्मणे जी ताता । त्रृषेणें प्राण जाइल आतां ।
ह्मणोन कडीयेहुन खालुता । पडोनी लोळे गडबडां ।९१।

माता ह्मणे बा तान्हया । पैल तरुतळी दीसे छाया ।
तेथे बैसोनियां तोया । आनुनि पाजुं तुजलागी ।९२।

ह्मणोनि गेली तरुतळी । तो रविबिंब आलें मध्यमंडळी ।
स्वल्प छाया दीसे मुळी । जाउनि तेथे बैसली । ९३ ।

राजा पाहे बनांतरी । कुप सरीता सरोबरी ।
बीदुमात्र न दीसे करी । हृदये जैसें अधमाचें । ९४ ।

राये शोधीलें सकळही वन । कोठे न मीळेची जीवन ।
टाकोनि आला नंदन । जेथे होता मातेसी । ९५ ।

भार्या पाहे रायाकडे । तव मुखसरोज दीसे कोरडे ।
उदक न देखोणि धडें । पृथ्वीवरी टाकिली । ९७ ।

राजा अवलोकि तयातें । धुळीमाजी पडलीं जैसी प्रेते ।
पल्लवे वारा घालुनि हाते । उठउनि केली सावध । ९८ ।

कुमार ह्मणे द्यावे जीवन । परीसोनि रायें उभय नयन ।
भरोनि म्हणे खेदवचनें । पुढें असें बा पाडसा । ९९ ।

ऐसें बोलोनि उभय करी । कवळुनि चालतां पुढारी ।
विश्वामित्र वनांतरी । प्रगट जाला अवचितां । १०० ।

रायें देखोणि केलें नमन । येरी दीधलें असीवचन ।
म्हणे तुझा कीर्ती परीसोन । आलो येथें सकाम । १०१ ।

राजा म्हणे सांगीजे स्वामि । येरु म्हणे तीर्थासी आम्हीं ।
भार्या कुमर समागमि । जातां चरण पोळती । १०२ ।

आह्मांसी देता पादत्राणें । तयासी कल्यान नारायणें ।
किजे म्हणता नरभुषणे । वसनें वोपिलि पायांची । १०३ ।

तीघें जाति नग्न चरणि । तळी तापलि असे धरणि ।
माथे पोळति उष्ण किर्णि । अंतरी तृशेने पिडिले । १०४ ।

ऐसीया दुःखे चालता पंथीं । सकुमार पाउलें पोळती ।
फोड उठोनि निघे कांति । नखें उलती बोटाची । १०५ ।

यापरी तीघें चालता कष्टें । तापसें घातलीं अव्हाटें ।
पाइं नीघती पूर्णकाटे । आणि सराटे रुतती । १०६ ।

सकुमारबाळ ह्मणे जी ताता । अत्यंत मळयो मांडला आता ।
रुषारुण न फेडिता । मरतां जाउं नरकासी । १०७ ।

ऐसी लंघोनि वनोपवनें । पुढें विश्वामीत्रवाटीका नयनें ।
राये देखीले जे मनें । मायामय निर्मिलि १०८ ।

विश्वामीत्रे रमणिक धाम । पुढे निमिले मनोरम ।
जया देखता हरती श्रम । दोष जैसें हरीनामे । १०९ ।

तेथे सुरतरुची छाया । सदनि रंभाऐंसी जाया ।
कनक राजनि भरोनि तोया । वेळा वाळी सीतळ । ११० ।

सुवर्णपात्री भरोनि चंदने । सुवास वाळ्याचे वीजनें ।
पाकशाळेमाजी अन्नें । नानांविधें शडरसें । १११ ।

शय्यास्छानि हेममंचकी । मालती मोगरे बकुल चंपकि ।
सेज रचुनियां सेवकि । आलीयातें पहुडाया । ११२ ।

पुराण गीत धर्म चर्चा । महिमा वर्निति इश्वराचा ।
वारा न लगे श्रमांचा । जया श्रवणें पांथिका । ११३ ।

ऐसी रुषीनिर्मिती पोहे । राजा चालतां दुरुनि पाहें ।
जीवनालागी लवलाहे । जाता झाला पुढारा । ११४ ।

सुतकांता सांडुनि मागें । मायावर्नि पातला वेगें ।
पोहे जाणोनियां निघे । राजा तेथुनि माघारा । ११५ ।

आतां येथुनीं कथावाहीनि । भरोनी चालेल सत्वजीवनि ।
नानांविघ्नें–गिरिभंगोनि । कैवल्येंसागरीं मिळेल । ११६ ।

मुळीं गुरुकृपेची वाकडी । लागली तेणें उभय थडीं ।
भरोनि वाहे ब्रह्मांडी । सत्किर्ती घोषें गर्जत । ११७ ।

इतिश्री भारत आरण्येपर्व । पवित्राख्यान अति अपूर्व ।
श्रवणे नाशती दोषसर्व । मुक्तेश्वर कवि म्हणे । ११८ ।

॥ द्वितीयोध्याय । २ । छ ॥ छ ॥

## अर्थ : अध्याय दुसरा

१. तारामतीच्या मांडीवर, डाव्या कुशीवर हरिश्चंद्र राजा झोपी गेला. मंदिराच्या दारात प्रधान सावधपणे बसला.

२. या दोन ओव्यात निद्रेचे वर्णन केलेले आहे.निद्राही वेगळयाच लोकांची सृष्टी निर्माण करणारी असून मनाच्या राजधानीत विलास करणारी मृगजळा प्रमाणे नसलेले खरे भासविणारी आहे.

३. श्रमरूपी सागराच्या वडवानळात (अग्नीत) सापडले असता मानसरुपी वृक्षाला वेटाळून असलेली इच्छारुपी वेल सुखदु:खरुपी रसांनी भरलेली स्वप्नफळे देते.

४. याप्रमाणे राजाला झोप लागताच विश्वामित्र मायाने (जादुने) ब्राह्मणरुपाने राजाच्या स्वप्नात आला

५. स्वप्नात ब्राह्मणाला पाहून राजाने त्यास नमस्कार केला. विश्वामित्राने राजाचा गौरव करून तुझी मनीषा पूर्ण होईल. असा आशीर्वाद दिला.

६. आपण कोणती इच्छा मनात ठेवून येथे आलात असे राजाने ब्राह्मणाले विचारले.

७. ब्राह्मण म्हणाला, समर्थ राजा संसारात दारिद्ररुपी वाघ माझ्या मानगुटीवर बसला आहे.

८. तू दयाशील असून धर्ममूर्ती आहेस, अशी तुझी कीर्ती खूप लोकाकडून ऐकली आहे म्हणून मी तुला शरण आलो आहे.

९. ऐश्वर्यरुपी शौर्य धारण करून त्यावर सैन्यरुपी चिलखत घालून तुझ्या वहानावर आरूड होऊन शस्त्रगारातील शस्त्रे सतेज करावी. (पराक्रम करावा.)

१०. याप्रमाणे दारिद्रवाघाचा वध आपण करावा, हा हेतू मनात ठेऊन मी याचक म्हणून तुमच्याकडे आलो आहे.

११. यावर राजा असे म्हणाला की तुमची इच्छा पूर्ण करण्यापेक्षा दुसरी कोणती चांगली गोष्ट असू शकेल? असे राजाने म्हणून संकल्प सोडताच ब्राह्मण म्हणाला --

१२. अंकुश, लगाम व लेखणी (एकूण राज्य) मला दे. राजाने दिले असे म्हणून संकल्प सोडला.

१३. यानंतर राजाला स्वप्नात लोहदंडधारी काळपुरुष दिसला त्याने लोहदंड राजाच्या मस्तकावर मारला.

१४. दंडाच्या आघाताने राजा घाबरून बरळू लागला. तारामतीने राजाला झोपेतून जागे केले.

१५. तारामतीने राजाला झोपेतून जागे केले. याचे वर्णन १५ ते १८ या ओव्यात आहे. जीव अज्ञानामुळें आपल्या शिवस्वरूपाला विसरतो, अनेक योनीतून भ्रमण करतो, नानाप्रकारचे सुखदु:खाचे भोग भोगतो.

१६. 'हा मी, हे माझे !' 'ही माझी' अशी भाषा म्हणजेच स्वप्नातील बरळणेच. असे म्हणणारा जीव अज्ञानी समजावा.

१७. तो संसाराच्या वनात अज्ञानाच्या शेजेवर जन्म मृत्युरूपी ओझी विनाकारण वाहतो. समर्थ असून दुबळा ठरतो. असा अज्ञानाचा अधार सद्‌गुरू नाहीसे करतात. आणि त्या जीवाला आत्मज्ञान देतात. तेव्हा तो सुखावतो

१८. अशाच प्रकारे स्वप्नात सुखदु:खाच्या भ्रामक कल्पनेत असलेल्या राजाला तारामतीने जागे केले.

१९. राजा सावध होवून उठून बसून हरीचे स्मरण करू लागला. तारामती राजाला म्हणाली, तुमची अशी कशी अवस्था झाली.

२०. मी राज्यदानाने पुण्यराशी जोडल्या पण शेवटी मात्र लोहदंडधारीं काळपुरुष स्वप्नात पाहिला.

२१. काळपुरुषानें लोहदंड मस्तकावर मारताच मी बरळलो. तू मला उठविल्या मुळे माझे भय नाहीसे झाले.

२२. राणी म्हणाली– तीर्थांनी स्नान करून, अग्नीला आहूती देऊन स्वप्नातील संकटाचा नाश करावा.

२३. ब्राह्मणांना काही दान द्या. असे प्रधानानी सुचविताच अचानक तप:तेजस्वी विश्वामित्रमुनी तेथें आले.

२४. राजा विश्वामित्राला नमन करून म्हणाला की, स्वामी आज मला एक स्वप्न पडले ते तुम्हास सांगितले पाहिजे.

२५. तुमच्यासारखा दिसणारा एक ब्राह्मण मी स्वप्नात पाहिला. त्याने आशीर्वाद देऊन दानाची इच्छा केली.

२६. हे भूपाळा, तुझे राज्य मला दे, असे त्याने म्हणताच मी त्याला दिले.

२७. समुद्रहेच जिचे वस्त्र आहे. नवखंड जिची रत्न भुषणे आहेत. अशी पृथ्वी सवत्साधेनूच आहे असे समजून मी दान केले.

२८. अशा दानाने पुण्यरासी जोडत असता एखाद्या राक्षसाप्रमाणे लोहदंडधारी काळपुरुषाने माझ्या शिरावर लोहदंड मारला.

२९. मुनी म्हणाले, राजा स्वप्नातील गोष्ट असो अगर काल्पनिक गोष्ट असो, ज्याप्रमाणे आरश्यातील प्रतिबिंब हाती सापडत नाही, त्याप्रमाणे स्वप्नाचे असते.

३०. तुझ्या मालकीचे अशीच तुके सोनें मला दे. तू देशील अशी इच्छा धरून मी आलो आहे.

३१. उदारपणे तू देणार असलास तर माझ्या हातावर पाणी सोड. राजा म्हणाला हे दयाळू मुनीवर यासाठी तुम्हाला नगरात यावे लागेल.

३२. संकल्पाशिवाय कोणत्या निमित्ताने मी नगरात येवू, असे मुनीनी म्हणताच राजाने हातात पाणी घेऊन मुनीच्या हातावर संकल्प सोडला.

३३. राजाने तळध्याच्या पाण्यात स्नान केले. शंकराची पूजा केली. विश्वामित्राला घोड्यावर बसवून राजाबरोबर घेऊन चालला.

३४. राजा तारामती आणि प्रधान पायी चालू लागले. सिद्धाश्रम ओलांडून गेल्यावर सैन्याला राजाने बरोबर घेतले.

३५. विजय संपादीत केलेला राजा सैन्यासह अयोध्येकडे येत असताना वाद्ये वाद्य वाजू लागली.

३६. राजा नगरात येत असल्यामळे नगर सुशोभीत केल्या गेले. अनेक प्रकारच्या वाहनावर आरूढ होवून नागरिकांनी राजाच्या स्वागतासाठी नगराबाहेर गर्दी केली.

३७. मंगलवाद्यांच्या गजरात राजाने नगरात प्रवेश केला. त्यावेळी स्त्रीयांचा समूह माडीवरून; गोपुरावरुन भूपचंद्राला पाहू लागले.

३८. सोन्याच्या पात्रात; सुवर्ण फुले घेऊन राजावर पुष्पवृष्टी करण्यास सुरवात केली.

३९. राजाने राजवाड्यात प्रवेश केल्यावर विश्वामित्र दारातच बसला हातात दंड घेवून त्यांनी तारामतीकडे पाहिले.

४०. दंडाने काठी मोडून, तारामतीची वेणी धरून माझे सोनें दे, म्हणून तिला मारू लागला.

४१. त्यामुळे ती थरथर कापू लागली. मोठ्याने रडू लागली. राजाला हे समजताच तो धावत आला.

४२. राजा म्हणाला, हे दयासागरा, कोणत्या अपराधासाठी माझ्या पत्नीला मारता. तो अपराध मला लाऊन, माझे तिळा एवढाले तुकडे केले तरी चालेल.

४३. संकल्प करून मला येथे आणले मला मागे टाकून दान न देता राजवाड्यात प्रवेश केलास, हा अपराध तू केलास.

४४. राजाने कोषाधिकाऱ्यास लवकर सोने आणण्यास सांगितले. कोषाधिकाऱ्याने सोन्याने भरलेल्या पेट्या लवकर आणल्या.

४५. तराज उभा करून सोन्याच्या चिपा (लगडी) पालड्यात भरण्यास सुरवात केली. तेव्हा मुनी म्हणाले, मुर्खा सोने कोणाचे देतोस ?

४६. माझे धन मलाच देतोस, हे दानाचे कोणते लक्षण आहे. मला राज्यदान दिले ते काय हिसकाऊन घेतले का ?

४७. केलेले दान जे परत घेतात ते पूर्वजासह नरकात जातात. यमदूताकडून त्यांना नेहमी त्रास दिला जातो.

४८. राजा म्हणाला, हे दयासागरा, देवाधिदेवा तुम्ही हे सांगितले ते चांगले केले. संसारसागरात बुडताना तुम्ही मला राज्यदान घेऊन तारले.

४९. ज्याप्रमाणे मोहरूपी अधःकाराचा नाश करणारे संतरूपी सूर्य संसारसागरातून तारून नेणारे ठरतात. त्याप्रमाणे जीवाला लागलेले पाप नाहीसे करून संत शिवरूपात मिळवून टाकतात.

५०. म्हणून अमात्यप्रधान, छत्र, मुद्रा सींहासन विश्वामीत्राला देऊन, नमन करून सेवकांना राजा म्हणाला की–

५१. मी मुनीवराची चांगल्या मनानं पूजा केली व त्यांना राज्यदान केले. तुम्हीही त्यांची अवज्ञा होणार नाही असे वर्तन करावे.

५२. अकुश, कड्याळे, लेखनी राजाने मुनीच्या चरणी अर्पण केली. मुनी म्हणाले 'आता सोन्याचे दान दे !'

५३. असे म्हणून– विश्वामीत्रानी राजाला खांबाला बांधून त्याला काठीनें मारू लागले. तेव्हा नगरीतील स्त्रीया दुःखाने शोक करू लागल्या

५४. तेव्हा तेथे रोहिदास आला. मुनीवराच्या चरणावर मस्तक ठेऊन तो म्हणाला स्वामी राजाकडून कोणता अपराध घडला.

५५. अग्नीसारखे डोळे करून विश्वामित्र म्हणाले– हा कोणाचा, कोण आहे ? राजा म्हणाला, 'हा कुलभूषण असलेला माझा मुलगा आहे.'

५६. त्याला पाहाताच विश्वामित्राने राजाला व राणीला अधिक मार देण्यास सुरवात केली. हे पाहून नगरीतील लोक हळहळ करू लागले.

५७. अयोध्या नगरीचे व्यापारी विश्वामित्राला विनंती करून म्हणाले, 'तुम्ही दयाशील आहात, आम्ही धन देतो. तुम्ही राजाला सोडून द्या.'

५८. त्यावर विश्वामित्र म्हणाले, मला राज्य आणि पृथ्वी दान दिली आहे· याशिवाय मला वेगळी दक्षणा हवी आहे.

५९. पृथ्वीवरील जेवढे धन आहे ते सर्व माझेच आहे. याच्या वेगळे कोण, कोठून, मला धन देणार ?

६०. मी तुमच्याकडे गहान राहून पितृवचनाच्या ऋणातून उत्तीर्ण होईल असे रोहिदास म्हणाला.

६१. कर्ज, हत्या आणि वैर या गोष्टी मृत्यूनंतरही सुटत नाहीत. या गोष्टी पुन्हा पुन्हा जन्म घेऊन फेडाव्या लागतात.

६२. रोहिदासाचे विचार ऐकून विश्वामित्र मनात चमकला. हे तिघेजन एक झाले तर कोणत्याही श्रेष्ठ पुरुषाचे काही चालणार नाही.

६३. ज्ञान. वैराग्य आणि भक्ति याचा मेळ झाला तर ज्याप्रमाणे संसाराचे भय नष्ट होते. त्याप्रमाणे पत्नी, मुलगा व राजा यानी एक चित्त केल्यामुळे त्यांना भीती राहिली नाही.

६४. आमच्या तपाच्या रासी यांनी घेतल्या. असा मनात विचार करून विश्वामित्र राजाला म्हणाला तुम्ही आमच्या देशात राहू नये.

६५. यावर हरिश्चंद्र राजा म्हणाला, तुम्ही क्षमामूर्ती आहात. मी तुम्हाला दान केलेल्या नवखंडा व्यतीरिक्त असलेल्या काशी नगरीत जाऊन कोणत्याही रितीने तुमचे ऋण फेडीन.

६६. त्यासाठी मला एक महिन्याचा अवधी द्या. विश्वामित्र म्हणाले, मुदतीत ऋण फेडले नाही तर शाप देऊन जाळून टाकीन.

६७. 'ठीक आहे' म्हणून राजानी विश्वामित्राला नमन केले. विश्वामित्राच्या उजव्या बाजूने प्रदक्षणा घालन पत्नी, मुलाबरोबर राजा अरण्यात निघाला. तेव्हा नागरिकात शोक उसळला

६८. नागरिकाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. एका हाताने कपाळ पिटून ते बोलू लागले.

६९. ब्राह्मणरूपी ग्रहण या भूपचंद्राला कसे लागले आहे. हा दुष्ट माणूस राजाला घालऊन देऊन राज्य बळकावू पाहात आहे.

७०. नगरीतील स्त्रीया गहिवरुन ऋषीकडे रागाने पाहू लागल्या व त्याच्या नावे बोटे मोडू लागल्या.

७१. राजा लोकाकडे पाहून म्हणाला आम्ही वनात जातो परंतु तुमचे प्रेम राहू द्या. यापुढे तुम्ही मुनीच्या आज्ञेप्रमाणे वागावे.

७२. राजाने राजवाडयाकडे पाहताच पशू पक्षी सर्व रडू लागले. चारा खाण्याचे विसरून पशू हुंबरडा फोडू लागले. तर पक्षी ओरडू लागले.

७३. घोडे, हत्ती, खेचरे, उंट, गाई, म्हशीचे कळप, शिकारी श्वापदे दुःख करू लागले. महाक्रूर असलेल्या शिकारी प्राण्याना देखील गहिवर दाटून आला.

७४. सोन्याच्या पिंजऱ्यातील पक्षी सारिका, पोपट हंस, तीतर, मोर यांना राजाने सोडून देऊन अरण्यात जाण्यास सांगितले.

७५. पक्षांना आकाशात सोडताच पक्षी मंजुळ स्वरात म्हणाले की, हे प्रेमळ राजा, आम्हाला कोणाच्या हाती सोपऊन जातोस.

७६. चित्रशाळेतील निर्जीव चित्रे सजीव होऊन गहिवरून बोलू लागली की, आम्हाला कोणाजवळ सोडून तुम्ही निघालात.

७७ त्याच्यावरील प्रेम सोडून त्यांना उद्देशून राजा म्हणाला, तुमचे रक्षण प्रतिसृष्टी निर्माते विश्वामित्र मुनीच करतील.

७८. असे बोलून तिघेजन वेगाने बाहेर पडले. त्यांच्या अंगावर अलंकार पाहून विश्वामित्र धाऊन आला.

७९. तारामतीचा हात धरून विश्वामित्र म्हणाला– माझ्या राज्यातील अलंकार काढून मजजवळ दे, मगच वनात जा.

८० राजा–राणी आणि मुलगा नगर सोडून वनात गेली पुढे काय झाले ते एका.

८१. संसाररुपी सागरातील जहाजात सत्त्वाच्या मालाचे ओझे भरून, सत्कीर्तीचे शिड उभारून धैर्यरुपीध्वज त्यांच्या मस्तकावर लाऊन ते जहाज जात होते.

८२. राजाने गांधीज बंदरात राज्यदान ही किंमत देऊन सोने भरून गुरुच्या कृपावाऱ्याने जहाज मोक्षाच्या बाजारात चालले.

८३. अयोध्या नगरीतील लोक दुःखाने, कष्टाने, वियोगाने व शोकाने घराकडे परतले.

८४. घोर अरण्यातून कोमल तारामती, रोहिदास व राजा जात असतांना काय घडलें ?

८५. विश्वामित्राने सूर्याला खूप तापण्याची आज्ञा दिली.

८६. विश्वामित्राच्या आज्ञेने सूर्य सहस्र किरणांनी क्रूरपणे तळपू लागला. त्यामुळे पर्वताला व भूमीला उष्णतेने भेगा पडू लागल्या.

८७. त्याचबरोबर वरुणालाही सांगितले की, ज्या रस्त्याने राजा चालत असेल त्या रस्त्यावरील नद्या, सरोवरे कोरडी झाली पाहिजेत.

८८. विश्वामित्राच्या सामर्थ्याने वरुणाने विहिरी, तळे व नद्या सर्वांना ओलेपणाही ठेवला नाही.

८९. कडेवर रोहिदासाला घेऊन तारामती हळूहळु चालू लागली. उष्णतेने त्यांची कांती करपून गेली.

९०. तहानेने घसा सुकला, उष्णतेने शरीर तापले, घाम येऊ लागला, त्यामुळे त्यांची मुखं कोमेजली.

९१. 'तहानेंने आता माझा प्राण जाईल.' असे रोहिदास राजाला म्हणाला व तो कडेवरून खाली उतरून गडबडा लोळू लागला.

९२. आई त्यास म्हणाली बाळा, पलिकडे झाडाखाली सावली दिसते तेथे थांबून तुला पाणी आणून पाजू.

९३. असे म्हणून ते झाडाखाली आले तो सूर्य डोक्यावर आल्यामुळे खोडाच्याकडे असलेल्या थोड्या सावलीत ते बसले.

९४. राजाने वनात फिरून विहिरी, नद्या व सरोवरे पाहिली परंतु त्यात अधमाच्या हृदयाप्रमाणे थोडासाही ओलावा नव्हता.

९५. राजाने सर्व अरण्य धुंडाळले परंतु त्यास कोठेही पाणी मिळाले नाही; म्हणून तो रोहिदासाजवळ परत आला.

९६ तारामतीने राजाकडे पाहिले, त्याने पाणी न आणल्याचे पाहून तिनं अंग धरणीवर टाकले.

९७. तारामती व रोहिदास प्रेतवत जमिनीवर पडलेले पाहून राजाने त्यांना पदराने वारा घालून सावध केले.

९८. रोहिदासाने राजाला पाणी मागितले. तेव्हा राजाच्या डोळ्यात पाणी उभे राहिले राजा कळवळून म्हणाला बाळा, पाणी पुढे आहे.

९९. असे म्हणून त्याला कवटाळून धरून चालू लागला. तेव्हा अचानक विश्वामित्र वनात प्रकट झाला.

१००. राजानें विश्वामित्राला पाहून नमन केले विश्वामित्र आशीर्वाद देऊन म्हणाला तुझी कीर्ती ऐकून मी मनात इच्छा धरून येथे आलो आहे.

१०१. राजा म्हणाला, स्वामी काय इच्छा आहे सांगा. त्यावर विश्वामित्र म्हणाले, पत्नी-मुलासह मी तीर्थयात्रेला अनवाणी पायाने जात आहोत परतु पाय पोळतात.

१०२. आम्हाला जर तुमची पादत्राणे दिली तर नारायण तुमचे कल्याण करील असे विश्वामित्र म्हणताच राजानें पादत्राणे काढून दिली.

१०३. अनवाणी पायाने तिघे चालत असताना जमीन खूप तापली होती. डोक्यावर उष्ण किरणे पडत होती. त्यांना खूप तहान लागली होती.

१०४. अशा दुःखात रस्त्यानें चालतांना त्यांची नाजूक पावले पोळून, फोड उठून तेज जात होते. बोटे उलत होती.

१०५. अशा कष्टात तिघे चालत असतांनाच मुनीनी त्यांना आडवाटेला नेले. त्यामुळे पायात काटे व सराटे रूतू लागले.

१०६. रोहिदास म्हणाला या कठीण प्रलयामूळे ऋषीचे ऋण न फेडता आपण मेलो तर नरकात जाऊ.

१०७. असे वन-उपवने ओलांडून ते विश्वामित्राने निर्माण केलेले उद्यान त्यांना दिसले.

१०८. विश्वामित्राने रमणीय उद्यान पुढे निर्माण केले. पाप हरीचे नाव घेताच जसे दूर होते तसे आश्रम पाहाताच श्रम परिहार होत होता.

१०९. तेथे कल्पवृक्षाची छाया, रंभेप्रमाणे सुंदर स्त्रिया होत्या. सोन्याच्या रांजणात पाणी भरलेले होते. वेलदोडयानें व वाळयानें पाणी थंड व सुगधीत केले होते.

११०. सोन्याच्या पात्रात चंदनाची उटी भरून ठेवलेली होती. तसेच सुवासीक वाळयाचे पंखे होते पाकशाळेत निरनिराळ्या प्रकारचे षट्रिपूयुक्त-पदार्थ तयार होते.

१११. तेथे येणाऱ्यासाठी सोन्याच्या पलंगावर मालती, मोगरा, बकुल, चाफा या फुलांची सेज सेवकाकडून तयार करून ठेवलेली होती.

११२. पुराण, गीत, धर्मचर्चा, ईश्वरगुणगाण यांच्या श्रवणामुळे प्रवाशाला थोडेसे श्रमदेखील जाणवत नव्हते.

११३. याप्रमाणे विश्वामित्राने मायाजालाने निर्माण केलेली पानपोई पाहताच तो वेगाने पुढे चालू लागला.

११३. मुलगा-पत्नी यांना मागे टाकून तो पुढे आला परंतु पानपाई असल्याचे पाहून राजा तेथून मागे फिरला.

११५. आता कथारुप नदी सत्वरुपी पाण्याने भरून चालेल. निरनिराळी संकटे-पर्वत फोडून ती मोक्षसागरास मिळेल.

११६. गुरूकृपेमुळे पावसाची झड लागल्याने कथानदी दुथडी भरुन, सत्कीर्तीचा जयघोष करत ब्रह्मांडात वाहू लागली.

११७. याप्रमाणे महाभारतातील वनपर्वातील आख्यान ऐकल्यामुळे सर्व दोष दूर होतात असे कवी मुक्तेश्वर म्हणतो.

□□□

## टीपा : अध्याय दुसरा

२. या ओवीत निद्रेचें रम्य वर्णन आहे निद्रा ही वेगळ्याच लोकांची सृष्टि निर्माण करणारी, मनाच्या राजधानीत विलास करणारी, मृगजळा प्रमाणे नसलेले खरे भासविणारी आहे हा भावार्थ.

५. **मनोरथावाप्त** प्ति) **रस्तु** – मनीषा पूर्ण होवोत.

८. **वगत्रें** (वक्त्रें) – मुखाने

९. **सेना पंजर** – सैन्यरुपी चिलखत.

१२. **कडयाळ** – लगाम,
अंकुश, कडयाळ आणि लेखणी ही राज्याच्या विविध अंगांची प्रतीके. एकूण राज्य हा भावार्थ.

१३. **लोहार्गळा** – लोखंडी पहार.
**निघाते** – आघाने, तडाख्याने

१५–१८. तारामतीने हरिश्चंद्राला झोपेतून जागे कसे केले याचे सुन्दर अलंकारिक वर्णन यात आहे. जीव अज्ञानामुळे आपल्या शिवरूपाला विसरतो. अनेक योनीतून भ्रमण करतो. नाना प्रकारचे सुख दुःखाचे भोग भोगतो. 'हा मी हे माझे ! हो माझी ! !' अशी भाषा म्हणजे स्वप्नातील बरळणेच असे म्हणणारा जीव अज्ञानी समजावा तो संसाराच्या वनात अज्ञानाच्या शेजेवर जन्ममृत्युरूपी ओझीं विनाकारण वाहतो. समर्थ असून दुबळा ठरतो. अशा अज्ञानाचा अधार सद्गुरु नाहीसा करतात. आणि त्या जीवाला आत्मज्ञान देतात, तेव्हा तो सुखावतो अशाच प्रकारे स्वप्नात सुखदुःखांच्या भ्रामक कल्पनेत असलेल्या हरिश्चंद्राला तारामतीने जागे केले.

२७. सिंधुवासा, नवखंडा, रत्नभूषणि राजभाजनी आज्ञा युक्त धरणी ही सुदोहा सवत्सा धेनूच आहे. पृथ्वी गोरुप मानतात. असे गोदान केले, हा भावार्थ.

२८. वोबसी – राक्षसीण, हडळ.

२९. माई (यी) क – काल्पनीक,

३३. हयासनी – घोड्यावर

३५. धरानाहो – भूपती.

४३. हारीत – रांगेत.

४४. धनादिधीशे (धनाधीशे) – कोषाध्यक्षाने
माई (न्दु) सा – पेटचा.

४५. कनकखोटी – सोन्याच्या लगडी.

४७. सवितासुनुच्यादूती – यमदुतांकडून.

६८. वा (बा) टला – जमला
पाळा – मेळा

६९. पुरीनाहो – अयोध्यापुरीचा राजा

७०. प्रतिश (सृ) ष्टीचा अपार धाता – वेगळी सृष्टी निर्माण करणारा ब्रह्मदेव असा विश्वामित्र

८१. सत्वकेने – सत्वाचा माल

८२. प्रभंजने – सोसाट्याचा वारा

८५. कृतांजनका – सूर्यास

८९. क्रुर . क्रूर) – निर्दयतेने

९०. तृशा (षा) शोकाने
कीर्णे ( किरणे )
कोमायली – कोमेजली
देहधर्म – शरीराचा घाम

९१. त्रु तृ षेणें (ने)

१०६. अव्हाटे – आडवाटेला

११०. वेळा – वेलदोडा

१११. वीजने – पंखे

११४. पोहे – पाणपोई

११७. वाकडी – पावसाची झड

22904

## अध्याय तिसरा

राजा हरिश्चंद्र पानपोई सोडन जात असलेला पाहून विश्वामित्र हातात पाणीपात्र घेऊन त्याच्यामागे धावतात. परंतु अन्नछत्राचे भोजन व पानपोईचे पाणी आम्ही पीत नसतो. असे म्हणून राजा तेथून पुढे जातो राजाच्या पाठीमागून तारामती येते. विश्वामित्राने मायाजालाने निर्माण केलेल्या दृश्यातील युवती हरिश्चद्राची सेवा करीत असलेल्या पाहूनही तिचा त्या दृश्यावर विश्वास बसत नाही तीही राजाप्रमाणेच पाणी न पीता पुढे चाल लागते. रोहिदासही त्यांचेच अनुकरण करतो. नंतर विश्वामित्र अरण्याला वणवा लावतो. त्या वणव्यात राजा-राणी व रोहिदास यांची चुकामुक होते तारामतीला जेव्हा पती-पुत्र दिसत नाहीत तेव्हा तिला असे वाटते की ते वणव्यात सापडले असावेत. म्हणून ती आकांत करू लागली. विश्वामित्र तेथे येवून तिला दोन प्रेते दाखवितात तारामती अधिकच शोक करू लागते विश्वामित्र तिला म्हणतात की, आता रडत बसण्यापेक्षा तू रात्र आमच्या घरी काढ, अरुणोदय होताच योग्य ती उत्तरक्रिया करून त्यांना स्वर्गाचा मार्ग मोकळा करून दे. परंतु तारामती विश्वामित्राचे न ऐकता रात्री प्रेताजवळच थांबते रात्री तिच्यावर दुसरेच संकट येते. महाभयंकर वाघ येऊन प्रेतावर झडप घालतात. हे पाहून तारामती विष्णूचे स्मरण करून डोळे मिटून घेते तेवढ्यात विश्वामित्र राजा व रोहिदास यांना तिच्या समोर आणून उभे करतो. राजा तिला शोक करण्याचे कारण विचारतो व ती घडलेला वृत्तान्त सांगते. यावर राजा म्हणतो की अशीच संकटे भोगून आपण मोक्षपदी जाऊ. असे म्हणून ते पुन्हा प्रवासाला सुरवात करतात. त्यांना मोक्षदायिनी काशी नगरी दिसताच ते सर्वजण तिला साष्टांग प्रणिपात करतात. नगरीत गेल्यावर विश्वामित्र तेथे प्रकट होवून सुवर्ण मागू लागतात. 'सूर्यास्तापर्यंत मी स्वतःला विकून घेऊन आपले ऋण फेडीन' असे वचन हरिश्चंद्र विश्वामित्रांना देतो.

**।। श्री गणेशाय नमः ।।**

विरक्त देखोणि लावण्ये प्रमदा । नैरास्य अवलोकोनि संपदा ।
वैराग्येंबोधें प्रपंचधंदा । देखोणि वींटे ज्यापरी ।। १ ।।

कि चंपक पुष्पांचा अमोदु । सांडुनि जाये जेंवी शटपदु ।
लिंगनिर्माल्यप्रसादु । नातळति धार्मिका । २ ।

ऐसीयापरीं पोहेमंदिर । सांडुनि जातां राजेश्वर ।
तोयपात्रा रुषेश्वर । घेउनि धावे पाठीसी । ३ ।

ह्मणे उभा गा ये पांथीक । श्रमे श्रांतलासी घ्यावे उदका ।
राजा ह्मणें धार्मिका । शेव्य न घडे सर्वथा । ४ ।

अन्नछत्रीचे भोजन । धर्मपोहेचें उदकपान ।
करी तयाचे सुकृतघन । जाउनि होये महापापी । ५ ।

रुषी ह्मणे तनुभांडवल । रक्षीता सुकृतधन जोडेल ।
यालागी बोलति वडिल । शरीर रक्षी तो धर्म । ६ ।

ऐसें बोलोनि धरीला करीं । ह्मणे चला जो मम मंदीरीं ।
स्नान सारुनि भोजन करीं । नावेक शयनि पहुडावे । ७ ।

देवांगणां ऐसीया दासी । सादर तीष्टती सेवेसी ।
ज्याच्या दर्शणें श्रमांसी । बोळवण तात्काळ । ८ ।

सीतळ चंदनें घेइजे उटी । सुमनमाळा घालीजे कंठी ।
परीमळद्रव्य तुह्मांसाठी । ठेंवीलीं ते सेवीजे । ९ ।

वीश्राम पावलियां चींति । सुखें जाइजें आपुल्या पंथी ।
हे परीसोनियां नृपती । बोले उदास मनेनि । १० ।

विश्राम पावलो समस्त । तुमच्या दर्शणें कृत्याकृत्य ।
ऐसें बोलोनि नृपनाथ । सीघ्र चमके पुढारां । ११ ।

तारामती तयापाठिं । चालतां जालि परम कष्टि ।
पोहे देखोणियां दृष्टी । मुरडोनियां चालिलि । १२ ।

पोहे सांडुनि सुंदरी । जातां देखिलि रुषेश्वरी ।
तोयपात्र भरुनि करीं । घेउनि पुढां पातला । १३ ।

ह्मणे माये श्रमलीसी पंथी । उष्णें करपलीं सुकुमार कांति ।
चरणसरोजीं फोड दीसती । अधर शोषले तृशेणें । १४ ।

ऐसें बोलोनियां तोंडे । उदकपात्र वोडवी पुढे ।
यरी नेघोनिनां मुरडे । आपल्या पंथें चालाया । १५

येरींकडें आश्रमाआंत । रुषीने केलें अद्भुत ।
मायामय नृपनाथ । करुनि बैसवी मंचकिं । १६ ।

रुषि ह्मणें वो पतिव्रते । तुझा पति पाचारि तुतें ।
पैल पालवींत होतें । मंचकिं बैसोनिं मंदीरीं । १७ ।

येरी अवलोकि भीतरी । तंव राजा देखे मंचकावरी ।
चरणसेवा सुंदरी । सुकुमारकरें करीताती । १८ ।

येकि लावीति चंदनउटी । सुमनमाळा घालिति कठी ।
येकि उभी ठाकुन नीकटी । मळीयानिळ ढाळीति । १९ ।

ऐसें देखोंणि महासती । ह्मणें काय घडलें गा श्रीपति ।
अंधकारामाजी गंभस्ति । अडखळोंनि कुपिं पडीयेला । २० ।

दशकद्वयशताक्षें शिरीं । वसुधा वाहीलो सुमनापरीं ।
तो भार मानुंनि सांडील जरी । तरी हे वीपरीत घडेल ।२१।

दुष्ट दंडनिं कमळापति । अवतार धरीतां भोगेल क्षीती ।
आस्त न होतां फीरे गंभस्ति । तरी हें वीपरीत घडेल । २२ ।

किं पर्वत शिखरीचे जळ । अधोपंथे धांवे तुंबळ ।
तें परतोंनि पावेल मुळ । तरी हें वीपरीत घडेल । २३ ।

किं वेदमर्यादा ब्राह्मण । लंघोनि करीति अनाचरण ।
कि पतिवृता पतिवचन । न मुनि तरी ऐसें घडे । २४ ।

की परम श्रोतीं महासंकटी । क्षुधे करुनि पीडतां पोटी ।
अवर्णगेंही अन्नताटीं । भोजन करी तरी हें घडे । २५ ।

तैंसा राजा सूर्यवौंशि । धर्मपाळ सत्वराशी ।
क्लेश पावतां पोहेसीं । वीश्रामेल हें न घडेंल । २६ ।

असो मि तो नेघें जीवन । ह्मणोनि पुढारा केलें गमन ।
वीश्वामीत्र ह्मणे धन्ये । कोन सत्व सतींचें । २७ ।

मागे पाहे जंव कौसीक । येतां देखीलें बाळक ।
श्रमें शोषलें वदनांबुक । त्रुशेणें अंतर करपलें । २८ ।

धांवोनि कडीयेसी घेतलें । करतळें मुख कुरवाळीलें ।
सुंदर सकुमार पाउलें । पाहतां फोड देखीले । २९ ।

ह्मणे श्रमलासी चालता पंथी । यया पोहेसी घेइं विश्रांति ।
उदक प्राशुनि पुडती । गमन किजे बाळका । ३० ।

रोंहीदास ह्मणें जी स्वामीयां । आम्ही न सेवों पोहेच्या तोया ।
कलंक लागेल आमुचीया । सुर्यवौंशकुळासी । ३१ ।

ह्मणोनिं घातले दंडवता । दूर अंतरलीं मातापीता ।
दया करुनिं कृपावंता । आज्ञा दीधली पाहीजे । ३२ ।

ऋषीप्रती बोलोनिं ऐसें । गमन केलें रोहीदासें ।
वीश्वामीत्र जीवे मानसे । वोवाळीत तयातें । ३३ ।

ऐसीया सत्वे सवित्यापुढें । आमुचें तप तें खद्योत बापुडें ।
वृथा सुकृत हारवीलें मुढें । प्रतीज्ञां करुणि । ३४ ।

असाध्य जाणोनिं भुपाळसत्व । कौशिक कोपला अत्याद्भुत ।
भुतश्रुष्टी करावया हुत । जाणे शंकर कोपला । ३५ ।

येरीकडे वसुधापति । पोहे लंघुनिं चालतां पंथी ।
तयापठीं तारामती । कवळुनि चाले कुमराते । ३६ ।

मंहाघोर वनांतरीं । तींघें चालतां कैसी परी ।
प्राप्त जाली ते चतुरीं । श्रवण केले पाहीजे । ३७ ।

वीश्वामीत्रें जाउनि पुढें । वनवा लाउन चहुंकडे ।
जळों लागली उभीं झाडें । श्वापदा पक्षी अकांत । ३८ ।

धुम्रें दाटले अंबर । भडके उठती भयंकर ।
तयामाजी राजेश्वर । पुत्र वनीतेसी सांपडला । ३९ ।

ज्वाळा लागती शरीरा । तेणें पोळती चरचरा ।
धुम्र न दीसे पुढारा । मार्ग पाहतां तयासी । ४० ।

वीश्वामीत्रें काय केलें । राया रोहीदासा चुकविलें ।
तारामतीसी ठेवीलें । तया वनवियामाजी । ४१ ।

मागें पाहतां तारामति । पुत्र न देखतां पडे क्षीती ।
पुढें पाहे तों भुपती । तोही दृष्टी दीसेना । ४२ ।

ह्मणोनि लोळे भुतळवटीं । आक्रंदोनि हृदय पीटि ।
ह्मणें कटकटा अदृष्टीं । काय लीहीलें कळेना । ४३ ।

वनवीयामाजी जळोनि मेलें । ऐसें नीश्चयें भाविले ।
ल्लहाट पिटुनी करतळें । शखस्फुरण मांडीले । ४४ ।

ह्मणे बाळका रोहीदासा । भेटी देइ बा पाडसा ।
तुज वेगळ्या दाही दीशा । वोस पडल्या मजलागी । ४५ ।

आगा सुर्यवंशीचुडारत्ना । माझीया प्राणपतीनीधाना ।
मज वेगळें सायुज्यभावना । भोगावया गेलेंती । ४६ ।

मज सांडुनीया भावपुरी । पेणें केले दुरीच्या दूरी ।
कवण अपराध माझे सीरीं । भेटी देउनि सांगीजे । ४७ ।

आतां वैधव्यदोशाचा मळ । स्पर्शों नेंदी अळुमाळ ।
युगासमान वाटे पळ । ह्मणोनि अनळ प्रार्थीला । ४८ ।

जेया अनले दाहीला पति । तयासी वोपुं तनु अहुति ।
मनची सौभाग्यद्रव्य सती । वोपिति जाली हुताशा । ४९ ।

ब्रह्मरूप भवाला वन्ही । धर्मशिळ उभी राहुनि ।
उडीं टाकींतां ततःक्षणि । प्रगट जाला कौशिक । ५० ।

वनवा वीझउनीं आंगे । सतीपुढें पातला वेगें ।
तुं कवणाची कवण सांगे । किमर्थ आलीसी काननि । ५१ ।

येरी ह्मणें आह्मी पांथीक । माझा पति आणि बाळ ।
या वनामाजी देख । जळोनी मेले न कळेची । ५२ ।

तुम्ही देखीले असतील जरी । कृपेनें सांगीजे उत्तरीं ।
रुषी ह्मणे वनांतरीं । जळोनि पडलीं दोनि शवें । ५३ ।

यक पुरुष दुजा कुमर । जळोनि पडले लोधशरीर ।
ऐसें परसोनीं अंतर । करपोनि गेलें सतीचें ।५४।

ऋषी ह्मणें माझीयासंवे । येसील तरी दावीन शवे ।
ऐसें बोलोनि लाघवे । प्रेतें नीर्मिली वनांत ।५५।

तारामतिसी नेउनि तेथें । दाविता जाला दग्ध प्रेतें ।
त्वचा जळोनि पडली व्यस्तें । हस्तपाद पसरूनीं ।५६।

वळखोनि पतिपुत्राचीं मडि । उभयहस्तें हृदय ताडी ।
शंखस्फुरन करी तोंडी । भुमी लोळे गडबडा ।५७।

वळखोनि पतिपुत्राचे मडें । ह्मणें वल्लभा पाहें मजकडे ।
रुसनें सांडुनीं बोल तोंडे । गुज गोष्टी मजसवे ।५८।

मज वेगळें उदकपाण । तुह्मांसी लागी वीशासमान ।
जीवीचें गुह्य गुजवचन । अखंड सांगा मजप्रति ।५९।

तें तुम्ही आजी कवण्या गुणें । क्रोध धरीला अंतःकरनें ।
मौन्य सांडुनियां वचनें । कां न बोला मजसवे ।६०।

रोहींदासतनु कवळोनि पोटीं । लल्हाट मेळउन लल्हाटी ।
शोक करीता श्वापदें दृष्टी । देखोलि गहीवरें दाटली ।६१।

कवण मागेल मज भोजन । कवणा पाजूं स्तनपान ।
कडीये घेउनिया वचन । बोलों आंता कवणांसी ।६२।

ऐसा विलाप करीतां सती । अस्तमानां गेला गंभस्ति ।
रुषी ह्मणे वो आतां कीति । शोक करीसी शवाचा ।६३।

तें प्रेत कवळुनीं काय फळ । निघोनि गेला हंस अनिळ ।
व्रथा पिटितां कपाळ । सीनच वाटे पाहतां ।६४।

आह्मी परीसीली यक मात । तुम्हांसी रुण असे किंचीत ।
तारामति ह्मणें असे जी सत्य । देणें असे रुषीचें ।६५।

येरु ह्मणे पतीचे रुण फेडी ते पतीवृता धन्य ।
जेने अक्षइ स्वर्गभुवन । भोगावया जोडीलें ।६६।

आतां प्राप्त जालीया निशी । श्वापदें भक्षीतील तीघांसी ।
सेवटी भोगणें नरकासी । घडे दोषें रुणांच्या । ६७ ।

आमुचे गृहीं क्रमोनि रजनी । प्रभातें शवा देइं अग्नि ।
भलतियापरी पति अरुणि । करुनि धाडि स्वर्गासी । ६८ ।

तारामति ह्मणें जी दयाळा । केंवि सांडु पति आनि बाळा ।
धनिवरी पाहेंन मि डोळा । मुखकमळा दोघांच्या । ६९ ।

ऐसें ऐकोनिं तयेचें वचन । अदृष्य जाला तपोधन ।
वीश्वामीत्रे विदान । कायें केलें वनांत ७० ।

घोर दाटला इंदुवल्लभा । माजी उडंगनिं दाटती शोभा ।
पीशाच श्वापदाची शोभा । प्रेतें देखोंणि पातलीं । ७१ ।

तयामाजी वीश्वामीत्रें । काय केलें परीसा श्रोतें ।
महाभयानकें पंचबगत्रें । झेप घातलीं अघचींतीं । ७२ ।

सतींपुढोनिं उभय प्रेतें । वोढुन नेलीं परौते ।
उदर फाडुनि आंते । काढुनी टाकी वीभत्स । ७३ ।

दृष्टी लाउनीं सतीकडे । मास भक्षीतसे तोंडे ।
रागें गुर्गुरीत पुढें । भय दाखवी क्षणाक्षणां । ७४ ।

तारामती ह्मणें गा श्रीपती । धांव धांव ये आकांतीं ।
कैसी प्राप्त जाली गति । जे वैरीयातें न घडावी । ७५ ।

अनळें दाहिलें उभय रत्ना । सेवटीं प्राप्त व्याघ्रवदना ।
आतां माझीयाही प्राणां । न सोडीच हा व्याघ्र । ७६ ।

जन्मल्या देहासीं मरण । कदा न चुके हें ब्रह्मवचन ।
परी त्या ब्राह्मणाचे रुण । फीटलें नाहीं आम्हासी । ७७ ।

असो पुढती जन्म होता । ब्राह्मणरुण फेडु सर्वथा ।
मि पतिसवे पतिव्रता । गमन करीन अविलंबें । ७८ ।

ह्मणोनि दोन्ही नयन झांकीले । पंचप्राणाते आकर्षिलें ।
प्राण घावा तव सुचलें । ज्ञानदृष्टी कौशीका । ७९ ।

तारामति सांडितां प्राण । आमचे जाइल प्रतिज्ञावचन ।
ह्मणोनि आनिले दोघंजन । पतीपुत्र तयेपुढां । ८० ।

कैंचा व्याघ्र कैंचा वनवा । जैसा मृगांबुजाचा हेलावा ।
कि दुष्ट स्वप्न भोगवि जीवा । वोंडव्ररीं सारीखें । ८१ ।

राजा ह्मणें अंगने तुह्मांलागी हींडलो वनें ।
चालतां श्रमलीसी किं त्रुशेंनें । पीडता येथें बैसलीसी । ८२ ।

तारामतिनें लोचन । उघडीतां देखीलें दोघे जन ।
धांवोनि दीधलें आळिंगण । शोक करी अक्रोशें । ८३ ।

राजा ह्मणें सत्वसरीते । शोक कां करीसी सांग माते ।
येरी ह्मणे जी तुम्हाते । पुनर्जन्म देखिला । ८४ ।

तुम्ही जळोनि मेलेंति वनवां । मी कवळोंनि उभय शवां ।
परम दुःख जालें जीवा । ते ये वाचेनें न बोलवे । ८५ ।

अकस्मात व्याघ्रें झेपु । घालुनि नेल्या दोन्ही वपु ।
भयें माते भरला कंपु । मृत्युसमय पातला । ८६ ।

यालागी झांकीले नयन । हृदइं स्मरलें नारायन ।
परीसोंनी तुमचे वचन । नेत्र उघडुनी पाहीलें । ८७ ।

राजा ह्मणें वैकुंठपाळा । ऐसीच विघ्नें भोगुनी सकळ ।
मोक्षपदी स्थापील अढळ । सत्व देखोंणि आमचे । ८८ ।

असो तीघें मीळोंनी पुडती । परम कष्टें चालतां पंथी ।
महाभयानकें लंघीती । नदनदीया भ्यासुर । ८९ ।

यापरी चालता मध्यरात्री । पुढें लागली वोस नगरीं ।
जे कां पीशाच खेंचरी । आणि श्वापदी वसविली । ९० ।

वेताळ झोटिंग जखिनि लांवा । मेसको मायेराणि वेंतार्णवा ।
धुमस घालितातिं मानवा । अशोच्यातें छळताति । ९१ ।

सींह शार्धुळ मैसे शुकर । व्याघ्र जंबुक तडस तगर ।
उलूक भालुका भयंकर । शद्ब करीति टीवटोंग्या । ९२

ऐसी लागली वोस नगरी । लंघोनि जाता पक्षीणि वल्लरी ।
मुख दाविता दीगांतीरीं । पळोनि गेली तमशोभा । ९३ ।

यापरी लोटला येक मास । राया न लभे सुखाचा लेश ।
दु:खवेगळा नीमिष । जाउ नेंदी कौशीक । ९४ ।

भुपाळ शुद्ध सत्वलक्षणा । कौषीक कोप न घणि घणा ।
मशक नाशी कीं प्रभंजना । मेरु जैसा न हाले । ९५ ।

किं लावन्यें रुप वयसा गुणिं । नग्न दाउनि प्रार्थी कामिनि ।
परी शुकहृदइंचा कामफनि । सहसा नुचलि मस्तक । ९६ ।

कीं अस्तीकवचनें फणितक्षका । स्थापील्या जेंवी न पडे याज्ञीका ।
तेंवी तपे त्या नृपनायका । दधीज्यें केले वसीष्टें । ९७ ।

असो कुमर कांता नृपति । परमकष्टें चालता पथी ।
मोक्षदायक पुरी अवचीतीं । वाराणसी देखिली । ९८ ।

अपर नीळकंठाचे पीठ । माजी घरटीकार सुभट ।
काळभैरव वाजवी साट । महादोशा मस्तकीं । ९९ ।

जीये नगरीं अमरगण । मोक्ष इछीति पावोनिं मरण ।
मां इतरांचा पाड कोण । सुकृते लाहीजे निधनांत । १०० ।

जे कां नवखंडावेगळि । पंचकोसी वसुधातळीं ।
जेथें विराजे चंद्रमौळी । मोक्ष द्यावया भक्तांसीं । १०१ ।

लक्ष चौऱ्यांसी जन्म भ्रमना । चक्रीं घातले जीव नाना ।
जन्म न चुके चतुरानना । पंचवदनांवाचुनी । १०२ ।

ते पुरी देखोंणि भुपालें । साष्टांग लोटांगण घातले ।
पुढें चालता देखीले । तिर भागीरथीचे । १०३ ।

वैकुंठपाळाचीये नखी । झगटोनि वाहे त्रैलोकिं ।
तेची दुर्गापति मस्तकिं । कुसुमन्यायें मिरवली । १०४ ।

श्रीधरेनखेंदुखदुग्धाधारा । वोपिल्या भगीरथभक्तचकोरा ।
तया प्रसादें चराचरा । प्राप्त जाली सदैवे । १०५ ।

तया सुरसेव्य गंगाजळी । स्नान सारुनि चंद्रमौळी ।
पुजा बांधोनि शुद्ध कमळीं । बद्धांजुळी स्तवीतसे । १०६ ।

जय–जय कैलासगीरीनायका । कर्पुरगौरा कामांतका ।
त्रिगुण त्रिपुरभेदका । कोत्रत्रया महेशा । १०७ ।

जयजय भक्तकामकल्पदृमा । रमारमण विश्रामधामा ।
वैराग्येमुगुटीच्या ललामा । वृशभध्वजा महेशा । १०८ ।

स्तवन पुजन विश्वनाथा । विनय चरणि ठेविला माथा ।
देउळा बाहेरी नृपनाथा । निघतां कैसे वर्तलें । १०९ ।

कौसीकें प्रगटोनि देउळीं । नृपा धरुनि वोढीलें अंचळी ।
तुते शोधीतां महीमंडळीं । आजी येथें देखीले । ११० ।

जरीं द्यावया नवते धन । तरी कां केले वागबंधन ।
याचका श्रमउनि दान । केलीयाचें कोण फळ । १११ ।

मि तव न सोडी यक कवडी । तुते घालीन बांदवडी ।
अरे नेणसी तूं माझी प्रौढी । करीन वेडी सुरासुर । ११२ ।

राजा ह्मणे जी दयासागरा । आवरा क्रोधवाजीवाग्दोरा ।
आजी अस्त नव्हता भाश्करां । देइन शरिरा विकुनि । ११३ ।

अस्ताचळासी वासरमन । रुण फेडीन न होता पन ।
न फीटे तरी स्वामिणें । शापुन भस्म करावे । ११४ ।

ऐसीया परी तपोतेजा । शांतउनि बैसर्गी वोजा ।
करीं मुद्रीका होती सहजा । त्रिशखरायाबोटिंचि । ११५ ।

ते देउनि घेतले त्रुण । आपणांसहीत जया नंदन ।
माथां बांधोनि वदन । खालाउनि चालला । ११६ ।

पुढील कथेची सूचना । पहीले विकीलें नीजांगणा ।
तयापाठी नृपनंदना । सेवटीं आपणां विकिलें । ११७ ।

पुढे वतली कैसी कथा । ते तु ऐके धरीत्रीनाथा ।
तयासारीखी क्लेशावस्ता। कोणे नाहीं भोगीली । ११८ ।

इतिश्री भारत वनपर्वणि । कथा नर्मदा रसवाहीनि ।
वोळियारूपे पवित्र पुलनी । बाणलीगे वीर्चीत्रें ।११९।

तरीं श्रवणसुखाचे अर्ती । तपश्चर्या करितां श्रोतीं ।
भोगमुर्ती हे अंती । स्वधर्मपत्नीसारोखी ।१२०।

इतिश्री भारत आरण्येपर्वणि हरीश्चंद्रोपाख्यान

॥ त्रितियोध्याय । ३ । छ ॥ छ ॥

## अर्थ : अध्याय तिसरा

१. विरक्त मनुष्याला ज्याप्रमाणे सुंदर स्त्री किंवा संपत्ती पाहूनही तिच्याबद्दल अभिलाषा वाटत नाही, आणि ज्या प्रमाणे वैराग्य प्राप्त झालेला मनुष्य संसारात विटतो

२. किंवा चाफ्याचा सुगंध भ्रमर ज्याप्रमाणे त्याग करतो त्याप्रमाणे धार्मिक व्यक्ती महादेवाच्या पिंडीवरील निर्मालय प्रसाद म्हणून स्विकारत नाही.

३. त्याप्रमाणे पानपोई पासून दूर जाताच विश्वामित्र पाणीपात्र घेवून राजाच्या मागे धावला

४. विश्वामित्र म्हणला 'हे पंथिका, तू श्रमाने थकलेला आहेस हे पाणी पी.' राजा म्हणाला 'हे पाणी स्विकारण्यासारखे नाही.'

५. जो अन्नछत्रात भोजन घेतो व पानपोईचे पाणी पितो त्याचे पुण्य जाऊन तो महापापी होतो

६. ऋषी म्हणाले, शरीर हे भांडवल आहे. त्याचे रक्षण झाल्यावर पुण्य जोडता येईल श्रेष्ट लोकांनी शरीर रक्षण म्हणजे धर्म असे सांगितले आहे.

७. विश्वामित्राने राजाचा हात धरला व माझ्या मंदिरात चल. स्नान करून भोजन कर व विश्रांती घे.

८. अप्सरे प्रमाणे सुंदर दासी सेवेसाठी तत्पर आहेत. त्यांना पहाताच श्रम दूर होईल.

९. शितल चंदनाची उटी लाऊन, फुलांच्या माळा गळयात घाल सुगंधीत द्रव्य तुझ्यासाठी ठेवले आहेत.

१०. विश्रांती घेतल्यानंतर तू सुखाने आपल्या मार्गी जा हे ऐकून राजा उदास मनाने म्हणाला.

११. तुमच्या दर्शनाने मी धन्य झालो, मला विश्रांती मिळाली. असे म्हणून राजा वेगाने पुढे निघाला.

१२. त्यानंतर चालून चालून थकलेल्या तारामतीने पानपोई पाहुलाच आपली दृष्टी वळविली, व ती चालू लागली

१३. विश्वामित्र तारामतीला पानपोई दुर्लक्षून जाताना पश्चाताप हातात पाणी-पात्र घेऊन तिच्या समोर आला.

१४. विश्वामित्र म्हणाला हे माते, तू प्रवासाने थकलेली दिसतेस. उन्हानें तुझी सुकुमारकांती करपली आहे पायाला फोड आलेले दिसतात. ओठही तहानेनें कोरडे पडलेले आहेत.

१५. असे बोलून पाण्याचे भांडे तिच्या समोर केले. तारामतीने ते न घेता ती पुढे चालू लागली

१६. आश्रमात विश्वामित्राने मायाजालाद्वारे हरिश्चंद्र राजा तयार करून त्याला मंचकावर बसविले

१७. मुनी म्हणाले, हे पतीव्रते तुझा पती पलिकडे मंचकावर बसून तुला बोलावीत आहे.

१८. तारामतीने मंदिरात डोकावून पाहिले, तो राजा मचकावर बसलेला व त्याचे पाय सुंदर स्त्रिया आपल्या कोमल हाताने पाय दाबत होत्या.

१९. एक चंदनाची उटी लावून, फुलांच्या माळा गळयात घालत होती. दुसरी जवळ उभी राहून वारा घालत होती.

२० असे पाहून महासती तारामती म्हणाली, हे देवा, हे काय झाले. अंधःकारात सूर्य अडखळून विहिरीत कसा पडला.

२१. दोन हजार नेत्र असलेल्या शेषाने पृथ्वीचा भार फुलाप्रमाणे डोक्यावर घेतला. हा भार समजून पृथ्वीला डोक्यावरून खाली जेंव्हा शेष टाकील तेव्हाच असे घडेल.

२२. दुष्टांना शिक्षा करण्यासाठी पृथ्वीवर अवतार घेताना विष्णू जर थकला; सूर्य अस्त न होता फिरत राहिला, तरच असे विपरीत घडेल

२३. किंवा पर्वत शिखरावरून पाणी तळाकडे अतिशय वेगाने धावते. असे न होता हें पाणी जर पायथ्याकडून शिखराकडे परत वाहू लागले तर असे विपरीत घडेल.

२४. किंवा जेव्हा ब्राह्मण वेदाची मर्यादा सोडून अनाचार करतील किंवा पतीव्रता पतीचे ऐकणार नाही, तेव्हा असे घडेल.

२५. श्रेष्ठ व्यक्ती मोठ्या सकटात भुकेला असता अत्यंजाच्या घरी अन्न जेव्हा सेवन करील तेव्हा असे घडेल.

२६. ह्याप्रमाणे सूर्यवंशीचा राजा हरिश्चंद्र हा धर्माचे पालन करणारा, सत्त्वशील आहे तो श्रमल्यामुळें पानपोईत थांबेल हे घडणार नाही.

२७. असो मी तरी पाणी पिणार नाही. असे म्हणून तारामती पुढे निघाली. विश्वामित्र म्हणाला ही सती धन्य आहे.

२८. विश्वामित्राने मागे पाहिले तेव्हा श्रमाने थकलेला, तहानेने व्याकुळ झालेला रोहिदास येतांना त्यांना दिसला.

२९. विश्वामित्राने धावत जाऊन त्यास कडेवर उचलून घेतले. त्याचे मुख कुरवाळले. सुंदर कोमल पायाला फोड आलेले दिसले.

३०. 'तू प्रवासाने थकलेला आहेस. पानपोईत पाणी पिऊन विश्रांती घे, मग तू जा.' असे विश्वामित्र म्हणाला.

३१. यावर, आम्ही पानपोईचे पाणी पीत नसतो. पाणी पिलो तर आमच्या सूर्यवंशाला कलंक लागेल, असे रोहिदास म्हणाला.

३२. माझे आई-वडील पुढें गेलेले आहेत हे कृपावता दया करून मला जाण्याची आज्ञा द्या असे रोहिदास विश्वामित्राला म्हणाला.

३३. विश्वामित्राने मनातल्या मनात त्याचे कौतुक केले.

३४. अशा सत्त्वसूर्यापुढे आमचें तप काजव्याप्रमाणे व्यर्थ आहे. मी मुर्ख, उगीच प्रतिज्ञा करून साठविलेले पुण्य हरविले.

३५. राजाचे सत्त्वहरण करणे असाध्य आहे असे पाहून विश्वामित्र खूप रागावला जणू काही सृष्टीला जाळून टाकण्यासाठी शंकरानें आपला तिसरा डोळा उघडला.

३६. इकडे पृथ्वीपती हरिश्चंद्र पानपोई ओलांडून पुढे चालत असताना त्याच्या मागे तारामती रोहिदासाला धरून चालली.

३७. घनदाट अरण्यातून तिघे जात असताना, त्यावर कशी परिस्थिती आली ती आता ऐकली पाहिजे.

३८. विश्वामित्राने पुढे जाऊन अरण्यास आग लावली. त्यामुळे सर्व झाडे जळू लागली. प्राणी-पक्षी आकांत करू लागले.

३९. आकाश धुराने दाटून गेले. भयंकर ज्वाला भडकू लागल्या. अशा वणव्यात ते तिघे सापडले.

४०. आगीच्या ज्वाला त्यांना भाजून काढू लागल्या. धुरामुळे पुढची वाट त्यांना दिसत नव्हती.

४१. विश्वामित्राने रोहिदास व राजाची चुकामूक केली. वणव्यात तारामती एकटीच सापडली.

४२. तारामतीला मागे रोहिदास न दिसल्याने ती जमिनीवर कोसळली. पुढे तिला राजाही दिसेना.

४३. म्हणून ती लोळू लागली, रडून हृदय पिटवू लागली. पुढे नशिबात काय लिहिले आहे ते कळेना. अशी म्हणाली.

४४. वणव्यात पती व मुलगा मरण पावला असे तिला वाटून तिने कपाळ हाताने बडवण्यास व आकांत करण्यास सुरवात केली.

४५. हे बालका, रोहिदासा मला भेट दे. तुझ्याशिवाय माझ्यासाठी दाही दिशा ओस पडल्या आहेत.

४६. हे सूर्यवंशाचा मुकुटमणी शोभणाऱ्या माझ्या प्राणप्रिया, मला टाकून तू स्वर्गात सायुज्यमुक्ती मिळविण्यास गेलास काय ?

४७. मला संसारनगरात सोडून तुम्ही दूर मुक्काम केलात. असा मी कोणता अपराध केला तो भेटून सांगा

४८. आता हे वैधव्य जास्त वेळ राहू देणार नाही, एकक्षण एका युगासारखा तारामतीला वाटू लागला. तिने अग्निला प्रार्थना केली.

४९. ज्या अग्नीने पतीला जाळले त्याच अग्नीला मी माझे शरीर अर्पण करणार असा विचार करून तिने आपले मन अग्नीला अर्पण केले.

५०. अग्नीला ब्रह्मरूप समजून ती धैर्य शिळेवर उभी राहून अग्नीत उडी टाकू लागली तोच विश्वामित्र प्रकट झाला.

५१. आग विझवन तो समोर आला व त्याने विचारले तू कोण आहेस ? कशा–साठी वनात आली आहेस ?

५२. ती म्हणाली, आम्ही प्रवासी असून या वनव्यात माझा पती व मुलगा मेले की काय समजत नाही.

५३. तुम्ही जर पाहिले असतील तर कृपा करून मला सांगा. यावर ऋषी म्हणाले वनात दोन प्रेते जळून पडलेली आहेत.

५४. त्यात एक मुलगा व एक पुरुष आहे. असें ऐकताच तिच्या मनातील सर्व आशा जळन गेल्या.

५५. माझ्याबरोर तू वनात आलीस तर मी तुला प्रेते दाखवीन असे दिला सांगून ऋषीनें दोन प्रेते तयार केली.

५६. तारामतीला त्यानें तिथे नेऊन अर्धवट जळालेली व अस्ताव्यस्त पडलेली प्रेते दाखविली.

५७. पती-पुत्राचे प्रेत ओळखून ती छाती बडऊन आकांत करु लागली.

५८. 'प्रियकरा तुम्ही माझ्यावर का रूसलात, नेंहमीप्रमाणे माझ्याशी हित–गुज करा.'

५९. माझ्याशिवाय तुम्हाला पाणीदेखील नेहमी विषाप्रमाणे वाटत असे. तुम्ही तुमच्या मनाचे गुज नेहमी मला सांगत होता.

६०. असे ते तुम्ही कोणत्या कारणाने माझ्यावर रागावलात, मौन सोडून तुम्ही माझ्याशी का बोलत नाही.

६१. रोहिदासाला पोटाशी कवटाळून त्याच्या मस्तकाला मस्तक लावून ती शोक करीत असताना श्वापदांना देखील गहिवर आला.

६२. हे बाळा, मला आता जेऊ घाल असे कोण म्हणेल. कोणाला मी स्तनपान करू, कडेवर कोणाला घेऊन मी गोडगोड गोष्टी करू.

६३. ती असा शोक करीत असता सूर्य अस्तास गेला. आता तू किती शोक करणार' असे विश्वामित्र तिला म्हणालें.

६४. आता प्रेतांना कवटाळून काय फायदा आत्मरुपी प्राणवायु आता निघून गेला आहे. उगीच शोक करण्याने तुला त्रास होईल.

६५. 'आम्ही असे ऐकले की, तुम्हाला थोडे कर्ज आहे.' असे मुनीनी विचारता तारामती म्हणाली, 'खरेच आम्हाला ऋषीचे देणे आहे.'

६६. यावर मुनी म्हणाले, 'पतीचे कर्ज फेडणारी पतीव्रता धन्य असते, त्यामुळे कायमचा स्वर्गवास मिळतो.

६७. रात्री श्वापदे तिघांना खाऊन टाकतील, त्यामुळे ऋण न फेडता आल्यानें, नरकवास भोगावाच लागेल.

६८. त्यापेक्षा तू आमच्या घरी रात्र काढ. सूर्योदय होताच प्रेतांना अग्नी दे व कोणत्याही प्रकारे पतीला कर्जमुक्त करून स्वर्गात पाठ.

६९. तारामती म्हणाली हे दयावंत पतीला व बाळाला कसे सोडू. डोळ्याचे समाधान होईपर्यंत मी दोघे मुख पाहीन.

७०. असे तारामतीचे बोलणे ऐकताच विश्वामित्र अदृष्य झाला. वनात विश्वामित्राने काय कपट केले ऐका.

७१. घनदाट अंधार पडला. आकाशात नक्षत्राची शोभा दाटली. इकडे ही प्रेते पाहून पिशाच्च श्वापदांची गर्दी झाली.

७२. अशातच विश्वामित्राने महाभयानक वाघ तयार केले. त्यांनी प्रेतांवर झडप घातली.

७३. त्यांनी तारामती समोरून दोन्ही प्रेते ओढून नेंऊन त्याची पोटे फाडून आतडी बाहेर काढली.

७४. तारामतीकडे पाहून ती मांस भक्षण करू लागली, रागाने गुर्गुरू लागली. तिला भीती दाखवू लागली.

७५. तारामती म्हणाली, हे विष्णुदेवा लवकर धाव वैऱ्यावर सुद्धा असे संकट येवू नयें ते माझ्यावर आले.

७६. अग्नीने दोन रत्नांना जाळले आहे. ती वाघाच्या तोंडी गेली आहेत. आता माझा प्राणही हा वाघ सोडणार नाही.

७७. जन्मणाऱ्या देहाला मरण कधीही चुकत नाही. ब्रह्मवचनच आहे परंतु 'त्या' ब्राह्मणाचे ऋण आम्हाला फेडता आले नाही.

७८. असो. मी पतीबरोबर गमन करतें. पुढील जन्मी 'त्या' ब्राह्मणाचे ऋण फेडू.

७९. असे म्हणून तारामतीने पचप्राण गोळा केले व डोळे बंद करून प्राण देण्यास ती सिद्ध झाली. तोच ज्ञानदृष्टी असलेल्या विश्वामित्राला वाटले –

८०. तारामतीने प्राण दिला तर आपण केलेली प्रतिज्ञा व्यर्थ जाईल. म्हणून पती–पुत्राला तिच्यासमोर आणले.

७१. कसला वनवा, कसला वाघ. जणू तो मृगजळाचा भासच होता किंवा स्वप्नात ज्याप्रमाणे दुष्ट जादूचा खेळ होतो नसे.

८२. राजा म्हणाला, हे अंगने, तू चालून थकलीस, की तहानेने व्याकुळ झालीस म्हणून येथे बसलीस तुला मी वनात किती शोधले.

८३. तारामतीने डोळे उघडताच तिला समोर पती व मुलगा दिसला. त्यांना तिने अलिंगन दिले व ती शोक करू लागली.

८४. राजा म्हणाला, हे सत्त्वसरिते, तू शोक का करतेस ते सांग. तारामती म्हणाली, तुमचा जणू काय पुनर्जन्मच झाला.

८५. तुम्ही तर वनात जळून मेला होता. तुमच्या प्रेताला कवटाळून मी किती दुःख केले. ते आता सांगता येत नाही.

८६. अकस्मात तुम्हा दोघावर वाघानें झडप घालून नेले, तेव्हा भीतीने माझा थरकाप झाला. माझाही काळ जवळ आल्याचे मला वाटले.

८७. म्हणून मी डोळे झाकले. मनात नारायणाचे स्मरण केले. तोच तुमचे शब्द ऐकले.

८८. राजा म्हणाला, वैकुंठाचे पालन करणारा; अशीच विघ्ने भोगावयास लावून आपले सत्त्व पाहून शेवटी आपणास मोक्षापदी बसवील.

८९. असे तिघेजन रस्त्याने चालतांना मोठमोठाली नदीनाले ओलांडताना त्यांना अतिशय कष्ट होत होते.

९०. चालत असतांना मध्यरात्री त्यांना ओसाड नगरी लागली, तीत पिशाच्य यक्षीणो आणि हिंस्र प्राणी राहात होते.

९१. वेताळ, झोटिंग, जखिनी, लावा, मेसको, मायेराणी इत्यादी पापींना मास देतात व धुडकस घालता.

९२. सिंह, म्हैस, डुक्कर, वाघ, अस्वल, तडस, तगर, घुबड व टिटव्या भयंकर ओरडू लागतात.

९३. अशी ओसाड नगरी ओलांडुन जाताच, आकाशात सूर्य उगवताच अंधाराची शोभा नष्ट झाली.

९४. अशाप्रकारे एक महिना गेला. या महिन्यात विश्वामित्राने राजाला थोडे देखील सुख लाभू दिले नाही.

९५. चिलटाकडून ज्याप्रमाणे वादळ थोपविले जात नाही किंवा मेरुपर्वत हलविला जात नाही. त्याप्रमाणे शुद्ध व सुलक्षणी राजा विश्वामित्राच्या रागाला जुमानत नव्हता.

९६. लावण्यवती, गुणवती व तरूण स्त्रीने आपल्या सर्व सौंदर्याने शुकमुनींना मोहीत करण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांची कामेच्छा जागृत होत नाही.

९७. किंवा जनमेयाने सर्पसत्र यज्ञ सुरू केला, तेव्हा तक्षकाने इंद्राचा आश्रय घेतला. तेव्हा वसिष्ठ ऋषीने 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' म्हणून दोघांनाही आहुतीसाठी आवाहन केले. तेव्हा अस्तिकाने त्यास वाचविले.

९८. असो याप्रमाणे मुलगा, पत्नी व राजा अतिशय त्रासाने प्रवास करताना मोक्षप्राप्त करून देणारी काशी नगरी त्यांना दिसली.

९९. काशी नगरी हे शिवाचे स्थान असून तेथे रक्षणवीर काळभैरव पाप्याच्या मस्तकावर काठी मारतो.

१००. देवसुद्धा ज्या नगरीत मरण येऊ इच्छितात, मग इतराची काय कथा. येथे मृत्यू येण्यासाठी पुण्य संचय पाहिजे.

१०१. जी नवखंडापासून वेगळी आहे. जिची व्याप्ती पाच कोस आहे. जिथे शंकर भक्ताना मोक्ष देण्यासाठी थांबला आहे.

१०२ सर्व जीवांना परमेश्वराने चौऱ्यांशीलक्ष योनीतूव भ्रमण करण्याचे चक्र लावून दिले आहे. एका शंकरावाचून ब्रह्मदेवाला सुद्धा हे चक्र (जन्म मृत्यू) चुकले नाही.

१०३. अशी काशी नगरी पाहताच राजाने साष्टांग लोटांगण घातले. पुढे गेल्यावर भगीरथी नदीचा तीर राजाला दिसला.

१०४. विष्णुच्या पायापासून तिन्ही लोकात जी वाहते. ती गंगा, दुर्गापती शंकराच्या मस्तकावर फुलाप्रमाणे शोभून दिसते.

१०५. विष्णुच्या पावलाच्या नखचंद्रापासून निघणाऱ्या अमृतधारा (गंगा) त्यानें भक्त भगीरथ चकोराला दिल्या. त्याच्या कृपेने गंगा चराचर सृष्टीला मिळाली.

१०६. देवांनीच प्राशन करण्यास योग्य अशा त्या गंगा जलामध्ये स्नान करून व शुभ्र कमळांनी शकराची पूजा करून हात जोडत असतात.

१०७. कैलास पर्वताचा नायक असलेल्या, कर्पुरगौर रंग असलेल्या, मदनाचा अन्त करणाऱ्या, त्रिनेत्र असलेल्या महेशा तुझा जयजयकार असो.

७१. कसला वनवा, कसला वाघ. जणू तो मृगजळाचा भासच होता किंवा स्वप्नात ज्याप्रमाणे दुष्ट जादूचा खेळ होतो नसे.

८२. राजा म्हणाला, हे अंगने, तू चालून थकलीस, की तहानेने व्याकुळ झालीस म्हणून येथे बसलीस तुला मी वनात किती शोधले.

८३. तारामतीने डोळे उघडताच तिला समोर पती व मुलगा दिसला. त्यांना तिने अलिंगन दिले व ती शोक करू लागली.

८४. राजा म्हणाला, हे सत्त्वसरिते, तू शोक का करतेस ते सांग. तारामती म्हणाली, तुमचा जणू काय पुनर्जन्मच झाला.

८५. तुम्ही तर वनात जळून मेला होता. तुमच्या प्रेताला कवटाळून मी किती दु:ख केले. ते आता सांगता येत नाही.

८६. अकस्मात तुम्हा दोघावर वाघाने झडप घालून नेले, तेव्हा भीतीने माझा थरकाप झाला. माझाही काळ जवळ आल्याचे मला वाटले.

८७. म्हणून मी डोळे झाकले. मनात नारायणाचे स्मरण केले. तोच तुमचे शब्द ऐकले.

८८. राजा म्हणाला, वैकुंठाचे पालन करणारा; अशीच विघ्ने भोगावयास लावून आपले सत्त्व पाहून शेवटी आपणास मोक्षापदी बसवील.

८९. असे तिघेजन रस्त्याने चालतांना मोठमोठाली नदीनाले ओलांडताना त्यांना अतिशय कष्ट होत होते.

९०. चालत असतांना मध्यरात्री त्यांना ओसाड नगरी लागली, तीत पिशाच्च यक्षीणी आणि हिंस्र प्राणी राहात होते.

९१. वेताळ, झोटिंग, जखिनी, लावा, मेसको, मायेराणी इत्यादी पापींना मास देतात व धुडकस घालता.

९२. सिंह, म्हैस, डुक्कर, वाघ, अस्वल, तडस, तगर, घुबड व टिटव्या भयंकर ओरडू लागतात.

९३. अशी ओसाड नगरी ओलांडुन जाताच, आकाशात सूर्य उगवताच अंधाराची शोभा नष्ट झाली.

९४. अशाप्रकारे एक महिना गेला. या महिन्यात विश्वामित्राने राजाला थोडे देखील सुख लाभू दिले नाही.

९५. चिलटाकडून ज्याप्रमाणे वादळ थोपविले जात नाही किंवा मेरुपर्वत हलविला जात नाही. त्याप्रमाणे शुद्ध व सुलक्षणी राजा विश्वामित्राच्या रागाला जुमानत नव्हता.

९६. लावण्यवती, गुणवती व तरूण स्त्रीने आपल्या सर्व सौंदर्याने शुकमुनींना मोहीत करण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांची कामेच्छा जागृत होत नाही.

९७. किंवा जनमेयाने सर्पसत्र यज्ञ सुरू केला, तेव्हा तक्षकाने इंद्राचा आश्रय घेतला. तेव्हा वसिष्ठ ऋषीने 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' म्हणून दोघांनाही आहुतीसाठी आवाहन केले. तेव्हा अस्तिकाने त्यास वाचविले.

९८. असो याप्रमाणे मुलगा, पत्नी व राजा अतिशय त्रासानें प्रवास करताना मोक्षप्राप्त करून देणारी काशी नगरी त्यांना दिसली.

९९. काशी नगरी हे शिवाचे स्थान असून तेथे रक्षणवीर काळभैरव पाप्याच्या मस्तकावर काठी मारतो.

१००. देवसुद्धा ज्या नगरीत मरण येऊ इच्छितात, मग इतराची काय कथा. येथे मृत्यू येण्यासाठी पुण्य संचय पाहिजे.

१०१. जी नवखंडापासून वेगळी आहे. जिची व्याप्ती पाच कोस आहे. जिथे शकर भक्ताना मोक्ष देण्यासाठी थांबला आहे.

१०२ सर्व जीवांना परमेश्वराने चौऱ्यांशीलक्ष योनीतूव भ्रमण करण्याचे चक्र लावून दिले आहे. एका शंकरावाचून ब्रह्मदेवाला सुद्धा हे चक्र (जन्म मृत्यू) चुकले नाही.

१०३. अशी काशी नगरी पाहताच राजाने साष्टांग लोटांगण घातले. पुढे गेल्यावर भगीरथी नदीचा तीर राजाला दिसला.

१०४. विष्णुच्या पायापासून तिन्ही लोकात जी वाहते. ती गंगा, दुर्गापती शंकराच्या मस्तकावर फुलाप्रमाणे शोभून दिसते.

१०५. विष्णुच्या पावलाच्या नखचंद्रापासून निघणाऱ्या अमृतधारा (गंगा) त्यानें भक्त भगीरथ चकोराला दिल्या. त्याच्या कृपेने गंगा चराचर सृष्टीला मिळाली.

१०६. देवांनीच प्राशन करण्यास योग्य अशा त्या गंगा जलामध्ये स्नान करून व शुभ्र कमळांनी शकराची पूजा करून हात जोडत असतात.

१०७. कैलास पर्वताचा नायक असलेल्या, कर्पुरगौर रंग असलेल्या, मदनाचा अन्त करणाऱ्या, त्रिनेत्र असलेल्या महेशा तुझा जयजयकार असो.

१०८ हे भक्तांचे इच्छित प्राप्त करून देणाऱ्या कल्पवृक्षा, लक्ष्मीपती विष्णुच्या विश्रामस्थाना विरागी लोकांचा मुकुटमणी शोभणाऱ्या महेशा, तुला वंदना असो.

१०९. या प्रमाणे काशीतील विश्वेश्वरांची पूजा व स्तुती करून व त्याला वंदन करून राजा देवालयाबाहेर आला. त्यावेळी काय झाले ते पहा.

११०. विश्वामित्र अचानक तेथे आला व राजाच्या उत्तरीयाचा पदर धरून ओढून तो म्हणाला मी तुझा सर्वत्र शोध घेत होतो आज बरा सापडलास!

१११. तुझ्या मनात जर मला धन द्यावयाचे नव्हते, तर तसे वचन तरी तू का दिलेस ? याचकाला कष्ट देऊन मग दान दिल्याचे काय फळ ?

११२. मी तर एक कवडी देखील कमी घेणार नाही. अथवा तुला बंदिवासात टाकीन. अरे, तुला माझा अजून इंगा कळला नाही. मी सुरासुरांना बंदीवान करू शकतो.

११३. यावर राजा म्हणाला आपण दयेचे सागर आहात. आपल्या शब्दाच्या लगामाने क्रोधरूपी घोड्याला आवर घाला. आज सूर्यास्तापूर्वी मी स्वत ला विकून का होईना पण तुमचे धन देवून टाकीन.

११४. सूर्यास्तापूर्वी माझ्याने आपले ऋण फेडणे न झाल्यास आपण मला शापून भस्म करा.

११५. या प्रमाणे समजूत घालून राजाने विश्वामित्राला शांत केले. त्रिशंकू राजाची एक अंगठी राजाजवळ चुकून राहिली होती.

११६. ती देवून राजाने गवत विकत घेतले व पत्नी मुलासह मान खाली घालून तो चालू लागला.

११७ पुढील कथानकांची फक्त कल्पना देतो. राजाने प्रथम पत्नीला नंतर मुलाला व शवटी स्वत:सही विकून घेतले.

११८. धर्मराजापुढे काय झाले ते तू ऐक. त्याच्यासारखी कष्टदशा खरोखर कोणीच भोगली नाही.

११९. या प्रमाणे महाभारताच्या वनपर्वातून अत्यंत रसपूर्ण अशी ही कथा-कवारुपी नदी वाहत असता, श्रोत्याच्या पवित्र पुळणावर विविध 'बाण' सापडतात. (विशिष्ट प्रकारचे गोटे)

१२०. श्रोत्यांनी ही कथा ऐकण्यासाठी जरा प्रयत्न केले तर स्वस्त्रीस ज्याप्रमाणे नि:शंकपणें काहीही मागता येते, त्याप्रमाणे ही कथा उपभोगण्यास मिळेल.

महाभारताच्या अरण्यपर्वातील हरिश्चंद्राच्या उपाख्यानाचा

तिसरा अध्याय समाप्त होत आहे.

□ □ □

## टीपा : अध्याय तिसरा

कृत्या (त) कृत्य – कृतार्थ

मृगांबुजाचा – (मृगांबुचा) – मृगजळाचा.

वोंडबरी – जादु

वेताळ, झोटिंग, जाखिणी, लावा, मेसको, मायेराणी इ.या पिशाच्च व क्षुद्र देवता आहेत.

घुमस घालणें – धुडगुस घालणे

अशोज्यात – अपवित्रास

घ (ग) णि – जुमानी

जन्मेजयाने सर्पसत्र आरंभिले त्यावेळेळीं इंद्राचा तक्षकाने आश्रय घेतला 'इद्राय तक्षकाय स्वाहा।' म्हणून दोघांनाही आहुतींसाठी आवाहन झाले. तेव्हा आस्तिक ऋषींनें त्यास वाचविले.

दधीज्य (अचळ)

घरटीकार – रक्षक

सुभट – वीर

साट – बांबुचा जुडगा

मां – मग

पंत्र (च) कोसी

कोत्रत्रया (नेत्रत्रया) त्रिनेत्रा

बांदवडी – बंधनात

त्रु (तु) ण

ज (जा) या नंदन

घमके – निघाला

नावेक – क्षणभर
गभस्ती – सूर्य
विदान – कौशल्य, कपट
इंदुवतल्मा – रात्र
लावण्ये ण्य) प्रचदा – सुंदर स्त्री
शटपदु – भ्रमर
नातळसी – स्वीकारणीय
शेव्य – स्वीकारणीय
दशकदयेशताक्षे – दोन हजार डोळ्याच्या शोषाने
मोगेल (मा) – थकेल
नमुमानि – मानणार नाही
वदनांबुक – तोंडाचे पाणी
पेणे – मुक्काम
हंस अनिळ – आत्मा हाच प्राणवायु
अरुणि – ऋण मुक्त
धनिवरी – समाधान लाभेतोंवर
पचवगत्रे – वाघ
भाते – आतडे

अध्याय चौथा

सूर्यवंशाला ललामभूत असा तो हरिश्चंद्र राजा पत्नी व पुत्रासह स्वतःला विकून घेण्यासाठी बाजारात जाऊन उभा राहतो. प्रथम तारामतीला विकून एक तुके सुवर्णाची भर करतो परंतु वेश्येला विकली गेलेली तारामती तिच्याकडे जाण्यास नाकारून दुसरीकडे देण्याविषयी विश्वामित्रांना विनंती करते. विश्वामित्र रागारागाने ते सुवर्ण वेश्येला परत करून पाकशाळेत स्वयंपाक करण्यासाठी स्वतःच तारामतीला व तिच्या विनवनीवरुन रोहिदासालाही विकत घेतो. त्यानतर हरिश्चंद्राला स्मशानाची राखण करणाऱ्या डोंबाला विकून दोन तुके सुवर्ण घेतो. त्यामुळे हरिश्चंद्र दिलेल्या वचनातून मुक्त होतो. डोंबाच्या घरी सेवा करीत असलेल्या राजाला विश्वामित्र शक्य त्या प्रकारे तेथेंही त्रास देतो त्यामुळे तेथेही त्याच्या कामावर असंतुष्ट होऊन, त्याच्या पत्नीनें सांगितल्यावर डोंब त्याची नेमणूक स्मशानात प्रेतरक्षणाच्या कामावर करतो.

।। श्री गणेशाय नमः ।।

छायापतिवंशमंडण । चाले माथां बांधोनि त्रृण ।
सरसी पवीत्र जयानदन । फीरे पाटन ग्राहीका । १ ।

पुरी फीरउनि सेवटीं । कौसीकें आनीले हटावटीं ।
राजलक्षण देखोंणि दृष्टी । वीस्मये पोटीं जगाच्या । २ ।

ह्मणती हा हरीचंद्र नृपतीं । दुजी सकुमार तारामती ।
पैल तीजा उत्तमकांती । रोहीदासासारीखा । ३ ।

येक म्हणती यथार्थ वचन । रायें वोपिलें राज्यदान ।
दक्षणेलागी हा ब्राह्म । चौथा दीसें कौसी । ४ ।

ऐसी परस्परें मात । प्रगट झाली नगरांत ।
ऐकोण धांवीनले बहुत । धनवंत धनेंसी । ५ ।

तारामति ह्मणे प्राणेश्वरा । प्रथम वीकोनिं मम शरीरा ।
उरल्या धनांलागी कुमरा । विकोनि रुषी शांतवी । ६ ।

तंव रोंहीदास मातृचरणि । मस्तक ठेउन उभय पाणि ।
जोडून बोले वीनयवाणि । ते तुं परीसें कुरुवर्या । ७ ।

प्रथम मांडुनियां धनारविंदे । कौसीक मौळीपुजा बांधे ।
जेंणें सुपुत्रपणांची बीरुदें । वदनि विबुधें जाणिजे । ८ ।

ऐकोनि दोघांची वीनयउत्तरें । आश्चीर्य मानिलें रुषेश्वरें ।
म्हणे तुमच्या शरीरें । रुण कैसें फीटेल । ९ ।

नृपा आंगी दोनि तुकें । येक तुक नृपनायकें ।
उरले अर्ध या बाळकें । विकोनि द्यावे देहासी । १० ।

कर्मरेखा करोनिं मान्य । अंगणामुर्घ्नी बांधे तृण ।
रूप यौवन नावन्ये । देखोंणि आलि ग्राहिकें । ११ ।

आश्चर्येसी कुंटिनि । सिबिके बैसोनि तत.क्षणि ।
लावण्ये वनिता देखोणियां नयनीं । मोल पुसे तयेचें । १२ ।

तये वैशेचीया धनां । करूं सके कोण गणना ।
सौंदर्य देखोंणि अंगना । आनवि धनां तात्काळ । १३ ।

तुळा उभउनि धडधडां । रुणकरी वोढी भरी पालडा ।
तारामती तनुंचा धडा । करुनि वोपि तापसां । १४ ।

रुषी करीं वोपुनि धन । हाती धरीलि गुणनिधान ।
जवी कां शृति आवर्ण । स्पर्श करी कल्पांति । १५ ।

किं ते शीळा जैसी गंडकी । पशुघ्नें नेली मांसतुकि ।
ज्यान्हविजळ मद्यकिं । मद्यालागी घेतले । १६ ।

तैसी पवित्र राजबाळा । शिबिके वाहुनि वेल्हाळा ।
भोंवता वेष्टीत कामिनिपाळा । उदक डोळां ढाळीति । १७ ।

कुमराकांतवियोगानळें । भडके उठती हृदयपाळे ।
ह्मणे कर्मे जास्वनीळे । तीघा केल्या तीन वाटा । १८ ।

कुंटीनिं ह्मणे वो सुंदरी । तुझ्या भाग्यपद्मनीवल्लरी ।
उदयो केला ह्मणोनिं घरीं । आमुच्या आलीसी सदैवे । १९ ।

आम्हा ऐस्या तुझीया दासी । सकळ वैंभवा स्वामीनि होसी ।
तु मान्य नृपासी । जालीसी पात्रा । २० ।

ऐसीयापरी ते कुंटीनी । बुझावीतसे मवाळवचनीं ।
तारामतीचा शोकवन्हीं । वीशेष पेटे वचनाब्जे । २१

शिबिकें आंतुनि खालुती । उडी टाकुनि तारामती ।
धांवोनिं ह्मणें गा प्रानपती । इचे हाती नेदावे । २२ ।

राजा ह्मणें तपोधना । प्रार्थुन सोडवीं आपणा ।
येरी लागोन त्याचे चरणां । माझीया प्राणा सोडवी । २३ ।

याचे आचरण दीसे भ्रष्ट । माझें पतिव्रत पावेल नष्ट ।
सेंखी माझ्या प्राणां वाट । प्राप्त होइल नरकाची । २४ ।

कांही कोप कांही करुणा । करुनिं वोपिलें तीचीया धना ।
तव काळकौशिक ततः क्षणां । ग्राहीक आला सुंदरे । २५ ।

तो परम पवीत्र श्रोत्री । सदाचार अग्निहोत्री ।
धर्मशाळे अन्नछत्रे । पाकालागी घेतली । २६ ।

पवीत्र तारामतितुक । तुकोनिं दीधलें कनक ।
तारामतीसी कौसीक । घऊन जाता आश्रमा । २७ ।

रोहिदास ह्मणें जी ताता । मातृस्नेहे कळवळी चीत्ता ।
भटुन येइन मागुता । वेळ न लागता क्षणार्धे । २८ ।

राजा ह्मणें सद्गदीत वचनें । भेटूनी मागुती सीघ्र येणें ।
मातृपाठींसी धांवतां तेणे । जननीं देख बाळका । २९ ।

उभी राहोनि वेल्हाळा । पोटेंसी कवळुन सुकुमार बाळा ।
स्तन घालुनि मुखकमळा । कुरवाळुनि बुझावी । ३० ।

ह्मणे बाळा कुळभुशणां । तुझा वीयोग जाकली प्राणां ।
परी तापसदक्षणेचीया रुणा । नेंदु कैसी तुजवीन । ३१ ।

आंसुवे भरुनी उभय नयेन । हा हा शब्दें करी रोदन ।
परतापक्लेशें सजन । नवनित जैसें वीतुळे ।३२।

कान्‍कौसीक ह्मणें माते । स्नेह सांडुन चालींजे पंथे ।
कृपा केलीयां रमाकांते । योग होइल दोघांसी ।३३।

येरी रुषी पादपद्म । नमुनि ह्मणे तात स्वामि ।
माझें बाळ घ्यावे तुह्मी । सेवा करील चरणांची ।३४।

करुणा येतां ब्राह्मणोत्तमा । अर्ध तुक वोपीलें हेमां ।
कुमारसहित राजमामा । स्वकीये धामां आणीली ।३५।

तुके दोनि उरलें रुण । यालागी राये घेतलें त्रृण ।
माथां बांधोनि आपण । उभा ठेला हाटवटी ।३६।

नगरवासी नारीनर । देखतां नयनिं ढाळिति निर ।
ह्मणती चांडाळ रुषेश्वर । वोकरा नृपवर घातला ।३७।

मात प्रगटताचीं नगरी । वीरबाहु दुराचारी ।
स्वरच याति प्रेतपुरी । नाथ जाण प्रत्यक्ष ।३८।

तामस तनुंची दुर्गंधी । वीशाळरूपी अर्गळा स्कंदी ।
तया देखता सज्जनमांदि । दुरी ठेली पाहत ।३९।

होमशाळेमाजी श्वान । कीं ग्रहणिं सीहकानंदन ।
नीधानकुंभी पीशाच्यगण । प्रगटे तैसा पातला ।४०।

तया डोंबाचीये गेहीं । धनांलागी मर्यादा नाही ।
गंगातटीं प्रेत दाहीं । धन वोपि तयातें ।४१।

तो डोंब ह्मणे गा साचें । काय मोल सांगा याचे ।
रुषी ह्मणे दे याचे । दोनि तुके सुवर्ण ।४२।

ऐसें बोलतांचि कौषिके । डोंबे तुकोनि दीधले कनक ।
नृपा नेतां सकळ लोक । शोक करीती अक्रोशें ।४३।

हा हरीश्चंद्र पवित्र परम । त्यासी प्राप्त दुष्ट कर्म ।
भोगणें घडे अपवित्र धाम । अंत्यजाचे कुश्चिळ ।४४।

स्वपंचवाडां पवीत्र नृपती । चालता पंथी पसरल्या अस्तीं ।
गळत रक्ते चर्मे वाळती । दुर्गंधी घ्राणि बैसली । ४५ ।

अस्ती चुकउनि ठेवी पाये । तव पुढें देखीलें डोंबालय ।
रत्नखचीत हाटकमये । अती रमणीये साजीरें । ४६

पन्यांगणेचे शृंघार योवन । रसें परीपक्व वृंदावन ।
कुटीळ नराचें बाह्याचरण । पतीवृतपन नारीचें । ४७ ।

ऐसीयापरी स्वपचधाम । अधम अश्चीर्य मनोरम ।
जेंवी का पशुघ्नांचे नाम । दयाळ ऐसे बोलीजें । ४८ ।

तया धामशीखरी पद्मीणि । रूप लावन्ये गुण पद्मीणि ।
उभी वल्लभा लक्षीत नयेंनि । वेष्टीत दासी दशकेंसीं । ४९ ।

वल्लभा गाठीं राजचीन्ही । पुरुष देखुनी भावीले मनी ।
प्रेतदहनालागी कोन्हीं । धन देउनिं घेतला । ५० ।

आदरें बोलाउनि कांते । नृपा वोपिले धरुनि हातें ।
म्हणें कार्य सांगीजे इयातें । बाह्ये सेवेचे अखड । ५१ ।

हरूषें उतरोनीं लवलाहे । बाहेरी येउनीं जंव पाहे ।
राजा कवळुनि बाहे । भार्येपुढे दाविला । ५२ ।

ते ह्मणें हे रोडरोगी । याच्या कामा लागो आगी ।
शक्ती कैंची याचीया आंगी । सजीव प्रत घेतले । ५३ ।

रागें आनोनिं घागरी । ठेविलि नृपवराचे सीरी ।
ह्मणें उदक आणि गा झडकरी । भागीरथी गंगेचें । ५४ ।

कुंभ घेउनि भुपाळं । भरी भागीरथीचें जळ ।
कौशीके येउनि मांडीला छळ । गुप्त वेशें पाठीसी । ५५ ।

कुंभ घेउनि जाता पुढें कौशीकें ह्मनोनिं फोडीला दंडे ।
करें लोटुन देता पडे । तोंडघसी पालथा । ५६ ।

शरीर थबथबा गळत । अत्येजे देखीला रीता येत ।
कोप चढला अत्यद्भुत । मारी धांवोनि चडकनां । ५७ ।

ह्मणें हा पोसला व्रथा पुष्ट । प्रथम मुहुर्ती फोडींला घट ।
तुझेणी न करवती कष्ट । तरी कां आह्मां नागवीलें ।५८।

राजा ह्मणे वीशाळ घागरी । भारें गलों जी चाचरी ।
क्रोध सांडुनी मजवरीं । क्षमा केली पाहीजे ।५९।

दुजी घागरी बहु लहान । घेउनीं म्हणे भरी रांजन ।
हे फोडीसी तरी प्राण । तुझा घेइन तात्काळीं ।६०।

दुजा कुंभ घेउनि माथा । छीद्र पाडी भरुणि आनीता ।
रांजनी जाउनीं गुप्तता । फोडी तत्त्वता बुडासी ।६१।

उदयापासुनीं अस्तमानवरी । राजा कष्टें उदक भरी ।
बींदुमात्र न थरे वारी । अभीशेकपात्रासारीखे ।६२।

जैसा भाग्येहीनाचा उदीम । वंध्या वनितेचा रतीकामु ।
अहोरात्री करीता श्रमु । कष्ट त्याचे नीर्फळ ।६३।

ऐसेपरी तो भभज । क्लेष पावे करीता काज ।
अस्ताचंळी मीत्र पकज । जाता विनवी डोंबाते ।६४।

वर्णाश्रमाचा सेतु न ढळे । स्वामिसेवेचा पंथ चाले ।
ऐसें पाहिजे जी केलें । अन्नदान स्वामियां ।६५।

अत्यजे जाउनि आपण । नृपा वोपीले शुष्कान्न ।
भार्गव–शाळेचे भोजन । आणि इंधन आज्यादी ।६६।

नृपे सुस्नातपदरीं । घेउनि गेला गंगातिरीं ।
स्नान सारुनिं सामग्री । घेउनि पाक सारीला ।६७।

हृदयेस्त देवाचे अर्चन । करुनिं पात्री वोगरी अन्न ।
गोग्रास काढुनि वदन । त्रृप्त केलें वन्हीचे ।६८।

येक विष्णुं सर्वाघटीं । सकळ भुतें ज्याचे पोटी ।
तेथें संकल्पवीकल्प गोष्टी । कल्पनेच्या काइशा ।६९।

भोज्य भोक्ता आंनीं भोजन । त्रिरूपें येक नारायण ।
आह्मींच ब्रह्म ब्रह्मार्पण । करीता जाला या बोधें ।७०।

ग्रास घालीता वदनिं । तो ब्राह्मणरूपें कौशीकमुनिं ।
तेथें पातला भोजनी । इछा धरूनिं क्षुधार्थी । ७१ ।

उदर पुष्टीची घडी । करुनिं चरणा वळीलें गडी ।
शोक सावरीत दडी । शब्द तोंडी न बोलवे । ७२ ।

करसकेतें दावी मुखा । देखोणि वया नृपनायका ।
येतां ह्मणें त्रैलोक्यजनका । स्नान करींजे सत्वर । ७३ ।

स्नान सारीतांची ब्राह्मण । नृपें द्विभागीलें अन्न ।
येक अर्पी मुनिलागुण । येक आपण ठेविला । ७४ ।

ब्राह्मण देखोणि क्षुधार्थी । राजा ह्मणे इतुकेन तृप्ती ।
कैसी पावेल हे मूर्ती । ह्मणोनि मागें राहीला । ७५ ।

ब्राह्मण बैसोनियां पात्रीं । जेवितां मीटक्या वाजतीं वगत्री
ह्मणे बहुता दीवसा वगत्रो । आजा अन्न देखिलें । ७६ ।

स्वकीय भाग भक्षीला । दुजा भागालागी डोळा ।
नृपें जाणोनिं पात्र गोळा । करुनि वोपि द्विजातें । ७७ ।

तृप्ती पावोनिं रुषेश्वर । उठला देउनि ढेंकर ।
उदक आहार नृपवर । च्यारी अजुळी सेवील्या । ७८ ।

पटें कसुनीयां कटासी । सदा सादर सेवेसी ।
भोजनकाळीं कौषीक ऋषी । येउनी अन्न भक्षीतसे । ७९ ।

नीराहार शक्तिहीन । दीसे जैसा रंकदीन ।
काज न होता धांवोन । बळे दासी धुमसीती । ८० ।

ऐसीयापरी तो ताराग । शेवा करीतां अब्दासीग ।
भरतां डोंब मागे गांग । करीता भोजन अर्कास्ता । ८१ ।

दासी पाहती जंव रांजनी । बीदुमात्र न दीसे पाणि ।
नृपा ताडुनियां मुर्ध्नी । कुंभ देउनीं धाडीला । ८२ ।

निबिड तमाचीये पोटें । चालतां पंथ न दीसे दृष्टी ।
कुभ भरूनि परम कष्टी । आणोनि पाजि स्वामिसी । ८३ ।

तांव वीरबाहुनिं अगणा । ह्मणें यासी ठेवावे स्मशाना ।
कार्य न करी हा सदना । योग्यं नव्हे आमुतें ।८४।

आयोध्यापाळ पवित्र नृपती । डोंब रक्षण ठेवी प्रेतीं ।
मसनखांब एसेंह्मणतों । नाम त्याचे पुरोरत ।८५।

माझीये अज्ञेविन सर्वथा तुवा जाळुं नेंदावे प्रेता ।
ऐसें सांगोनिं नृपनाथा । येउनी स्थापी स्मशानि ।८६।

तटी गगंचीया आटोळा । घालुनीं बैसविलें नृपाळा ।
पुढें वर्तलें ते भुपाळा । श्रवण केलें पाहिजे ।८७

इति श्री अरण्ये पर्व भारत । कथारूप परमामृत ।
सजनचीत्तें सोमकांत । प्रेमोदकें पाझरती ।८८।

भुवतेश्वर कविची वाणि । पुष्पलत्तीका वचनसुमनि ।
लीला विश्वभर गुरुचरनि । अर्पुनी अर्ची श्रोतेयां ।८९।

**इतिश्री भारत वनपर्वणि हरिश्चद्रोपाख्यान**

**।। चतुर्थोध्याय ।४।**

□ □

## अर्थ : अध्याय चौथा

१. सूर्य कुलाला भूषण असलेला राजा, आपल्या बरोबर पवीत्र पत्नी व मुलाला घेऊन, डोक्यावर तृण बांधून काशी नगरीत फिरू लागला

२. नगर फिरून शेवटी विश्वामित्राने बाजारात त्यांना आणले. राजाची राजलक्षणे पाहून लोकांना कळवळा येऊ लागला.

३. लोक म्हणू लागले, हा हरिश्चंद्रराजा असून दुसरी कोमल तारामती आहे तर पलिकडचा तेजस्वी दिसणारा मुलगा रोहिदास आहे.

४. एक म्हणाला, दिलेले वचन पाळण्यासाठी राजाने राज्यदान केले आहे व दक्षिणेसाठी हा ब्राह्मण त्यांना येथे घेऊन आला आहे तो विश्वामित्र दिसतो.

५. अशी एकमेकात चर्चा सुरू झाली. चर्चा ऐकूण पुष्कळ धनवंत पैसे घेऊन जमा झाले.

६. तारामती म्हणाली, हे प्राणेश्वरा, प्रथम मला विकून उरलेल्या पैशासाठी मुलाला विकून ऋषीला शांत करावे.

७. यावर रोहिदास आईच्या चरणावर मस्तक ठेवून काय बोलला, ते धर्मराजा तू आता ऐक.

८. रोहिदास म्हणाला, प्रथम मला विकून धनरूपी कमळाने विश्वामित्राची पूजा करावी. ज्यामुळे शहाणे लोक मला खरा सुपुत्र म्हणतील.

९. असा दोघांचा संवाद ऐकून विश्वामित्राला आश्चर्य वाटेल. विश्वामित्र म्हणाला तुला विकून ऋण कसे फिटेल.

१०. राजाची दोन तुके.अर्धा तुका राणीचा उरलेला अर्धा तुका मुलाचा विकुन द्यावा

११. आपले नशीब समजून राणीने डोक्याला विक्री तृण बांधले. राणीचे रूप यौवन व सौंदर्य पाहून गिऱ्हाईके जमा झाली.

१२. तारामतीने सौंदर्य पाहून वेश्या आश्चर्यचकीत होवून त्यांनी लगेच पालखी-तूनच तिची किंमत विचारली.

१३. वेश्याच्या धनाचा कोण हिशोब करू शकणार. स्त्रीचे सौंदर्य पाहून त्यांनी तात्काळ पैसा आणला.

१४. तराजू उभी करून ऋणकऱ्यांनी पारडे ओढून ते भरले. तारामतीने निश्चय-पूर्वक स्वतःला ऋषीला अर्पण केले.

१५. कल्पांत जवळ आला म्हणजे ज्याप्रमाणे वेदाला अस्पृश स्पर्श करतो त्या-प्रमाणें ऋषीला पैसा देऊन वेशेनें तारामतीला ताब्यात घेतले.

१६. किंवा शाळीग्राम खाटकाने पशूचा वध करण्यासाठी न्यावा. गंगेचे पाणी कलालाने मद्य तयार करण्यासाठी वापरावे.

१७. त्याप्रमाणे पवित्र तारामतीला पालखीत घेंवून वेश्या निघाल्या. तेव्हा नगरातील स्त्रियांच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले.

१८. पुत्र व पती यांच्या वियोगाने व आकांताने हृदयात दुःखाचा आवेग भडकून उठला. तारामती म्हणाली, आमच्या नशिबामुळें शंकरानें आम्हाला वेगवेगळें केले.

१९. वेश्या म्हणाली, हे सुंदरी तुझे नशीब थोर म्हणून तू आमच्या घरी आलीस.

तांव वीरबाहुनिं अगणा । ह्मणें यासी ठेवावे स्मशाना ।
कार्य न करी हा सदना । योग्यें नव्हे आमुतें । ८४ ।

आयोध्यापाळ पवित्र नृपतीं । डोंब्र रक्षण ठेवी प्रेतीं ।
मसनखांब एसेंह्मणतों । नाम त्याचे पुरीरत । ८५ ।

माझीये अज्ञेविन सर्वथा तुवा जाळुं नेंदावे प्रेता ।
ऐसें सांगोनिं नृपनाथा । येउनी स्थापी स्मशानिं । ८६ ।

तटी गगंचीया आटोळा । घालुनीं बैसविलें नृपाळा ।
पुढें वर्तलें ते भुपाळा । श्रवण केलें पाहिजे । ८७

इति श्री अरण्ये पर्व भारत । कथारूप परमामृत ।
सजनचींत्तें सोमकांत । प्रेमोदकें पाझरती । ८८ ।

भुक्तेश्वर कविची वाणि । पुष्पलत्तीका वचनसुमनि ।
लीला विश्वभर गुरुचरनि । अर्पुनी अर्ची श्रोतेयां । ८९ ।

इतिश्री भारत वनपर्वणि हरिश्चंद्रोपाख्यान

।। चतुर्थोध्याय । ४ ।

□ □

## अर्थ : अध्याय चौथा

१. सूर्य कुलाला भूषण असलेला राजा, आपल्या बरोबर पवीत्र पत्नी व मुलाला घेऊन, डोक्यावर तृण बांधून काशी नगरीत फिरू लागला

२. नगर फिरून शेवटी विश्वामित्राने बाजारात त्यांना आणले. राजाची राजलक्षणे पाहून लोकांना कळवळा येऊ लागला.

३. लोक म्हणू लागले, हा हरिश्चद्रराजा असून दुसरी कोमल तारामती आहे तर पलिकडचा तेजस्वी दिसणारा मुलगा रोहिदास आहे.

४. एक म्हणाला, दिलेले वचन पाळण्यासाठी राजाने राज्यदान केले आहे व दक्षिणेसाठी हा ब्राह्मण त्यांना येथे घेऊन आला आहे तो विश्वामित्र दिसतो.

५. अशी एकमेकात चर्चा सुरू झाली. चर्चा ऐकूण पुष्कळ धनवंत पैसे घेऊन जमा झाले.

६. तारामती म्हणाली, हे प्राणेश्वरा, प्रथम मला विकून उरलेल्या पैशासाठी मुलाला विकून ऋषीला शांत करावे.

७. यावर रोहिदास आईच्या चरणावर मस्तक ठेवून काय बोलला, ते धर्मराजा तू आता ऐक.

८. रोहिदास म्हणाला, प्रथम मला विकून धनरूपी कमळाने विश्वामित्राची पूजा करावी. ज्यामुळे शहाणे लोक मला खरा सुपुत्र म्हणतील.

९. असा दोघांचा संवाद ऐकून विश्वामित्राला आश्चर्य वाटेल. विश्वामित्र म्हणाला तुला विकून ऋण कसे फिटेल.

१०. राजाची दोन तुके.अर्धा तुका राणीचा उरलेला अर्धा तुका मुलाचा विकुन द्यावा

११. आपले नशीब समजून राणीने डोक्याला विक्री तृण बांधले. राणीचे रूप यौवन व सौंदर्य पाहून गिऱ्हाईके जमा झाली.

१२. तारामतीने सौंदर्य पाहून वेश्या आश्चर्यचकीत होवून त्यांनी लगेच पालखी-तूनच तिची किंमत विचारली.

१३. वेश्याच्या धनाचा कोण हिशोब करू शकणार. स्त्रीचे सौंदर्य पाहून त्यांनी तात्काळ पैसा आणला.

१४. तराजू उभी करून ऋणकऱ्यांनी पारडे ओढून ते भरले. तारामतीने निश्चय-पूर्वक स्वत:ला ऋषीला अर्पण केले.

१५. कल्पांत जवळ आला म्हणजे ज्याप्रमाणे वेदाला अस्पृश स्पर्श करतो त्या-प्रमाणें ऋषीला पैसा देऊन वेशेनें तारामतीला ताब्यात घेतले.

१६. किंवा शाळीग्राम खाटकाने पशुचा वध करण्यासाठी न्यावा. गंगेचे पाणी कलालाने मद्य तयार करण्यासाठी वापरावे.

१७. त्याप्रमाणे पवित्र तारामतीला पालखीत घेंवून वेश्या निघाल्या. तेव्हा नगरातील स्त्रियांच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले.

१८. पुत्र व पती यांच्या वियोगाने व आकांताने हृदयात दु:खाचा आवेग भडकून उठला. तारामती म्हणाली, आमच्या नशिबामुळें शंकरानें आम्हाला वेगवेगळें केले.

१९. वेश्या म्हणाली, हे सुंदरी तुझे नशीब थोर म्हणून तू आमच्या घरी आलीस.

२०. आम्ही तुझ्या दासी होऊन तू सर्व वैभवाची स्वामीनी होशील कारण तू राजालासुद्धा आवडलेली आहेस.

२१. तारामतीचा शोकाग्नी वेश्या मवाळ शब्द करून विझविण्याचा प्रयत्न करू लागल्या परंतु त्यामुळें तो अधिकच भडकला.

२२. तारामतीनें पालखीतून खाली उडी टाकली. धावत आऊन राजाला म्हणाली, 'हे प्राणपती मला याच्या हाती देवू नये !'

२३. तू विश्वामित्राची प्रार्थना करून सुटका करून घे असे राजाने तिला सांगितल्यावर तारामती विश्वामित्राच्या चरणाला स्पर्श करून म्हणाली की 'मला सोडून द्या.'

२४. यांचे आचरण भ्रष्ट दिसते. त्यामुळे माझे पातिव्रत नष्ट होईल. त्यामुळे मला नरकाची वाट मिळेल.

२५. थोडे रागावून, थोडी करूणा करुण वेश्येचे धन विश्वामित्राने परत केले, तेव्हा तत्क्षणी काळरूप कौशिक सुन्दर ग्राहक होवून तिथे आला.

२६. परम पवित्र, सदाचारी, अग्नीहोत्री विश्वामित्राने काशी क्षेत्रातील अन्न-छत्र धर्मशाळेतील पाकशाळेसाठी तारामतीला विकत घेतलें.

२७. तारामतीचे एक तुके सोने देऊन विश्वामित्र तारामतीला घेऊन गेला.

२८. आईच्या मायेने कळवळून रोहिदास म्हणाला, हे ताता, मी आईला भेटून लवकर परत येतो.

२९. राजाचे हृदय भरून येऊन तो म्हणाला, भेटून लवकर परत ये. आपल्या मागे रोहिदास पळत येत आहे हे तारामतीने पाहिले.

३०. ती उभी राहिली. रोहिदास जवळ आल्यावर तिनें त्यास पोटाशी धरले. त्यास कुरवाळून त्याची समजूत घातली.

३१. ती म्हणाली, बाळा कुलभुषणा तुझ्या वियोगामुळे प्राण व्याकुळ होत आहे. परंतु ऋषीच्या दक्षिणेच्या ऋणातून त्याशिवाय सुटका नाही.

३२ सज्जनाचे हृदय दुसऱ्यावर संकट आल्यावर ज्याप्रमाणे-लोण्याप्रमाणे वितळते, त्याप्रमाणे तारामतीच्या डोळ्यात पाणी आलेले पाहून विश्वामित्र म्हणाला-

३३ हे माते, माया सोडून चल. विष्णुने कृपा केल्यावर दोघांची भेट होईल.

३४. तारामती ऋषीला वंदन करून म्हणाली, हे तातस्वामी, माझे बाळ तुम्ही विकत घ्यावे. ते तुमच्या चरणाची सेवा करील.

३५. ब्राह्मणात श्रेष्ठ असलेल्या विश्वामित्राला दया येऊन त्याने अर्धे सोने देऊन त्याला विकत घेतले व त्यांना आश्रमात आणले.

३६ दोन तुके राहिलेल्या सोन्यासाठी राज्याच्या डोक्यावर विक्रीतृण बांधून त्यास बाजारात उभे केले.

३७. नगरातील स्त्री–पुरुष राजाला पाहून अश्रू ढाळू लागले व 'या' चांडाळाने राजास विकण्यास ठेवले, असेही म्हणू लागले.

३८. स्मशानाचा जणू धनीच असलेला चांडाळ जातीचा वीर वाहू-बातमी लागताच आला.

३९. त्याचे शरीर तामस गुणांच्या दुर्गंधीने भरलेले होते, त्याच्या खांद्यावर भव्य अर्गळा होती. त्याला पाहाताच सज्जन लोक दूर झाली.

४०. होमशाळेत जसा कुत्रा शिरावा, ग्रहणात जसा राहू असावा, साठविलेल्या धनावर जशी भूते येतात, तसा तो आला.

४१. तो गंगा किनारी प्रेते जाण्याचे काम करीत होता. त्यामुळे त्याच्याजवळ भरपूर पैसा होता.

४२, डोंबाने राजाची किंमत विचारल्यावरून ऋषीने दोन तुके सुवर्ण देण्याचे सांगितले.

४३. दोन तुके सुवर्ण देवून डोंबा राजाला घेवून जाताच सर्व लोक शोक करू लागले.

४४. हा हरिश्चद्र राजा पवित्र असून त्याला अत्यंजाच्या घरी राहून कामसुद्धा करावे लागेल.

४५. राजा डोंबांच्या घरी जात असलेल्या रस्त्यावर हाडे वाळेत होती. चामडीतून रक्त ठिपकत होते. त्यामुळे त्याची दुर्गंधी नाकात बसून राहात होती.

४६. राजा हाडे चुकवत चुकवत जात असताना, त्याला डोंबाचे अतिशय सुंदर व रमणीय असे डोंबाचे घर दिसले.

४७. ज्याप्रमाणे वेश्येचा शृंगार व तारुण्य असावे किंवा वृंदावनाच्या रसाने परिपक्व असावे असे किंवा कुटीलत्वाचे वागणें वरवर चांगले असावे, स्त्रीचे पतिव्रत असावे.

४८. त्याप्रमाणे त्या चांडाळाचे घर पाहून राजाला आश्चर्य वाटते. जणू शिकाऱ्याचे नाव दयाळ असावे.

४९. त्याच्या घराच्या माडीवर रुपलावण्यवती त्याची पत्नी दासीसह पतीला न्याहाळत उभी होती.

५०. पतीच्या मागे राजचिन्ह असलेला पुरुष पाहून मनात ती असे समजली की, पती पैसे देऊन प्रेत जाळण्यासाठी कोणाल तरी विकत घेतले आहे.

५१. डोंबाने पत्नीला आदराने बोलावून, तिचा हात धरून म्हणाला, त्याला बाहेरची कामे करण्यास नेहमी सांगत जा.

५२. ती आनंदीत झाली. राजाने खाली येवून तिला राजा दाखविला.

५३. याच्यात तर काही शक्ती नाही हा वाळलेला रोगी, सजीव प्रेतासारखा असून हा काय काम करणार असे ती म्हणाली.

५४. तिने रागाने घागर आणून राजाच्या डोक्यावर ठेवली व म्हणाली जा, गंगेवरून पाणी लवकर घेऊन ये.

५५. घागर घेऊन राजा भगीरथीचे पाणी भरू लागला. तेव्हा विश्वामित्र गुप्त-रूपाने येऊन त्याचा छळ करू लागला.

५६. घागरी घेऊन राजा पुढे जाताच विश्वामित्राने काठी मारून घडा फोडला व हाताने राजाला ढकलून दिले. त्यामुळे राजा तोंडावर पालथा पडला.

५७ अंगातून पाणी गळत असल्याचे व राजा रिकामा येत असल्याचें पाहून डोंब अतिशय रागावला. राजाच्या अंगावर धावत जाऊन त्याला मारू लागला.

५८. तुला फुकटच पोसले. पहिल्याच दिवशी घागर फोडलीस. तुझ्याने जर काम होत नव्हते तर तू आम्हाला का बुडविलेस.

५९. राजा म्हणाला, मोठ्या घागरीमुळे मी अडखळून पडलो. राग कमी करून तुम्ही मला आता क्षमा करा.

६०. दुसरी लहान घागरी राजाला देऊन, डोंबा म्हणाला, जा रांजन भर ही घागर जर तू फोडलीस तर तुझा प्राण मी तात्काळ घेईन.

६१. राजा दुसरी घागर घेंऊन जाताच विश्वामित्राने गुप्तपणे रांजणाच्या बुडाला छीद्र पाडले.

६२. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत राजाने कष्टाने पाणी भरले. परंतु अभिषेक पात्रासारखे एक थेंबही पाणी राजणात उरले नाही.

६३. ज्याप्रमाणे भाग्यहीन पुरुषाचा व्यापार, वांझ स्त्रीची रतीकामेच्छा निष्फळ असते. त्याप्रमाणे रात्रदिवस कष्ट केले तरी त्याला त्याचे फळ मिळाले नाही.

६४. अशा प्रमाणे काम करीत असता राजाला त्रास होत होता अस्ताचळावर कमळरुपी सूर्य गेल्यावर डोंबा राजाने विनती केली.

६५. वर्णव्यवस्थेंचा हेतू नष्ट होणार नाही, तुमची सेवाही मला करता यावी असे अन्नदान तुम्ही मला केले पाहिजे

६६. डोंबाने स्वतः जाऊन राजाला कोरडा शिधाअन्न शिजविण्याचे मडके सरपण दिले

६७. राजाने ते चांगल्या फडक्यात ते बांधून घेऊन गंगेवर गेला. तेथे स्नान करून स्वयंपाक केला.

६८. हृदयातील देवाची प्रार्थना करून, पात्रात अन्न वाढून घेतले, गोग्रास काढन ठेवून अग्नीची तृप्ती केली.

६९. एक विष्णुच सर्वांच्या शरीरात आहे. सर्व प्राणीमात्र ज्याच्या पासून आहेत तेथे सकल्प विकल्प या गोष्टी कल्पनेच्या आहेत.

७०. भोगणारा, भोगण्यास योग्य असलेला आणि भोजन ही तीनरुपे एका नारायणातच आहेत. स्वतःच ब्रह्म समजून त्याला अन्न अर्पण करू असा विचार करून.

७१. तोंडात घास घालणार तोच भुकेल्या ब्राह्मणाच्या रुपात विश्वामित्र भोजनाची इच्छा धरून तिथं आला.

७२. भुकेने त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता, पोटवाकडे तिकडे होऊन काठीच्या आधारे तो आपला तोल सांभाळत होता.

७३. हाताच्या खुणेने तो तोंड दाखवीत होता. हे पाहून राजाला त्याची दया येऊन तो म्हणाला, ‘हे त्रैलोक्य जनका लवकर स्नान करून ये.’

७४. ब्राह्मणाचे स्नान होताच राजाने अन्नाचे दोन भाग करून, एक ब्राह्मणाला दिला व एक स्वतःसाठी ठेवला.

७५. भुकेला ब्राह्मण पाहून राजाने विचार केला. याची तृप्ती येवढ्यावरच कशी होईल, म्हणून स्वत. जेवण्यासाठी मागे राहिला

७६. ब्राह्मण जेवण्यासाठी पात्रावर बसला व मिटक्या वाजवत जेऊ लागला. जेवतांना तो म्हणाला, ‘बऱ्याच दिवसानंतर आज अन्न पाहिले.

७७. स्वतःचा हिस्सा संपवून आपल्या हिस्यावर ब्राह्मणाने डोळा ठेवलेला पाहून राजाने स्वतःचे पात्र त्याला दिले.

७८. ब्राह्मण तृप्त होऊन, ढेकर देऊन उठला. राजाने चार ओंजळी पाणी पिऊन उदक आहर घेतला.

७९. कंवर कसून राजा नेहमी काम करण्यास तयार असे जेवणाच्या वेळेसच ब्राह्मण येऊन अन्न खाऊन टाकत असे.

८०. फक्त उदक सेवनानें राजा अत्यंत अशक्त झाला व दिनदुबळा दिसू लागला. काम झाले नाही तर त्यावर दासी धावत यऊन चिडत.

८१. याप्रमाणे राजा खूप कष्ट करत असता डोंब त्याला रागवतच होता. रात्री डोंब भोजनास बसला असता—

८२. जेंव्हा दासींनी रांजणात पाहिले तेव्हा त्यांना त्यात एक थेंबही पाणी दिसले नाही, तेव्हा त्यांनी राजाला घागर देऊन पाणी आणण्यास पाठविले.

८३. काळयाकुट्ट अंधारात रस्ता दिसत नव्हता. अतिशय त्रासाने घडा भरून आणून राजाने स्वामीला पाणी पाजले.

८४. वीरबाहूची पत्नी त्यास म्हणाली, हा घरी काम करत नाही. म्हणून त्यास स्मशानात कामासाठी ठेवा.

८५. अयोध्येच्या पवित्र राजाला डोंबाने प्रेतरक्षणासाठी ठेवले. नगरीतील लोक त्यास स्मशान खांब असे म्हणू लागले.

८६. माझ्या आज्ञेशिवाय तू प्रेताला जाळू देऊ नये. असे राजाला डोंबाने सांगून त्यास स्मशानात नेमले.

८७. गंगेच्या किनाऱ्यावर राजाला आणून बसविले. पुढे काय झाले ते धर्मराजा तू ऐक.

८८. याप्रमाणे महाभारतातील अरण्यपर्वातील कथारूप अमृत सज्जनाच्या चित्तरूपी सोमकांत पाषाणातून पाझरतो.

८९. मुक्तेश्वर कवीची वाणी म्हणजे पुष्पवेलीवरची वचनफुले, लीलाविश्वंभर या गुरूचरणी अर्पण करून श्रोत्यांची प्रार्थना करतो.

□ □ □

**टीपा : अध्याय चौथा**

१. छायापति वंशमंडन — सूर्यकुल भूषण
सरसी — सांगाती
पाटन (ण) — नगर

२. हटावटी – बाजारात

७. मात्रृ (तृ) चरणि

८. मांडुनिया – 'माझिया' अन्यपाठ
जा (वा) णिजे – वर्णावी

१४. वैशे (वेश्ये) चीया

१५. शृ (श्रु) ति – वेद

१६. गंडकीशीळा – शाळिग्राम
मशुघ्न – खाटिक
मद्यकि – कलालाने

१८. जास्वनीळ – शंकर

३०. बुझावी – समज घाली

३१. जाकळी – व्याकुळ करी

३८. स्वपच याति – चांडाळ जातीचा
प्रेतपुरीनाथ – स्मशानाचा धनी

३९. सज्जनमांदि – सज्जनांचा समुदाय

४०. सोंहकानंदन – राहू

४५. अस्ती (स्थी) – हाडे

४७. नारीचे – 'जारिणीचे' अन्यपाठ
चाचरी जाणे – अडखळणे
भुभुज – राजा
भार्गव शाळेचे भो (भा) जव – मडके
वळीले (वें) गडी – वाकडेतिकडे करी
शो झो) – क
वगत्री – नेत्री अन्यपाठ
ताराग – तारारंग
वीरबाहुनि (ची)
पुरीरत (पुरीस्त) – नगरात

## अध्याय पाचवा

राजाची चैंमणूक डोंबा स्मशाणात करतो. तारामती पाकशाळेत, तर रोहिदास शिष्याबरोबर लहानसहान कामे करत असतो. फुलें आणण्यासाठी रोहिदास गेला असता त्यास सर्पदंश होतो व तो मृत्यू पावतो. तारामतीला हे वृत्त समजताच ती येते. पुत्राच्या प्रेताला पाहून तारामती शोक करते. विश्वामित्र तिला प्रेत स्मशाणात घेऊन जाण्याचा सल्ला देतो कारण दिवसा प्रेत जाळण्यास पैसे पडतात, स्मशाणात ती प्रेताला जाळत असता, स्मशाणात राखण करणारा हरिश्चंद्र राजा तेथे येतो. त्यांना एकमेकाची ओळख पटते. ते शोक करतात. राजा डोंबाची परवानगी आणण्यासाठी जातो तारामती रोहिदासाचे प्रेत मांडीवर घेऊन बसते तिला झोप लागते. विश्वामित्र रोहिदासाचे पोट फाडून आतडी–रक्त तारामतीच्या तोंडाला फासतो. सर्व नगरात राक्षसी लहान मुले मारून खात आहे असे सांगतो. राजा तिचा वध करण्याची आज्ञा देतो. डोंबा हरिश्चंद्राला तिचा वध करण्यास सांगतो. ही सत्त्वपरीक्षा पाहाण्यासाठी सर्वदेव, गंधर्व, ऋषी पत्नीसह विमानात बसून आलेले असतात, शेवटी हरिश्चंद्र सत्त्व परीक्षेला उतरतो व सर्वत्र आनदी आनंद होतो.

**।। श्री गणेशाय नमः ।।**

प्रेतपाळे प्रेतरक्षणा । राजा ठेवीला स्मशाणा ।
तारामति नृपनंदनां । कोण कर्म वोडवलें ।१।

काळकौशिकसदनिं सती । पाकशाळे तारामती ।
रोहीदास शीष्यपंक्ती । शेवा करी सर्वदा ।२।

ऐसा कर्मिला किंचीत्काल । कौशीके मांडीला छळ ।
कुसुमवाटीकेमाजी बाळ । बडन्यासंगे पातला ।३।

वीश्वामीत्र ह्मणें तक्षका । दशनि दंशी नृपबाळका ।
ऋषी अज्ञनें वाटीका । टाकुनि आला गुप्तत्वे ।४।

सुमनगर्भी वास भोगी । करी जेवी विजनि योगी ।
भोगी असता वोढीलें वेगीं । तया सुमनां पातला ।५।

परीमळकरंडे वामहस्ती । सव्य सुमने वेचूनिं भरींती ।
जाली वृक्षवल्ली किति । येके वेचीती जळस्थें । ६ ।

मालति मोगरे बकुल केतकि । कमळें पुष्पें सेंवति पारजातकि ।
कंचन मंदार चंपकि । तुळसी दवने बिल्वादि । ७ ।

भूपाळबाळ बडव्यासंगी । सुमन वेचीतां लक्षीत भोगी ।
भोगे वोढीला असतां वेगी । तया सुमनां पातल । ८ ।

तक्षक जयामाजी वसतु । तयां सुमनां घालीतां हातु ।
दंश केला रोउनीं दांतु । उलथोनिं पडे माघारा । ९ ।

तक्षक वीशाचीया अनिळा । स्पर्शतां आयुष्यदृमगुळा ।
तनुंयंत्रीचा प्राणगोळा । देतां पात्र माघारें । १० ।

एसीयापरी मागीले कडे । दशन स्पर्शता उलथोनीं पडे ।
पंच प्राणांचे बीरडे । मोकळे जालें क्षणार्धे । ११ ।

बडवे पाहती जंव दृष्टी । जाली व्याळ धुदाटी ।
देखता भयभित पोटी । पळोनिं गेले आश्रमा । १२ ।

मातेसी सांगावया संवगडी । न दीसे गुंतली पात्रें वाढी ।
पाकशाळे जाउनीं तातडी । व्रतांत श्रवणि सुचला । १३ ।

परीसोनिं पुत्राची निधनता । मात्रृहृदइ शोकसरीता ।
पुरें उचंबळोंनी गर्ता । पुर्ण्या जाल्या नयनांच्या । १४ ।

गळोनिं पुत्राशोकार्णव । धैर्यें जालि कुंभोद्भव ।
ह्मणें बोलतांची भुदेव । अत्रृप्ततेने उठतील । १५ ।

अचळ पुसोनिं नेत्रकमळें । कर कवळोनिं कनकपाळें ।
अन्न करुंणि ब्राह्मणकुळें । त्रृप्त केलीं शडुरसें । १६ ।

भोजन सारोता सर्वांची । दीप्ती लोपली दीनकराची
पाउले वदोनिं ऋषींची । सद्गदीत अनुवादे । १७ ।

रोहीदास पुजेची कमळे । आनु गेला प्रारब्धकाळे ।
तेथें अवचीतां काळव्याळे । दंशीला एसें सांगती । १८ ।

आता जाइन कुसुमवना । शोधुन पाहीन नीजनंदना ।
ऐसें बोलोन सजळनयेना । वातवेगें नीघाली ।१९।

मोहोतमाचीया सागरीं । कवळींत शोकाचीया लहरीं ।
कुसुमवाटींकें मात्रुमगरीं । अचळ त्यागें भ्रमतसे ।२०।

ह्मणें बाळकुळभुषणा । हृदये स्तनि प्रेमपान्हा ।
मज भेटोनि करीं पाना । आगा नंदना वेगेसी ।२१।

ऐसीया वीलापे भ्रमतां वनी । शवा उचलुनि कौशीकमुनि ।
पुढे ठेवीतां चरणि । लागोनि पडे अवचीति ।२२।

अवचट लागतां हाता । वोळखीलें नीजसुताच्या प्रेता ।
पोटा कवळोनि धरातां । भुमि माथा हानतसे ।२३।

उभये सरोज करी शोक । हृदये पींटोनि मारी हाक ।
दु:खे रडे कौशीक । प्रगट जाला काननी ।२४।

ह्मणें तु कोण कवणांची येथें । यक्ष राक्षसी भक्षीसी प्रेतें ।
येरी ह्मणे जी बाळकाते । काळसर्पे डंखीलें ।२५।

रुषी ह्मणे आहे कीं प्राण । माता ह्मणें नीमाला नंदन ।
रुषी ह्मणे कीजे दहन । मोक्षपंथे मेळवी ।२६।

उदयो करीता पद्मीनीनाथें । जाळु नेदीती प्रेतातें ।
धन बोपील्यावीन येथें । दाहीता दंड पावसी ।२७।

आता जाइं तु स्मशानभुमीं । धर्मार्थ काष्टें वोपुं आह्मी ।
शोक करीता नीर ये भुमी । तनय तुझा जाइल ।

येरी ह्मणें निसी दाट । चालता मातें न दीसे वाट ।
रुषी ह्मणें आह्मी तट । दाऊं तुतें गगेचे ।२९।

ऐसी बोधुनी तारामती । शवासहीत धरूनीं हातीं ।
नेली जेथे रक्षणपती । होता तेथें अवीलंबे ।३०।

चिता भीतांची लांकडें । रचुनी शरण घातलें मडें ।
मातृहस्तें उभय तोंडे । लागता शीखा धडकती ।३१।

पुत्रशोकाचा उबाळा । धडके धडकतां चीतानळा ।
रुषी ह्मणें प्रेतपाळा । कळतां दंडे दडील । ३२ ।

ऐसें बोलोनि आपण । गुप्त जाला तपोधन ।
प्रदीप्त जाला हुताशन । मसनखांब धांवीनला । ३३ ।

जळें वीझउनीयां शरण । शवा वोढीलें धरूनि चरण ।
मारेपुढें टाकुनि ताडन । करीता जाला दोंदंडे । ३४ ।

आतां कळतां प्रेतनाथा । मातें दंडील सर्वथा ।
ऐसें बोलुनी लाता । मारुनी जाये स्वथाना । ३५ ।

तंव अर्द्धदाही प्रेत पोटीं । कवळोनीं माता हृदय पीटी ।
ह्मणे कटकटा अदृष्टी । काये लीहीलें वीधात्या । ३६ ।

सूर्यवंशी विजयकेतु । हरीश्चद्र नृपाचा सुतु ।
त्याच्या मरणकाळी अनर्थु । केव्हडा जाला प्रारब्धें । ३७ ।

व्याळदशे मरण ज्यासी । मोक्ष नाही ह्मणती त्यासी ।
ते आजो घडलें यासी । बालकासी माझींया । ३८ ।

सर्प डंखीलें ह्मणोनी अग्नि । नव्हे तुज लागुणी ।
सेखी अत्यजाचा पाणि । प्राप्त जाला तुजलागी । ३९ ।

ऐसी तियेची विलापवचन । परतोनि आला ऐकोणि श्रवण ।
तू कोण कोणांची ह्मणोण । शोक करीसी कवनांचा । ४० ।

येरी ह्मणें गा प्रेतनाथा । हरीश्चंद्रनृपाची मि कांता ।
काळसर्पे डखीले सुता । रोहीदासा माझीया

धर्मार्थ येकें दावीले स्थळ । काष्टें आनुनीं वोपीतां अनळ ।
तुंवा धावोनीं तात्काळ । सुकृतवांटा साधीला । ४२ ।

एकोनि अंगनेंचीया वचनां । अश्रू आले उभय नयना ।
ह्मणे कर्मा म्यां नंदना । कष्टवीले कृतघ्नें । ४३ ।

केव्हडें कर्माचे बळ । कर्मे व्यापीलें ब्रह्मांडगोळ ।
भेंदोनीं मायेचें पडळ । ऐसें दुर्घट करवीले । ४४ ।

येरी म्हणे गा स्मशानवासी । माझ्या दुःखे दुखीत होसी ।
तू कोण मानसीं । कळलें पाहीजे माझीया । ४५ ।

येरी सांगतां अपूर्व कथन । दोघां पडीलें आळींगण ।
शोकें रडतां अश्रुजीवन । शवा स्नान घातलें । ४६॥

राजा म्हणे अवो कांते । शोक करीता न पुरे येथें ।
अज्ञां मागुनीं अंत्यजाते । अग्न देउं बाळका । ४७ ।

तंववरी या स्मशाना । राहोनि रक्षावें नंदनां ।
आतांची पुसीनिया वचनां । येइन येथें अविलंबे । ४८ ।

ऐसें सांगोनि नरभुषण । जातांची पावला ब्राम्हण ।
माये हे प्रेत जाण । घेउनि राहनें किमर्थ । ४९ ।

नीशीमाजी तूं येकटी । शवासहीत स्मशानांपोटी ।
पीशाच श्वापदाच्या घरटी । मांस भक्षु येतील । ५० ।

सेखी तुझा जीवनाश । राहता होइल नीशेष ।
पैल देवलाइ चडांश । उदया य तों वसावे । ५१ ।

करें दाविलें देवालय । शवा घेउनि गेली माये ।
वीश्वामित्रें नवल काय । येउनि केले तें ऐका । ५२ ।

घोर नीद्रा लागली तितें । प्रेत फाडुनि काढीलीं आंते ।
रक्त लवथबीत हातें । मातृवदनीं घातले । ५३ ।

मांस रक्ताचा सडा । वीखरोनि टाकीला चहुंकडा ।
चुना काजळ तोंडा । चर्चुनी केली विभछ । ५४ ।

आपण जाउनी नगरमुखां । शख करुनि मारी हाका ।
म्हणे कपाट उघडी नायका । लांव पाठी लागली । ५५ ।

क्षुद्र कपाटे घेतला आंत । व्रतांत पुसती राजदुत ।
येरु म्हणें माझा मृत्य । होत होत चुकला । ५६ ।

या नगरांतुनी राक्षसी । भक्षीत आलीं बाळकासी ।
माझ्या लागता पाठीसी । पळोंनि आलों लगबगा । ५७ ।

नगरबाळकां भक्षीत देउळीं। जातां प्रत्यक्ष देखीली डोळीं।
तंव राजदूत दिपिकाज्वाळी। देवागारीं पाहती ।५८।

नगरीं प्रगत जाली मातु। जनलोक शस्त्रेंसीं धांवतु।
परी कोन्हीं देवळा आंतु। नीर्भये चोत्तें न रीघे ।५९।

दुरूनीं टाकीती पाशाण। मुखें करीताती गर्जना।
शस्त्रें प्रजोनीयां नाना। भाव दावीती शौर्याचा ।६०।

तेलदीपीका धरूनी मुष्टी। देउळीं रीघोनि धीट सुभटीं।
कुरळी धरनि फरफराटीं। वोढुनी आनीली बाहेरी ।६१।

देउळागर्भी मासखंडें। पसरलीं दिसती चहुंकडे।
गळत रक्त आंतडें। मुखामाजी लांवेच्या ।६२।

उभये दंडी कर्शोनी दुतीं। दंडे दंडीत पुराप्रती।
आनीली तंव मार्तंडदीप्ती। प्रकाशली नभातें ।६३।

मात जानवीली रायासी। आह्मी बळें धरीली राक्षसी।
आतां इची अज्ञां काइसी। ते आह्मांसी निवेदा ।६४।

राजा अविचार बद्धिमंद। ह्मणें कसनि दृढबंद।
दुर्गा भवंडुयां छेद। करा इचा अविलंबे ।६५।

दुतीं मस्तकिं सेंदुर। भरोनी फीरविली नगर।
पाहों आले नारीनर। तरुणबाळवृद्धादी ।६६।

येक ह्मणती खेचरी। आम्हीं देखिली कौशिका घरी।
अन्नछत्री पाक करी। ते हे होये नीर्धारें ।६७।

इचे करीचें जेवीलों। मरतां मरतां वाचलों।
दुजा ह्मणें मि पडीलों। दुखन्यां मास येकवरी ।६८।

येक ह्मणे माझें बाळ। इणेंची भक्षीलें वेल्हाळ।
दुजी म्हणे आळोआळ। फीरे भक्षीत बाळकां ।६९।

असो जनांची चाउटी। फीरउनीं आणिली गंगातटी।
वीरबाहो खर्गमुष्टी। देउनी धाडीलें सेवका ।७०।

स्नान घालुनि गंगाजळें । उभी केली अधोमौळें ।
नीज वल्लभे शस्त्रजाळें । काढुनी अंचळे पुसीले । ७१ ।

सत्व पाहावया गगनी । गण गंधर्व निर्जर मुनि ।
सतीयासहीत विमानयानि । कौतुक पाहों पातले । ७२ ।

सुवर्णा ऐसी सहस्त्रकीर्ण । सहरोहीणी शार्वरीरमन ।
स्वाहास्वधेसी उभयवदन । समिरवरूणधनदादी । ७३ ।

सचीसगे वज्रपाणि । धर्मासंगे यमिनि ।
मुनिसंगे मुनिभामिनि । वामनि यानीं पाहती । ७४ ।

सह तारेसी वाचस्पती । वसीष्टरुषीची आरुंधती ।
अत्रीरुषीची अनुसयासती । सत्व पाहो पातल्या । ७५ ।

रमेंसहीत मदनारिमित्र । सावित्रिस चत्वारीवगत्र ।
उमेंसहीत त्रिनेत्र । सत्व पाहती सतीचें । ७६ ।

नृपसत्वदृमांचामुळी । वोपि वसीष्ठें सुकृतांजुळी ।
तया तोयें शाखा बाहळी । कवळोनि जाती चीद्गगनिं ७७ ।

वैकुंठ कैलास ब्रम्हपद । ऐसीया फळी फळला स्वाद ।
स्वयेंतृप्त स्वानंदबोध । चाड न धरी तयाची । ७८ ।

तत्र दुत ह्मणें गा खेचरी । आता कुळदेवता स्मरण करी ।
जे इच्छा असेल उदरी । चींतन करी तयाचें । ७९ ।

कृमरा बैसउनि पद्मासनिं । स्वरुपमुद्रा लाविली नयनीं ।
हृदइ स्मरोनि चक्रपाणि । काय बोले कुरुवर्या । ८० ।

हरीश्चंद्राऐसा कांत । रोहिदास ऐसा सुत ।
कुळगुरु अरुंधतीनाथ । जन्मोजन्मी असावा । ८१ ।

प्रतिश्रुष्टीचा अपरधाता । तपो तेजे तीव्र सत्वीता ।
तोची जन्मोजन्मी मागता । याचक ऐसा कौसीक । ८२ ।

ऐसें बोलोनिं नृपभामिनि । हनना वोपी नीज मुर्ध्नी ।
शस्त्र पडावे तों ततःक्षणिं । विश्वामीत्र धांवीनला । ८३ ।

वलकलें वसनें जटाधारी । तप्त हाटक तनु साजीरी ।
हुताश नत्रि मिरवे करी । दंड कमंडल साजीरा । ८४ ।

सुद्धसत्व कळा शोडषी । पुर्ण देखोंनि भुपाळसशी ।
कोशिकहृदयेंसींधुसी । मोहभ्ररीतें दाटलें । ८५ ।

प्रतिज्ञा लंघोनी वल्लरी । नयनी लोटल्या आशृलहरी ।
उदीत हस्तें वरीच्या वरी । शस्त्र धांवोनीं धरीयलें । ८६ ।

कौसीककृपेचा वरदहस्त । लागता वीबुधपारीजात ।
सुकृतसुमणंपरांगभरीत । रांजमुगटि वर्षती । ८७ ।

हरिश्चंद्र तारामती । आवडी कौशीकें धरूनीं हातीं ।
मातृजनकाचीयें पंक्ति । रोहीदासा बैसविले । ८८ ।

त्रीवर्गा बैसउंनि नीकटि । मुर्ध्नी कवळुनी धरीलें पोटी ।
सुधाकरें पाठि थापटि । धरी हानुवटि सप्रेमे । ८९ ।

नीज तपाचीया मौक्तीकें । तिघा शेश भरीला तुकें ।
जयजयकार शृषी जनकें । हारुषे टाळी पाटिलीं । ९० ।

राजा कुमर कांता तीन्हीं । वीबुद्ध ह्मणति विमानयानीं ।
बाहोंनी नेउं ह्मणती मुनीं । ह्मणें एका देवरुषे । ९१ ।

स्वर्गसुखाचें आचळ फळें । आचळ बांधीति तपी फळें ।
परि क्लेश दु.खाची आनळे । येरू जाले जर्जर । ९२ ।

राज्यहरणांची काळीमां । लागली आसे मज उत्तमा ।
ति क्षांळोंनी स्वर्गधामा । रूढ करणें ययाते । ९३ ।

रमा पार्वती सावीत्री सती । तारा पुलोमा आरुंधती ।
आपली पुण्ये तारामतीं प्रति वोपीती चोळीया । ९४ ।

विमान वाहोंनी सुरनर । गेले तरीत जयजयकार ।
तीर्घे घेउनी रुषश्वर । निघता जाला आयोध्यें । ९५ ।

वीरबाहों येउनी पुढें । नृपा हाकीलें तोलोंनी दडे ।
माझा भृत्य नेता तोंडे । फोडीन हानीन निघाते । ९६ ।

जानोनि आप्तजाचे आटक । पातला देवरुषी नायेक ।
ह्मणें हा सर्वोत्वाचा बाळक । ऋषीशापे आप्त जाला । ९७ ।

पातला शापा पाहा वेळा । यालागी धांवलोसें दयाळा ।
मुक्त करुनी प्रतपाळा बोळवावे स्वर्गाच्छा । ९८ ।

नोमीष न लागता) सत्वर । नृपकांता सहकुमर ।
तीघा घेउनीं रुषेश्वर । अयोध्यापुरा पातला । ९९ ।

प्रजा जाणवलि मात । ऐकोनि सकळा अल्हाद बहुत ।
जेवी का मृत्यालागी अमृत । पान घडे प्रारब्धे । १०० ।

नगरी श्रुंगारले मनोहर । वाद्यनादे गर्जे अंबर ।
नाना वहनि नारीनर । वळघोनि येति सामोरे । १०१ ।

वसनें भूषनें दीव्य सुमनें । छत्रें चामरें सिबिकासन ।
अश्वगजरथादी वहन । श्रुंगारुनि आनिलि । १०२ ।

मुगुट कुंडलें मेखळा माळा । केयुर कंकनें दिव्य कुदळा ।
वोपोनि वहनि वाहोनि भुपाळा । कुमारदारा रुषीसी । १०३ ।

मंगलवाद्यें वाजति पुढें । वेष्टीत चालिलें वीर गाढे ।
भाट गर्जती पवाडे । हरीश्चंद्र रायाचें । १०४ ।

नगरद्वारप्रवेशकाळीं । याचका वोपील्या द्रव्यांजुळी ।
पुढें चालता राजमौळि । सुमनें वर्षती जनजाया । १०५ ।

मंगळ आरत्या घेउनीं करी । पुढे आल्या नगरनारी ।
राय सुमनांच्या संभारी । मेघ केला हटकाचा । १०६ ।

शरत्काळीच्या नीशारमनें । शोभा दावीजेती उडंगणें ।
तेंवी ताराना‍थ जनें । वेष्टीत आला मंदीरा । १०७ ।

राजमंदीराची शोभा । काय वर्णु भुवल्लभा ।
सौंदर्यगीरीचीया गर्भा । कोरोनी किजे ज्यापरी । १०८ ।

सर्वसंपदाभरीत । अज्ञेनें रक्षीलें अचुंबीत ।
तया मंदीरा नृपनाथ । विश्वामीत्रें आणिला । १०९ ।

छपन्न देशीचे राजेश्वर । शाहान्नव कुक्षीचे मधुर ।
आणि कितेक रुषेश्वर । विश्वामीत्रें आणिलें । ११० ।

वरूषाकाळीं सरीतावोघ । सागरा येति करीत वेग ।
तेवीं संपदा घेउनि जग । भेंटो आले गुणाब्धी । १११ ।

कौशीक कोप राजोत्तमा । मिळनी जाली तेची आम्हां ।
अंतर बीजाची महीमा सुखोल्हास दर्शणि । ११२ ।

तेवीं तो नरनाथशची । पाहावा हा हेंत सर्वांसी ।
अयोध्यापुरप्रदेशीं । अष्टही दीशा रोधील्या । ११३ ।

रथ कुंजराचे थाट । पुढें वाद्याचे घडघडाट ।
उंच स्वरें गर्जती भाट । यंश वर्णित रायाचे । ११४ ।

ऐसीयापरी राजनृमति । देखोंणि अल्हाद सकळांप्रती ।
राजा कुमर तारामती । राज्यपदीं स्छापीलीं । ११५ ।

पदीं स्छापोनि तारारमना । कौशिक गेला स्वर्गभुवना ।
ऐसे क्लेंश कुरुनंदना । कोणें भोगोलें सांग पा । ११६ ।

धनंजयासारीखा बंधु । संवे द्रोपदी सकुमार वधु ।
भीम तरी धैर्यसींधु । जावों नेंदी सत्वासी । ११७ ।

धर्मराजा स्वधर्मपाळ । लागों नेंदी दारीद्रअचळ ।
आणि सारथी वैकुंठपाळ । काय क्लेश तुह्मांते । ११८ ।

मुक्तेश्वराचें बोणणें । परीसतां नीवति संतश्रवणें ।
विश्वंभरीं अर्पुन मन । परमानंदी पहुडावें । ११९ ।

**श्री भारते आरण्ये पर्वणि हरीश्चंद्रोपाख्यान**
**॥ पंचमोध्याय । ५ ।**

सके १६७० । इभव नाम संवत्सरे आशाड वद्य । १ ।
प्रतीपदा गुरुवारीं समाप्त । वोव्या संख्या । ६०७ । साशेंसात ।

॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

## अर्थ : अध्याय पाचवा

१. राजाला डोंबाने प्रेतांची राखण करण्याच्या कामगिरीवर नेमले आणि तारामती व रोहिदास (राजपुत्र) यांच्यावर कोणता प्रसग ओढवला ते पाहू.

२. विश्वामित्राच्या पाकशाळेमध्ये तारामती काम करीत असे आणि रोहिदास त्यांच्या शिष्यांबरोबर लहानसहान कामे करीत असे.

३. काही काळ याप्रमाणे गेल्यानंतर विश्वामित्रांनी त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. पुजाऱ्याबरोबर बाळ रोहिदास फुलबागेत आला.

४. विश्वामित्राने तक्षकाला रोहिदासास डसण्याची आज्ञा केली. त्याबरोबर तो गुप्तपणे वनातून तेथे आला.

५. ज्याप्रमाणे योगी विजनवास पत्करतो, त्याप्रमाणे तक्षकाने पुष्पकोशात आश्रय घेतला. (सूक्ष्मरूपाने) ज्या फुलाने सर्पाला आकर्षून घेतले त्याकडेच तो आला.

६. डाव्या हातात परडी घेऊन, उजव्या हाताने फुले वेचीत त्यात कित्येक वृक्ष–वेलींवरील फुलें तोडून झाली. अेकजण कमळ तोडीत होता.

७. मालती, मोगरा, बकुळ, केतकी, कमळे, शेवंती, प्राजक्त, कांचन, मंदार, चाफा, तुळस, दवणा व बेलाची पाने याप्रमाणे राजपुत्र बडव्याबरोबर फुले वेचीत असता, तक्षक त्यावर लक्ष ठेऊन होता, ज्या फुलात तो लपला होता त्यापाशी ते आले.

२. ज्या फुलात तक्षक लपला होता, ते फुल तोडण्यासाठी रोहिदासानें हात घालताच तक्षकानें त्याला दंश केला. त्याबरोबर रोहिदास धाडकन खाली पडला.

१०. तक्षकाच्या विषरुपी ज्वालेने रोहिदासाच्या आयुष्यरुपी वृक्षाच्या मुळाला स्पर्श करताच त्याच्या शरीरातील प्राण निघून गेला.

११. याप्रमाणे सर्पाने दंश केल्यामुळे खाली पडलेल्या रोहिदासाचे पंचप्राण बंध–नातून मोकळे झाले.

१२. पुजाऱ्यांनी हे पाहताच त्यांच्या डोळ्यापुढे अंधारी आली व भयभीत होऊन ते आश्रमात गेले.

१३. रोहिदासाच्या मातेला हे वृत्त सांगण्यासाठी त्याचे मित्र गेले. तो ती हे पानें वाढण्यात गुंतलेली दिसली. पाकशाळेत जाऊन त्यांनी तातडीने हा हकीकत तिच्या कानी घातली.

१४. पुत्रनिधनाचे वृत्त ऐकून त्या मातृहृदयात शोकवेगाला भरती आली आणि नेत्रावाटे पाण्याचा पूर लोटला.

१५. (पण लगेच तिने विचार केला की) ही वार्ता ऐकताच पानावर बसलेले ब्राह्मण अर्धपोटी उठतील म्हणून अगस्तिप्रमाणे तिने आपला शोकसागर गिळून टाकला.

१६. तिने ( निश्चयपूर्वक ) आपले डोळे पुसले व स्वयंपाक करून ब्राह्मणांना तृप्त केले.

१७. सर्वांची जेवणे होईपर्यंत रात्र पडली. तेव्हा ऋषीकडे जाऊन त्यांना वंदून शोकपूर्वक ती सांगू लागली.

१८. रोहिदास पूजेसाठी फुले आणायला गेला दुर्दैवानें तेथे त्याला कालसर्पानें दंश केला असे सांगतात.

१९. तर आता मी बागेत जाऊन त्याचा शोध घेते असे ऋषींना सांगून ती अश्रुपूर्ण नत्रांनी, वाऱ्याच्या वगाने निघाली.

२० मोहरूपी अंधारशोकात तारामती शोक करत बागेत त्याला शोधत फिरू लागली.

२१. माझ्या बाळा. कुलभूषणा माझ्या हृदयात उसळणारा प्रेमपान्हा पिण्यासाठी तू लवकर भेट.

२२ याप्रमाणे शोक करीत तारामती रानात फिरत असता, विश्वामित्रानें रोहिदासाचे शव उचलून तिच्या पुढ्यात आणून ठेवले. त्याला अडखळून ती खाली पडली.

२३. हात फिरवताच तिने हे आपल्याच पुत्राचे शव आहे ओळखले व त्याला पोटाशी धरांत तिने जमिनीवर डोके आपटून घेतले.

२४. दोन्ही हातांनी छाती पिटीत व पुत्राच्या नावाने हाका मारीत तिनें शोक करण्यास प्रारंभ केला. तोच विश्वामित्र तेथे प्रगट झाला.

२५. तो तिला विचारू लागला, 'तू कुणाची कोण? प्रेते भक्षिणारी यक्षीण किंवा राक्षसी तर नव्हेस ?' तिनें आपल्या मुलाला सर्प दंश झाल्याचे सांगितले.

२६. ऋषींनी पुत्र जिवंत आहे का असे विचारताच तिने त्याचा प्राणदीप विझल्याचे सांतिले त्यावर त्यांनी प्रेत हदन करून त्याला मोक्ष देण्यास सुचविले.

२७. उजाडल्यानंतर जर तू प्रेत जाळू लागलीस तर कर भरावा लागतो. नसता दंड होतो.

२८. त्यापेक्षा आताच तू स्मशानात जा आम्ही तुला धर्मार्थ लाकडे वगैरे देण्याची व्यवस्था करू. शोक करीत बसून राहिलीस तर शेवटी तुला पुत्राला मूठमाती द्यावी लागेल. ( मग दहनामुळे मिळणारा मोक्ष त्याला लाभणार नाही )

२९. या अंधऱ्या रात्री चालायला वाटसुद्धा सापडत नाही असे तारामतीने म्हणताच विश्वामित्रांनी तिला गंगेचा घाट दाखविण्याचे कबूल केले.

३०. याप्रमाणे तारामतीची समजूत घालून, त्याने तिला प्रेतासह तिचा पती जेथे स्मशानात राखण करीत होता तेथे नेऊन सोडले.

३१. तेथे चिता रचन सरणावर रोहिदासाचें शव ठेवले. मातृहस्ताने दोन्ही बाजूंनी अग्नी देताच ज्वाला भडकल्या.

३२. तो शवाग्नी पाहताच साहजिकच तिला पुत्रशोकाचा उमाळा आला पण ऋषींनी तिला दटावले की राखणदाराला कळले तर तो शिक्षा करील.

३३. याप्रमाणें बोलून विश्वामित्र तेथून चालता झाला. अग्नीज्वाला दिसताच स्मशानाचा राखणदार तेथे धाऊन आला

३४. त्याने पाण्याने चिता विझवन टाकली व प्रेत सरणावरून ओढून काढले व ते त्या दुःखी मातेपुढे टाकून तो तिला वाक्ताडन करू लागला.

३५. आता जर का डोंबाला कळले तर तो मलाच शिक्षा करील असे म्हणून तिला लाथ मारून तो निघून गेला.

३६. तेव्हा अर्धवट दहन झालेले पुत्राचे ते शव पोटाशी कवटाळून तारामतीने शोकवेगाने म्हटले की, विधात्याने-ब्रह्मदेवाने दैवामध्यें काय काय वाढून ठेवले आहे कोण जाणे !

३७. वास्तविक सूर्यवंशातील सदाविजयी हरिश्चंद्राचा हा पुत्र पण त्याला दुर्दैवाने कसे अनर्थकारक मरण आले पाहा.

३८. सर्पदंशाने जो मृत्यु पावतो त्याला मोक्ष मिळत नाही असे म्हणतात. तेच नेमके माझ्या बाळाच्या नशिबी का यावे ?

३९. सर्पदंशामुळे तुला अग्नीही देणे योग्य नव्हे. अखेर तुला मांगाच्या हाताचा स्पर्श घडावयाचा होता

2229-04

४०. याप्रमाणे ती शोक करीत असता ते अेकून राखणदार पुढे आला व तिची चौकशी करू लागला.

४१. तारामतीने सांगितले की मी हरिश्चंद्राची पत्नी असून हा माझा पुत्र रोहिदास आहे. त्याला सर्पदंश झाला.

४२. अेकाने हे ठिकाण दाखवून धर्मार्थ लाकडें दिली व मी त्याला अग्नी दिला. तोच तू येथे येऊ हे पुण्य कृत्य केलेस.

४३. याप्रमाणे पत्नीचे बोलणे ऐकून हरिश्चंद्राच्या डोळयात अश्रू आले व आपल्या पुत्राला आपण उगीचच कष्ट दिले असे त्याला वाटले.

४४. खरोखर दुर्दैवाचे बळ केवढे असते. पूर्वकर्माच्या बळामुळें असे अघटीत घडले.

४५. तारामती म्हणाली, हे स्मशानाच्या राखणकर्त्या, माझ्या दुःखामुळे स्वतः दु:खित होणारा तू आहेस तरी कोण ?

४६. त्याने आपला वृत्तांत कथन करताच त्यांनी एकमेकास मिठी घातली. त्यांच्या शोकाश्रूंनी रोहिदासाच्या शवाला अखेरचे स्नान घातले.

४७. अखेर राजा म्हणाला, असे शोक करीत बसून काय होणार ? डोंबाची परवानगी घेऊन आपण बाळाला अग्नी देऊ.

४८. मी चटकन विचारुन येतो. तोपर्यंत तू येथेच राहून आपल्या पुत्राच्या शवाचे रक्षण कर.

४९. याप्रमाणे तिला सांगून राजा जाताच तेथे एक ब्राह्मण आला व तिला म्हणू लागला, हे प्रेत मायेपोटी कवटाळून तू अशी का पसली आहेस ?

५०. रात्री तू या स्मशानात अेकटी अशी हे शव घेऊन बसलीस तर प्रेत भक्षणा- साठी पिशाच्च व श्वापदे येतील.

५१. अशाने शेवटी तुझाही जीव राहणार नाही. त्यापेक्षा पलीकडे देवालय आहे, तेथ तू सूर्योदय होईपर्यंत थांबावेस ते चांगले.

५२. याप्रमाणे त्याने हाताने देवालय दाखविले. तेथे ती दुर्दैवी माता आपल्या प्रिय पुत्राचे शव घेऊन गेली. तेवढयात विश्वामित्राने तेथे येऊन काय चमत्कार केला ते ऐका.

५३. त्याच्या मायेमुळे तारामतीला गाढ झोप लागली. तेव्हा त्याने प्रेत फाडून आतडी बाहेर काढली. त्यातील रक्त स्वहस्ते त्या मातेच्या तोंडाला फासले.

५४. सर्वत्र रक्त-मासाचा मडा पसरला व तिच्या तोंडाला चुना व काजळ फासून विद्रूप केले.

५५. स्वतः वेशीपाशी जाऊन ओरडून म्हणू लागला, हे नगर नायका, लवकर वेस उघड. माझ्यामागे माणसे खाणारी राक्षसी लागली आहे.

५६. लहान दिंडी उघडून विश्वामित्राला त्याने आत घेतले व राजाचे दूत त्याला हकीगत विचारू लागले. 'मी मरता मरता वाचलो' असे त्याने सांगितले.

५७. या नगरातूनच ती राक्षसी लहान मुले खात आली व माझ्या मागे लागली. तेवढ्यात मी पळालो

५८. नगरातील कुणाचे तरी बालक खात ती देवळात बसलेली मी प्रत्यक्ष पाहिली. असे त्याने सांगताच राजाच्या दुतांनी मशाली घेऊन देवालय जाऊन पाहिले.

५९. अशी राक्षसी नगरात आली आहे हे कळताच लोक हत्यारे घेऊन तेथ धावले. परंतु देवळात न भिता शिरण्याची कुणाचीच हिंमत होईना.

६०. दुरून आरोळ्या ठोकीत लोक दगड मारीत होते व हातातील हत्यारे दाखवून शूरपणाचा आव आणीत होते.

६१. हाती तेलाचा दिवा घेऊन एक धीट सैनिक देवळात शिरला व त्याने तिचे केस धरून तिला फरपटत ओढीत बाहेर आणले.

६२. देवळाच्या गाभाऱ्यात खरोखरच सर्वत्र मांस खंड पसरलेले दिसत होते आणि त्या राक्षसीच्या मुखातून रक्त ठिबकत होते.

६३ तिच्या दोन्ही दंडांना काढण्या लाऊन काठीने मारीत मारीत तिला नगरी-कडे चालविली तोच सूर्योदय झाला.

६४. अत्यंत शौर्याने राक्षसीला पकडून आणली आहे. आता हिची पुढे काय व्यवस्था करावयाची त्याची आज्ञा असावी असे वृत राजाकडे कळविले गेले.

६५ राजा मूर्ख असून अविचारी होता. त्याने तिला बांधून, सर्वत्र धिंड काढून तात्काळ तिचा वध करावा अशी आज्ञा दिली.

६६. तेव्हा राजदूतांनी तिच्या मस्तकाला शेंदूर फासून तिची नगरातून धिंड काढली. तिला बघण्यासाठी अबालवृद्ध स्त्री-पुरुष जमा झाले.

६७. एक म्हणाला, 'अरे हिला तर विश्वामित्राच्या पाकशाळेत स्वयंपाक करताना पाहिली. नक्की हीच ती ! यात संशय नाही.'

६८. 'हिच्या हातचे जेऊन मरता मरता वाचलो रे बाबा !' दुसरा म्हणाला, 'अरे मी म्हणूनच महिनाभर आजारी पडलो बरे का !'

६९. एक म्हणाली, अरेरे, माझे बाळ हिनेच खाल्ले.' दुसरी म्हणे, 'हिला पोरे खात गल्लोगल्ली फिरताना पाहिले.'

७०. याप्रमाणे लोक वाटेल ते बोलत होते. तिला नगरप्रदक्षिणा करून आणले· वीरबाहू डोंबाने आपल्या सेवकाला ( म्हणजेच हरिश्चंद्राला तिचा वध करण्यासाठी ) शस्त्र देऊन पाठविले.

७१. गंगेमध्ये स्नान करवून तिला खाली मान करून उभे केले व तिच्या पतीने आपले शस्त्र परजून उत्तरीयाच्या टोकाने नीट पुसले.

७२. त्यांची सत्वपरीक्षा पाहण्यासाठी आकाशात गंधर्व, देव व ऋषी आपापल्या पत्नीसह विमानात बसून आले होते.

७३. सुवर्णेसह सूर्य, रोहिणीसह चंद्र, स्वाहा आणि स्वधा या आपल्या बायकांना घेऊन वरुण, कुबेर, वारा हेही आले होते.

७४. शचीसह इंद्र, ऋमिनीसह यमधर्म व ऋषींसह ऋषिपत्नी विमानात बसून पहात होत्या

७५. तारेसह बृहस्पती, अरुंधतीसह वसिष्ठ ऋषी, अनुसयेसह अत्रीऋषी सत्व–परीक्षला राजा कसा उतरतो ते पाहण्यासाठी आले.

७६. लक्ष्मीसह विष्णू, सावित्रीसह सत्यवान व पार्वतीसह शंकरही तेथे आले.

७७. राजाचे सत्व हाच वृक्ष, त्याच्या मुळाशी वसिष्ठांनी पुण्यरुपी जीवनाची ओंजळ रिती केली. त्या पाण्यामुळे या सत्ववृक्षाच्या फांद्या गगनाला जाऊन भिडल्या.

७८. वैकुंठ, कैलास व ब्रह्मलोकात त्या सत्ववृक्षाच्या फळाचा मधुर स्वाद पोहाचला परंतु अंतरी तृप्त असेलेल्या राजाने याची काहीच पर्वा केली नाही.

७९. राजदूत तारामतीला उद्देशून म्हणाले, हे यक्षिणी, आता आपल्या कुलदेवतेचे स्मरण करून तुझी अखेरची इच्छा जी असेल तिचे चिंतन कर.

८०. पुत्राला आपल्या मांडीवर बसवून त्याच्या मुखाकडे तिने दृष्टी लाविली. मनात विष्णूचे स्मरण करून ती कुरूकुलाला ललाभभूत अशी स्त्री काय म्हणाली ते ऐका.

८१. हरिश्चंद्रासारखा पती, रोहिदासासारखा पुत्र व वसिष्ठांसारखा कुलगुरू मला जन्मोजन्मी मिळावा.

८२. प्रतिसृष्टी निर्माण करणारा, तपस्तेजाने सूर्याप्रमाणे शोभणारा असा विश्वामित्रांसारखा याचकही जन्मोजन्मी मिळावा

८३. याप्रमाणे बोलून त्या राजपत्नीने आपली मान वध करवून घेण्यासाठी वाकविली. आता शस्त्राचा घाव पडणार तोच विश्वामित्र तेथे धावला.

८४. तृप्त सुवर्णाप्रमाणे ज्यांची कांती आहे, वल्कले धारण करून ज्यानें जटा सोडल्या आहेत व ज्याचे नेत्र अग्नीप्रमाणें तेजस्वी आहेत असा तो दंड-कमडलूधारी दिसत होता.

८५. हरिश्चंद्र सत्वशीलतेच्या षोडष कळांनी परिपूर्ण आहे असे बघून विश्वामित्राच्या हृदय सिंधूस प्रेमाची भरती आली.

८६. त्याने आपली प्रतिज्ञा मोडून अश्रूभरित नेत्रांनी राजांच्या हातातील उभारलेले शस्त्र वरच्यावर धरले.

८७. विश्वामित्राचा वरदहस्त अशा रितीने राजाला लाभलेला पहाताच जणुकाही विद्वानांच्या वचनांचा पारिजातवृक्ष राजमृकुटावर वर्षाव करू लागला.— आशीर्वाद देऊ लागला.

८८. हरिश्चद्र आणि तारामती यांना अत्यत प्रेमाने आपल्या बरोबर घेंऊन विश्वामित्राने रोहिदासाजवळ आणून बसविले.

८९. तिघांनाही जवळ बसवून त्यांना प्रेमाने पोटाशी धरले व पाठीवरुन हात फिरवून त्यांना आपल्या मन्मुख केले.

९०. विश्वामित्रांनी जणू आपल्या तपश्चर्येच्या अमूल्य मौक्तिक मालांनी त्या तिघांचा मळवट ( भांग) भरला. सर्वांनी त्यांचा जयजयकार करून टाळ्या वाजविल्या.

९१. राजा-राणी आणि कुमार या तिघांना विमानात बसवून स्वर्गात नेऊ या असे ऋषिमडळींनी म्हणताच विश्वामित्र म्हणाले,

९२. स्वर्ग सुखाचे फळ तर त्यांना मिळणारच आहे पण सध्या दु ख—कष्टे यांच्या अग्नीदहनाने ते जर्जर झाले आहेत

९३. यांचे राज्यहरण केल्याचा जो काळीमा मला लाभला आहे, तो धुवून काढून नतर त्यांना स्वर्गारूढ केले पाहिजे.

९४. लक्ष्मी, पार्वती, सावित्री, तारा, पुलीमा, अरुंधती या सर्वांनी अत्यंत सन्मान-पूर्वक तारामतीची ओटी भरून तिला आपला पुण्यभाग अर्पण केला (आपल्या पुण्याचा थोडासा भाग तिला दिला )

९५ देव–ऋषी वगैरे विमानात बसून जयजयकार करीत परत गेले व या तिघांना घेऊन विश्वामित्र ऋषी अयोध्येकडे निघाले.

९६. तेवढ्यात वीरबाहू डोंब पुढे आला आणि राजाला हाकलून घराकडे चालविले. माझा नोकर कुणी नेला तर त्याला म. मारीन असे तो म्हणाला.

९७. त्यावेळी संकट जाणून नारद पुढे झाले आणि त्यांनी सांगितले–समजूत घातली की हा ऋषीच्या शापाने अंत्यज झालेला सूर्याचा पुत्र आहे.

९८. आता त्याचा शापकाळ संपलेला असल्यामुळे त्याला मुक्त करून स्वर्गी धाडावे म्हणून मी आलो आहे.

९९. क्षणात राजा-राणी-पुत्र यांना घेऊन विश्वामित्र अयोध्येला आले.

१००. सर्व नागरिकांना ही हकीगत कळून आनंद झाला. जणू काही मृत्युशय्येवरील माणसाला दैवयोगाने अचानक अमृतपान करण्यास मिळावे असे झाले

१०१. नागरिकांनी नगरी सजवून नाना वाद्ये वाजविली व मिळेल त्या वाहनात बसून ते राजाला सामोरे आले.

१०२. वस्त्रालंकार, फुले, छत्र-चामरे, पालख्या, घोडे, हत्ती, रथ वगैरे सर्व घेऊन नागरिक आले.

१०३. त्या तिघांना नागरिकांनी नानाप्रकारचे अलंकार व राजमुकुट अर्पण केले.

१०४. पुढे मंगलवाद्यांचा मेळा चालला आहे. राजाभोवती शूर वीरांनी मंडळ केले आहे आणि स्तुतीपाठक राजाच्या यशाचे पवाडे गात आहेत अशा थाटात मिरवणूक चालली

१०५. राजानेही नगरद्वारातून प्रवेश करताना याचकांना भरपूर द्रव्य दान केले. नंतर स्त्रियांनी राजाच्या मस्तकावर पुष्पवर्षाव केला.

१०६. तसेच त्या नगर नारींनी मंगल आरतीनें राजाला ओवाळले.

१०७. ज्याप्रमाणे शरद ऋतुतील चंद्र चांदण्यांची शोभा दाखवितो त्याप्रमाणे जनवेष्टित असा तो तारानाथ हरिश्चंद्र मंदिरात आला.

१०८. त्या राजमंदिराची शोभा मी काय वर्णन करून सांगावी ? जणू काही सौंदर्यगिरी कोरूनच ते तयार लेण्याप्रमाणे तयार केले होते.

१०९. हे राजमंदीर पूर्वीप्रमाणेच सर्व संपत्तीने युक्त असे मुद्दाम कुणीही हात न लावता रक्षण करून ठेवलेले होते. तेथे विश्वामित्र राजाला घेऊन आला.

११०. विश्वामित्राने छप्पन्न देशाचें राजें, अठ्ठ्याण्णव कुळीचे प्रमुख आणि कित्येक विव्दान ऋषींना आणविले

१११. पावसाळ्यात ज्याप्रमाणे सर्व सरिता आपापली जलसंपत्ती घेऊन वेगाने सागराला भेटण्यास येतात. त्याप्रमाणे अनेक ठिकाणचे लोक संपत्तीचे नजराने घेऊन या गण-समुद्राला भेटण्यासाठी आले.

११२ विश्वामित्राचा कोप राजावर झाल्यामुळे पर्यायानें आम्हाला हे सर्व बघायला मिळाले– त्याचा फार आनद झाला

११३. अशा त्या नरेंद्राला पाहावे. या लोकांच्या मनातील अिच्छेमुळे अयोध्येकडे अष्टदिशामधून लोक लोटले. अष्टवाटा अडविल्या गेल्या.

११४. रथाच्या घोड्यांचा थाटमाट, पुढे वाद्यांचा धडधडाट, त्यातच उच्च स्वरात गाणारे भाट राजाचे यश वर्णून सांगत होते.

११५. याप्रमाणे राजाला बघून सर्वांना अत्यंत हर्ष झाला आणि त्यांनी राजा–राणी व राजपुत्र याची पुनश्च राज्यावर स्थापना केली.

११६. राज्यपदावर पुन्हा हरिश्चंद्राला बसवून विश्वामित्र स्वर्गाकडे निघून गेला हे कुरूकुलनदना धर्मराजा, असे कष्ट आजवर कोणी भोगलेले तुला माहीत आहेत काय ?

११७. अर्जुनासारखा भाऊ, द्रौपदीसारखी पत्नी व भीमासारखा धैर्यसिंधू तुझ्याबरोबर असताना तुझे सत्वहरण कधीच होणार नाही

११८. धर्मराजा आधीच स्वधर्म न विसरणारा, त्यामुळे दारिद्र्याच्या अग्नीची आच तुम्हाला कधीच लागणार नाही. त्यातून वैकुंठपाल तुमचा सारथी असताना तुम्हाला कोणताच त्रास होणार नाही.

११९. याप्रमाणे मुक्तेश्वराने सांगितलेली कथा ऐकून सज्जनांचे कान निवतील म्हणून परमेश्वराला आपले मनध्यान अर्पण करून परमानंदामध्ये विलीन व्हावे.

□ □ □

REFBK-0022105

REFBK-0022105

टीपा : अध्याय पाचवा

५. भोगी – सर्व

८. पातळ (ला)

१०. आयुष्यद् (व्रु) ममुळा – आयुष्य वृक्षाचे मळास
देतां माघारे – तोफेतून गोळा सुटता तोफ मागे सरकते

११. बीरडे – बंधन

१२. धुदाटी – धुंदी

१४. पुर्ण्या (र्ण)

१६. कुंभोभव – अगस्ती. त्यांनी समुद्र प्राशून टाकीला होता.

१७. अचळ (ळे) – पदराने कर (रें) – हाताने

२०. मात्र मंगरी (मातृ मगरी) अचळत्यागे – पदर सोडून

२४. उभय शोक (उभय हस्ते करी शंख)

२८. नीर ये (निरय) – नरक

३१. चीता भीतांची – चितांच्या भोवतालची

३४. दोर्दंड – हात

३९. सिखी – शेवटी

४५. पडळ – पडदा

५०. धरटी – फेऱ्या

५६. कपाट – कवाड, दार

६०. प्रजोनिया – परजून

६३. कर्शोनि – बांधून

६५. दुर्गा भवडूं (नि) या – किल्ल्या भोवती फिरवून

७३. सहस्त्रकीर्ण (किरण) – सूर्य शार्वरी रमन – चंद्र
उमयवदन – अग्नि

७६. मदनारीमित्र – शंकराचा मित्र विष्णु
चत्वारी वगत्र – ब्रह्मदेव

८४. नत्रि ने (त्रि)

९७. आप्तजाचे (अत्यंजाचे)
आप्त अत्यंज – वीरबाहूनी आडविले हें पाहून नारद ऋषी झाले. शापानें अत्यज झालेला हा सूर्याचा पुत्र यम आहे असे त्यांनी सांगिले. हा भावार्थ.

९८. प्रतपाळा (प्रेतपाळा)

२३३० काव्य
२२९०५

## संदर्भ ग्रंथ :–


| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र सारस्वत | : | वि. ल. भावे |
| प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप | : | प्रा. ह. श्री. शेणोलीकर |
| प्राचीन मराठी आख्यानक कविता | : | प्र. वा. बापट |
| मुक्तमयुरांची भारते | : | डॉ. ना. गो. नांदापूरकर |
| संत, पंत व तंत | : | प्रा. श्री. म. माटे |
| संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती | : | गं. बा. सरदार |
| पंताची सात आख्याने | : | प्रा. भगवंत देशमुख |
| मराठी आख्यानक कविता | : | डॉ. ग्रामोपाध्ये |
| प्राचीन मराठी पंडिती काव्य | : | डॉ. के. ना. वाटवे |
| प्राचीन मराठी वाङ्मयचा इतिहास | : | डॉ. प्र. न. जोशी |
| प्राचीन मराठी कविपंचक | : | व. सी. पंगु |
| मुक्तेश्वरकृत सभापर्व | : | वि. म. कुळकर्णी |
| प्राचीन आख्यानक कविता | : | प्रा. गजमल माळी |
| कथा आणि कथाकथन | : | राजा मंगळवेढेकर |
| प्राचीन मराठी वाङ्ममाचा इतिहास | : | अ. ना. देशपांडे |
| हरिश्चंद्राख्यान | : | प्रा. भालचंद्र कहाळेकर |